# सुगंधी फुलें

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ८७५
७९५०

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

प्राध्यापक श्री. म. माटे, एम्. ए.

संपादिका : शांता ज० शेळके, एम्. ए.



REFBK-0007376

कॉंटिनेंटल बुक सर्व्हिस पुणे-2

# सुगंधी फुलें

प्राध्यापक श्री. म. माटे, एम्. ए.

संपादिका : शांता ज० शेळके, एम्. ए.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

दा. क्र.

कॉन्टिनेंटल बुक ऑफिस पुणे २

REFBK-0007376

१९५० ]

[ मूल्य ३। रु.

प्रकाशक :
गो. रा. पाटणकर
कॉंटिनेंटल बुक सर्व्हिस
६२६ शनिवार, पुणें २.

★

मुद्रक :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार, पुणें २.

आगामी
संगीत शारदा
गो. ब. देवल

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# प्रस्तावना

स्वतंत्र विचारसरणी आणि ठसठशीत वळणदार भाषाशैली या दोन गुणांमुळें प्रा. श्रीपाद महादेव माटे यांना मराठी साहित्यांत वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त झालें आहे. कोणताहि विषय—मग तो सामाजिक असो, राजकीय असो किंवा वाङ्मयीन असो—त्याकडे पाहण्याचा प्रा. माटे यांचा एक अगदीं वेगळाच असा दृष्टिकोन असतो. त्या दृष्टिकोनांतून ते त्या विषयाचें निरीक्षण करतात आणि मगच त्यासंबंधीं लिहितात. या लिहिण्यावरहि खास स्वतःच्या अशा 'माटे' शैलीचा ठसा उमटविल्या-खरीज ते राहत नाहींत. यामुळें त्यांचें लेखन विस्तारानें थोडें असलें तरी गुणांनीं बहुमोल झालें आहे.

ललित आणि गंभीर अशा दोन्ही स्वरूपांचें लेखन प्रा. माटे यांनीं केलें आहे. सामान्यतः ललित वाङ्मय हें मनाची करमणूक करतें, तर गंभीर वाङ्मय हें आपणांस विचारप्रवृत्त करतें. तथापि, प्रा. माटे यांच्या साहित्यांत मात्र ललित आणि गंभीर स्वरूपाच्या लेखनाच्या इतक्या स्पष्ट सीमारेषा ठरवितां येत नाहींत; कारण त्यांचें ललित लेखनसुद्धां करमणुकीबरोबरच आपणाला विचार करावयास भाग पाडतें आणि त्याच्या गंभीर स्वरूपाच्या लेखनानें आपण विचारप्रवृत्त झालों तरी त्याबरोबरच आपली करमणूकहि होते. प्रा. माटे यांच्या ललित व गंभीर अशा दोन्ही प्रकारच्या लेखनाची या पुस्तकांत ओळख करून दिलेली आहे.

बहुधा लेखक हा तरुणवयांत काव्य कथा अशा स्वरूपाचें ललित मनो-रंजक साहित्य निर्माण करतो आणि मग वय जसजसें वाढत जातें, जगाचा अनुभव जसजसा अधिक येतो आणि विचार जसजसे अधिक पक्क होतात

तसतसा तो प्रबंध, संशोधनात्मक ग्रंथ अशा प्रकारच्या गंभीर आणि विचार-प्रधान लेखनाला प्रवृत्त होतो. प्रा. माटे यांच्या लेखनाच्या बाबतींत मात्र हा अनुक्रम पाळला गेलेला आपणांस दिसत नाहीं. कारण पूर्ववयांत त्यांनीं केसरी-प्रबोध, श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या एकसष्टीनिमित्त काढलेला केळकर-ग्रंथ, महाराष्ट्र सांवत्सरिक, विज्ञानबोध अशा भारदस्त स्वरूपाच्या ग्रंथांचें संपादन केलें व स्वतःहि अस्पृष्टांचा प्रश्न, परशुरामचरित्र यांसारखे विवेचनात्मक उत्कृष्ट ग्रंथ लिहिले. आणि उत्तरवयामध्यें त्यांनीं उपेक्षितांचें अन्तरंग, आपापलें हितगुज, रसवन्तीची जन्मकथा, अनामिका, माणुसकीचा गहिंवर, साहित्यधारा इत्यादि रसपूर्ण ललित साहित्य निर्माण केलें. पाश्चात्य पुरुषश्रेष्ठ, विचारशलाका हे त्यांचे ग्रंथ ललित व गंभीर अशा दोन्ही साहित्य-प्रकारांच्या दरम्यान मोडणारे आहेत.

प्रा. माटे यांच्या गंभीर स्वरूपाच्या लेखनाचा प्रथम थोडक्यांत विचार करूं या. 'विज्ञानबोध' या ग्रंथाला जवळजवळ दोनशें पृष्ठांची एक विस्तृत प्रस्तावना प्रा. माटे यांनीं जोडली आहे. हा प्रस्तावनाखंड म्हणजे एक स्वतंत्र ग्रंथच आहे. मानवी सुधारणेच्या व ज्ञानाच्या उगमापासून मानवानें आजपर्यंत जी स्वतःची प्रगति करून घेतली आहे तिचा या ग्रंथांत आढावा काढला आहे आणि त्यापासून महाराष्ट्रानें काय बोध घ्यावयास हवा हें लेखकानें स्पष्ट व निःसंदिग्ध शब्दांत सांगितलें आहे. दिवसेंदिवस प्रगत होत जाणाऱ्या पाश्चिमात्य राष्ट्रांशीं होणाऱ्या स्पर्धेंत जर टिकाव धरावयाचा असेल, तर शास्त्रीय ज्ञानाची यापुढें आपण उपेक्षा करून भागणार नाहीं असा या ग्रंथांत लेखकानें स्फूर्तिजनक संदेश दिला आहे. 'परशुराम चरित्र' या आपल्या ग्रंथांत परशुरामाच्या जीवनाचा सामाजिक अर्थ प्रा. माटे यांनीं लावून दाखविला आहे, तर 'अस्पृष्टांचा प्रश्न' या अभिनव ग्रंथांत, अस्पृष्टांची सुधारणा करतांना त्यांच्या जीवनाचें जें स्वरूप लेखकानें अत्यंत जवळून पाहिलें, त्याचा जो सूक्ष्म अभ्यास केला त्याचा परिपाक उतरला आहे.

प्रा. माटे हे उत्तम साहित्यिक तर आहेतच, पण त्यापेक्षांहि ते एक थोर समाजशास्त्रज्ञ व चिकित्सक विचारवन्त आहेत. किंबहुना त्यांचें ललित साहित्य जें एवढें रमणीय व नावीन्यपूर्ण झालें आहे तें त्यांच्या समाज-

शास्त्रीय दृष्टिकोनाची व चिकित्सक विचारशीलतेची बैठक त्याला लाभल्यामुळेंच असेंहि म्हणतां येईल. जीवनाकडे बघण्याच्या या विशिष्ट दृष्टिकोनामुळें प्रा. माटे यांच्या साहित्याला एक निराळीच चव, वेगळीच गोडी आली आहे. त्यांच्या ललित साहित्याच्या अभ्यास करतांना त्यांचा हा विशिष्ट दृष्टिकोन आपण समजावून घेतला पाहिजे. उदाहरणार्थ, ' उपेक्षितांचें अन्तरंग ' हें त्यांचें ललित स्वरूपाचें पहिलेंच पुस्तक पाहावें. पुस्तकाच्या नांवापासूनच त्याचें वेगळेंपण आपल्या मनांत भरतें. सर्वसामान्य लेखकांनीं ज्यांची उपेक्षा केली त्या भिल्ल, रामोशी, महार इत्यादि वर्गांतील लोकांवरच या पुस्तकांतील कथा प्रामुख्यानें लिहिलेल्या आहेत. ' कृष्णाकांठचा रामवंशी ', ' तारळखोऱ्यांतील पिऱ्या ', ' सतीचें शस्त्र ' इत्यादि कथा या दृष्टीनें वाचनीय आहेत. समाजांतील उपेक्षित वर्गासंबंधीं प्रा. माटे यांना जें प्रेम, जो जिव्हाळा वाटतो त्या प्रेमामुळें व जिव्हाळ्यामुळें या पुस्तकांतील लेखन अत्यंत जिवन्त व हृदयस्पर्शी वठलें आहे.

कोणत्याहि लेखकाचें लेखन वाचतांना तो तें विशिष्ट लेखन करावयास कां प्रवृत्त होतो याचा आपण विचार करावयाला पाहिजे. प्रा. माटे यांच्या स्वभावांत दोनतीन गुण प्रामुख्यानें आहेत. ते म्हणजे स्वतंत्र विचारसरणी, एखाद्या प्रश्नाकडे बघण्याचा खास आपला असा वेगळाच दृष्टिकोन आणि कोणत्याहि प्रसंगीं न सुटणारी अशी समाजशास्त्रीय ज्ञानाची बैठक. प्रा. माटे यांचें सर्व गंभीर लिखाण या त्यांच्या विशिष्ट गुणांतूनच प्रकट झालें आहे. महाराष्ट्रांत शास्त्रीय ज्ञानाची आवड निर्माण व्हावी, त्या ज्ञानाची महति लोकांना पटावी आणि प्राश्चात्य देशांच्या तुलनेनें आपला देश बिलकुल मागें राहूं नये असें त्यांना अत्यंत तीव्रतेनें वाटलें व त्या तळमळींतूनच त्यांची ' विज्ञानबोधा 'ची प्रस्तावना निर्माण झाली. लोक पुराणांकडे अंधश्रद्धेनें बघतात व ऐतिहासिक सत्याची मूळ बैठक सुटून देवभोळेपणा माल माजतो तसा देवभोळेपणा स्वभावांत मुरूं न देतां लोकांना ऐतिहासिक संकेताचा बरोबर उलगडा व्हावा म्हणून ' परशुरामचरित्रां 'त परशुरामाच्या कथेचा योग्य अर्थ त्यांनीं लावून दाखविला. अस्पृष्टांना सुधारण्यासाठीं प्रा. माटे यांनीं अनेक वर्षे पोटतिडीकीनें जे श्रम केले त्या श्रमांचें सार ' अस्पृश्यांचा प्रश्न ' या ग्रंथांत त्यांनीं लोकांपुढें मांडलें आहे.

प्रा. माटे हे मूळचे ललित लेखक नव्हते. त्या तऱ्हेचें लेखन त्यांनीं फार उशीरां सुरू केलें. तथापि, हें लेखनहि त्यांच्या विशिष्ट स्वभावांतूनच जन्माला आलेलें आहे. निव्वळ कांहीं तरी रचून लोकांना सांगावयाचें व त्यांची करमणूक करावयाची या दृष्टीनें आपलें ललित लेखन त्यांनीं केलेलें नाहीं. केवळ कल्पनेवर आधारलेला असा एकहि लेख त्यांनीं लिहिलेला नाहीं. त्यांच्या प्रत्येक लेखाला सत्यसृष्टींतील घटनेची बैठक आहे आणि यामुळेंच त्यांच्या कथा अत्यंत जिवन्त, रसाळ व हृदयस्पर्शी वठल्या आहेत. 'सावित्री मुक्यानेंच मेली' किंवा 'कशाचा संसार?' अशा त्यांच्या कथा केवळ मराठी भाषेलाच नव्हे तर कोणत्याहि भाषेला भूषण होण्याइतक्या गुण-शाली खचित आहेत. वाङ्मयाचा आशय 'सत्य' असावा, त्याचें स्वरूप 'सुंदर' असावें व त्याचा परिणाम 'शिव' म्हणजे कल्याणकारक व्हावा हें प्रा. माटे यांचें एक सूत्र आहे. त्यांच्या दृष्टीनें खऱ्या उत्तम वाङ्मयाची हीच कसोटी आहे. त्यांचें स्वतःचें लेखन या कसोटीला पुरेपूर उतरतें. त्यांचें ललित लेखनहि निव्वळ मनोरंजन वा निव्वळ करमणूक करण्यासाठीं त्यांनीं लिहिलेलें नाहीं. समाजांतील ज्या वर्गाची उपेक्षा होत आहे त्या वर्गाविषयीं प्रा. माटे यांना सहानुभूति वाटते, प्रेम वाटतें, जिव्हाळा वाटतो. ही सहानुभूति, हें प्रेम व हा जिव्हाळा सर्वसामान्य वाचकांच्याहि मनांत निर्माण व्हावा एवढ्यासाठीं भिल्ल, रामोशी, अस्पृश्य, इत्यादि वर्गांतील व्यक्ती घेऊन त्यांचीं चित्रें आपल्या वाङ्मयांत प्रा. माटे यांनीं रंगविलीं. ग्रामीण जीवनाचीं इतकीं रेखीव आणि इतकीं जिवन्त चित्रें मराठी वाङ्मयांत अन्यत्र क्वचितच सांपडतील. 'तारळखोऱ्यांतील पिऱ्या'चें प्रा. माटे यांनीं रंगविलेलें चित्र पाहावें. पिऱ्या दरोडे घालीत असला तरी तो प्रामाणिक, ईश्वरनिष्ठ व हाडाचा सच्चा माणूस आहे. अंगांत मुसमुसणारी रग व अशिक्षितपणामुळें बऱ्यावाईटाबद्दलचा अविवेक यांच्या मिलाफामुळें तो दरोडेखोर, पुंड बनला, तरी त्याचें हृदय खऱ्या मर्दाचें आहे. खंडोबाबद्दल त्याला अमर्याद भक्ति आहे. त्याची बायको पोलिसांच्या भीतीमुळें त्याला जेव्हां खंडोबाच्या जत्रेला जाण्याच्या विचारापासून परावृत्त करूं पाहते तेव्हां तो गहिंवरून तिला म्हणतो, 'तूं अशी कशी बोलतियास चंद्राबाई! वर्सांतून एकदां खंडूबाचं दर्सान घडतंया त्यवडंबी सोडलं तर मग चोरी-

दरुड्याबिगर काय राहिलं ? ' या भावड्या पण शूर गुंडाचा फायदा दुबळ्या पांढरपेशांनीं घेतला व त्याला हुलीवर घालून चोरी दरोड्यास प्रवृत्त केलें ! अखेर शेवटीं पिऱ्या मांग जेव्हां तळतळून आपली कैफियत देतो तेव्हां डोळ्यांत पाणी येतें. पिऱ्या म्हणतो, " तालेवारांनीं सांगितलं म्हूनशान् क्येलं. पन् त्येंचा जरीचा मंदिल त्येंच्या टकुरीला राहिला, त्येंची कंटी त्येंच्या गळ्यांत राइली अन् माज्या हातापायांत या बेड्या आल्या बघा– " पिऱ्यापेक्षां पिऱ्याला हुलीवर घालणारे ' तालेवार ' अधिक गुन्हेगार नाहींत काय ?

प्रा. माटे यांच्या उपेक्षितांच्या तळमळींतून त्यांचें बरेंच ललित साहित्य निर्माण झालें आहे. तथापि, त्यांच्या वृत्तीला केवळ हाच एक पैलू नाहीं. सौंदर्यदृष्टि, निसर्गप्रेम, मानवी स्वभावांतील विसंगति बघणारी विनोदबुद्धि हें खऱ्या लेखकला अवश्य असणारे इतर गुणहि त्यांच्यामध्यें आहेत. ' पाहिला वसंत ', ' देवाचे खरे लाडके कोण ? ', ' आमचा खंड्या ', ' लहान लहान वशीकरणें ' हे त्यांचे लेख त्यांच्या सूक्ष्म सौंदर्यदृष्टीची, निसर्गप्रेमाची, आणि विनोदबुद्धीची साक्ष देतात. आपल्या आवडत्या खंड्याचें त्यांनीं केलेलें वर्णन वाचावें, अगर ' पहिल्या वसन्ता 'चा त्यांनीं कल्पनेनें वर्णिलेला जन्म पाहावा, दोहोंतहि त्यांचें सूक्ष्म निरीक्षण व तीव्र कल्पकता आपल्या प्रत्ययास येते.

जुन्या सन्तवाङ्मयाबद्दल प्रा. माटे यांना अत्यंत प्रेम व आदर आहे. आपल्या सामाजिक दृष्टिकोनांतून जुनें सन्तवाङ्मय बघावयाचें व त्याचा नवीन अर्थ लावावयाचा हा एक त्यांचा आवडता छंद आहे. या दृष्टीनें मंगळवेढ्याचें कुसू ' ' इंद्रायणीच्या वाळवंटांत, हे त्यांचे लेख वाचनीय आहेत.

लघुकथेच्या तंत्राचा आपण अभ्यास केलेला नाहीं असें प्रा. माटे यांनीं अनेकदां सांगितलें आहे. तथापि, त्यांच्या लघुकथांची मूळ वस्तु सत्यावर आधारलेली व सामर्थ्यशाली असल्यामुळें त्यांच्या कथांना स्वतःचेंच असें एक तंत्र निश्चित निर्माण झालें आहे. त्याप्रमाणेंच त्यांनीं लिहिलेले कित्येक निबंध हे आज मराठी वाङ्मयांत बऱ्याच लोकप्रिय होऊन बसलेल्या ' गुजगोष्टी 'च्या साच्यांत चपखल बसूं शकतात. केवळ कलेसाठीं कला

म्हणून, लेखन न करतां विशिष्ट हेतु डोळ्यांपुढें ठेवून केलेलें लेखनसुद्धां कसें वेधक आणि रसाळ होऊं शकतें याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे प्रा. माटे यांचें साहित्य. त्यांच्या लेखनांत दोष नाहींत असें नाहीं. पाल्हाळिक-पणा, कलेला उचित असा संयमाचा व सूचकतेचा अभाव आणि त्याच त्या कल्पनांची पुनरुक्ति हे प्रा. माटे यांच्या लेखनांतले मोठेच दोष आहेत. तथापि, या दोषांची आपल्याला जाणीवहि होऊं नये एवढे गुणहि त्यांच्या साहित्यांत आहेत.

या गुणांपैकीं एक प्रमुख गुण म्हणजे प्रा. माटे यांची वैशिष्टयपूर्ण भाषाशैली. ‘ एक उत्कृष्ट शैलीकार लेखक ’ असा त्यांचा यथार्थ लौकिक आहे. लहान लहान जोरकस वाक्यें, जानपद शब्दांचा अर्थपूर्ण व उचित उपयोग आणि रसाळ वेधक वर्णनें हीं त्यांच्या भाषेचीं प्रमुख अंगें होत. पिऱ्याचें शब्दचित्र, खंडोबाच्या जत्रेचें वर्णन, पहिल्या वसन्ताचें वर्णन पाहावें म्हणजे प्रा. माटे यांच्या भाषाशैलीचें सामर्थ्य ध्यानांत देईल. जर्वर, कालवा, थापडवाईक, तालेवार इत्यादि अस्सल मराठी पण अवापरामुळें अपरिचित वाटणाऱ्या शब्दांचा उपयोग करून प्रा. माटे आपल्या लेखनांत उत्तम वातावरणनिर्मिति करतात.

‘ आपल्याला ललितलेखनाचें तंत्र कळत नाहीं ’ असें प्रा. माटे यांनीं अनेकवार सांगितलें आहे, परंतु सखोल जीवनानुभव, जातिवन्त सहृदयता आणि अभिजात रसिकता यांना कलेचें तंत्र शिकून घ्यावें लागत नाहीं. या तीन गुणांचा मिलाफ झाला तर तंत्र आपोआप त्यांतूनच विकसित होतें.

प्रा. माटे यांचें लेखन हें अशा तंत्रशुद्धतेचें उत्कृष्ट उदाहरण आहे.

—शांता ज. शेळके

दा. क्र. ७३७०६
संग्रह शाखा
अनुक्रम १७७१
नों. दि.

# देवाचे खरे लाडके कोण ?

[ मनुष्यप्राणी हा इतर सर्व प्राण्यांहून स्वतःला श्रेष्ठ समजत असतो. निसर्गाचे, विधात्याचे आपण सर्वांत अधिक लाडके आहोंत असें तो मानीत असतो. पण त्याचा हा समज खरा आहे काय ? निसर्गातल्या इतर प्राण्यांना जीं सामर्थ्यें मिळालेलीं असतात, त्यांना ज्या सौंदर्याचा लाभ झालेला असतो त्याच्याशीं तुलना करून पाहिली तर, माणूस हा किती दुबळा, किती कुरूप ठरतो ! त्याला वाघसिंहांच्या नख्या नाहींत, घोड्याची गति नाहीं, माशांप्रमाणें पोहण्याची शक्ति नाहीं, फार काय सांगावें, पक्ष्यांप्रमाणें उडायला त्याला पंखसुद्धां नाहींत. आपल्या रंगीबेरंगी पंखांनीं आकाशांत भरारणारीं पांखरें पाहून लेखकाच्या मनांत आलें, देवाचे खरे लाडके कोण ? जमिनीवर सरपटणारीं आम्ही माणसें कीं, आकाशांत स्वैर विहरणारीं हीं पांखरें ? आणि हा विचार मनांत येतांच निरनिराळ्या पक्ष्यांचीं सुंदर सुंदर रूपें भराभर त्याच्या डोळ्यांसमोरून एकामागून एक सरकूं लागलीं ! त्यांच्या तुलनेनें माणसाची कुरूपता लेखकाला अधिकच जाचूं लागली. प्रा. माटे यांचें निसर्गाचें सूक्ष्म निरीक्षण जसें या लेखांत दिसतें त्याप्रमाणेंच लेखाच्या अखेरीस त्यांच्या तेजस्वी कल्पकतेचाहि प्रत्यय येतो. माणसांना कृत्रिम पंख लावतां आले तर काय मौज होईल याचें किती बहारदार वर्णन त्यांनीं केलें आहे पहा. ]

आपल्या या सपक्ष मित्रांकडे पाहा. त्यांच्याकडे पाहिल्यावर ज्याच्या मनांत मत्सराची भावना उठत नाहीं तो माणूसच नव्हे. तो विहिरींत घुमणारा पारवा एक मूठभर प्राणी असतो. पण त्याचें अंग किती निर्मळ जिल्हई दिल्यासारखें आणि तुकतुकीत असतें ! त्याच्यावर बारीक बारीक छिद्रांची कलाकुसर केलेली असते आणि त्याचा रंग तर असा कीं, आकाशांतून कोरून काढ-

लेल्या आकृतीप्रमाणें तो दिसतो. आवाजांत जशी कसलीहि खर नाहीं तसा अंगावर कसलाहि बुऱ्हा नाहीं. अशा या रूपसुंदर पक्ष्यांना ' होलगड ' म्हणून अवहेलणाऱ्या मानवप्राण्याच्या रसिकतेची तारीफ करावी तेवढी थोडीच होणार आहे. तो तासपक्षी पाहिलांत का? त्याच्या पंखांची शोभा तर पाहा. पण त्याचा श्रीमंत मित्र तो भारद्वाज म्हणजे तर रसिकाच्या दृष्टीनें जिवंत रसविलासच आहे. याच्या पंखांत तो सोनेरी वर्ख सृष्टीनें कोणत्या लहरींत चोळला असावा बरें? आपल्या या वैभवाची जाणीव त्याला आहे काय? नाहीं तर तो ते आपले लखलखणारे पंख पुन्हां पुन्हां कां फडफडवीत असतो? माणसाला सोन्याचा लोभ तरी केवढा असतो? या भारद्वाजाच्या पंखाला केवळ सोनेरी रंग असलेला दिसतो म्हणून माणसानें त्याचें दर्शन शुभकारक मानलें आहे. दरिद्री माणसा! तुझी किंमत काय ती कळली. अरे तें सोनें नव्हे, तो सोनेरी रंग आहे. आपल्या एका लाडक्या प्रजेच्या पंखाला तो लावून सृष्टीनें तुझें विडंबन मांडलें आहे! आणि तरीहि ' मीच सृष्टीचा लाडका ' म्हणून शेखी मिरवतोस, तर तुला म्हणावें तरी काय?

तो पंचरंगी पोपट पाहिलास काय? आपल्या हातांशीं नाना प्रकारचे रंग ठेवून विधात्यानें याचें अंग किती चित्रविचित्र केलें आहे पाहा: त्याच्या अंगकान्तीवर तुझी दृष्टिहि ठरायची नाहीं. तुझें तें ओखटवाणें अंग पाहा आणि शंभरदां धुवावीं तेव्हां एकदां स्वच्छ होणारीं तुझीं तीं वस्त्रें म्हणजे लक्तरें पाहा. या पोपटाचे पंख कुणी धुतले आहेत का? याच्या पंखांचा रंग कधीं विटला आहे का? त्याच्या गळपट्ट्याकडे तर लक्ष दे. त्याच्या प्रियेनें त्याच्यासाठीं हा केव्हां विणला बरें? आणि त्याचें साहित्य तरी तिनें कोठून पैदा केलें बरें? बघ! सृष्टि त्याच्यावर केवढी फिदा आहे. आपल्या या रंगसंपत्तीवर खूष होऊन हा पोपट मौजेनें शीळ घालतो तेव्हां त्याचा चेहरा पाहाण्यासारखा असतो. तो शीळ घालतो तो तुमच्यासाठीं घालीत नाहीं. त्याला कसलें तरी स्मरण होत असलें पाहिजे. आपल्या पीतवर्ण पायांचा अभिमान बाळगणारी साळुंकी तेव्हां त्याला आठवत असावी. ती साळुंकी तरी तूं कधीं नीट पाहिली आहेस का? तुझे ते गवई गाडे ललकाऱ्या मारतात ना! पण त्यांचा मूळ पुरुष त्या कोणा-

पासून शिकला, तुला माहीत आहे काय? तो आपल्या ललकाऱ्या या साळुंकीपासून शिकला! त्या साळुंकीचें सौंदर्यवैभव पाहा. तिचे गोजिरवाणे पिंवळेधमक पाय, तिनें अंगावर घेतलेला चॉकोलेट रंगाचा नाहीं तर अंजिरी रंगाचा शालू, तिची विडा खाल्ल्यासारखी सुरंगी जिवणी हीं पाहिल्यावर तुला खास वाटेल कीं, हे पक्षीच सृष्टीचे खरे लाडके आहेत.

आपला माणसाचा गर्व हरण करणारा तो प्रचंड गरुड पाहिलास का? आपल्या विस्तीर्ण पंखांचा फडत्कार करीत योजनेच्या योजनें आकाशांतून झेपावत जाणाऱ्या या पक्षीराजाची थोरवी तर पाहा. सृष्टीनें त्याला काय काय सामर्थ्य दिलें आहे! खालीं येऊन त्यानें जर तुला आपल्या नखांत धरलें तर केवळ एका घटकेंत तो तुला हिमालयावर घेऊन जाईल! त्याचे पंख पाहा. सामर्थ्य व शोभा यांचा विस्मयकारक मिलाफ त्यांत झालेला आहे. तूं कधीं रानावनांतून हिंडला आहेस काय? सृष्टीचा अत्यंत लाडका पुत्र तुला तेथें कोठें तरी पाहावयास सांपडला असेल. तो चालूं लागला म्हणजे पदलालित्याचा मनोरम नमुना तुला दिसेल. या मयूर पक्ष्याला बनवितांना सृष्टि फार खुषींत असली पाहिजे. त्याच्या डोक्यावर तिनें आपल्या हातानें काय सुंदर तुरा खोंविला आहे! तिनें त्याच्या कानांत प्रत्येक पदन्यासाबरोबर डुलणारे डूल घातले आहेत. तिनें त्याच्या मानेवर व बाहूंवर हरतऱ्हेच्या रंगांचीं मिश्रणें लाविलीं आहेत. पण त्याचा पिसारा रचतांना सृष्टीनें आपलें सारें धन कोशागारांतून बाहेर काढलें असलें पाहिजे. त्याला एकदां हर्ष होऊं दे. तुला हर्ष झाला तर तूं फार म्हणजे आपले तोंड सबंध वासशील, डोळे बारीक करशील, नाक आहे त्यापेक्षां रुंद करशील, गालाला चुण्या पाडशील, आपल्या काळ्या हिरड्या बाहेर दाखविशील, पाण्यानें डोळे तेलकट झाल्यासारखे दाखविशील, घाणेरड्या दातांचें प्रदर्शन करशील, घशांतून हिडीस-फिडीस ध्वनि काढशील आणि आहेस त्यापेक्षां शतपट कुरूप दिसशील. सृष्टि तुझ्याशीं कशी वागली आहे पाहा; आनंद व्यक्त करायला ती तुला कुरूप बनावयास लावते! पण मोराचें पाहा, आकाशांत एकदां मेघमंडळ जमा झालें आणि त्यानें आपल्या गर्जिताला आरंभ केला म्हणजे या मोराला अत्यानंद होतो. त्याला आनंद होण्याला सुद्धां येवढें विशाल कारण लागतें.

आणि आनंद झाला म्हणजे तो आपला भव्य पिसारा पसरतो! या वेळीं सौंदर्याचें सगळें विश्व उभें राहतें. सहस्रनेत्र बनून तो पक्षी आपल्या प्रियेकडे पाहू लागतो. सृष्टीचें देणें असें असावें.

या दृष्टीनें पाहतां मला कित्येकदां वाटतें कीं, आपल्याला जर पंख असते तर फार चांगलें झालें असतें. निरनिराळ्या रंगांचे लांब-आखूड असे पंख आपल्याला हवे होते. शुभ्र, काळे, गुलाबी, लाल, हिरवे, पिंवळे, अस्मानी, नाना प्रकारचे पंख असलेले पुढारी आणि अनुयायी एखाद्या सभेला आले असते म्हणजे काय बहार उडाली असती! वक्तृत्व करतांना पुढाऱ्यानें आपले पंख पसरले असते आणि आपल्या माना पंखांत रोवून श्रोत्यांनीं गंभीरपणानें त्यांचें भाषण ऐकलें असतें. कॉलेजांत शिकवितांना 'गाउन' नांवाच्या कळकट पडदाण्या अंगांभोंवतीं लोक सध्यां गुंडाळतात त्याऐवजीं वर सांगितल्यासारखे पंख असते तर, त्या शिक्षकाचा दिमाख किती वाढला असता. त्यांतच मग सृष्टीच्या मर्जीची भर पडली असती. कुणाला शुभ्र पंख, कुणाला गुलाबी पख, कुणाला काळे पंख, कुणाला पंचरंगी पख असा गमतीचा देखावा दिसला असता. विद्यार्थ्यांत सौंदर्याची लयलूट झाली असती. विद्यार्थिनींच्या बाजूला तर इंद्रधनुष्याचीं बेटेंच उभीं राहिलीं असतीं. टाळ्या वाजविण्याच्याऐवजीं या सर्वांनीं पंखांचेच फडत्कार केले असते, आणि पुन्हां पुन्हां पंख सावरून घेण्याच्या त्यांच्या लीलांनीं सर्वत्र मोहजाल पसरलें असतें. सध्यां गांवांतून इकडे तिकडे फिरतांना सारा कळकटपणा दिसतो. पोषाखांत एक तऱ्हेचा राखी-गाढवी रंग उमटलेला असतो. सर्वत्र मलिनपणा दिसतो. आपल्याला जर रंगीबेरंगी पंख असते तर, जीवितांत आल्हाद पसरला असता. त्याहीपेक्षां सोय तर केवढी झाली असती! आपलें चालणें म्हणजे एक अत्यंत मागसलेपणाचें लक्षणच मला वाटतें. हा एक अगदीं प्राथमिक, रानटी अवस्थेतला चलनवलनाचा प्रकार आहे. पण पंख असते तर, आपल्याला भराभर उड्डाणें करतां आलीं असतीं आणि कामें भराभर आवरलीं असतीं. त्या मानानें आपली प्रगति सध्यांच्यापेक्षां जास्त झाली असती. पंख नसल्यानें आपलें मोठेंच नुकसान झालें आहे. आपण कुरूप आणि मंद राहिलों आहों.

पण आतां सृष्टीच्या या चुकीची दुरुस्ती आपण खास करूं असें वाटतें.

तिनें आपल्या डोक्यांत जी एक निराळीच जादू ठेविली आहे तिच्या बळावर हें काम होण्यासारखें आहे. विमानांतून उड्डाण करणें हें पुढें पुढें कमी होत जाईल. निदान नित्याच्या व्यवहारांत तरी विमानें कोणी वापरणार नाहीं. लहान लहान विजेच्या पेट्या आपल्या काखेंत ठेवतां येतील व नाना प्रकारचे लहानमोठे पंख आपल्या बाहूंवरून बसवितां येतील. विजेच्या शक्तीनें हे पंख सहज फडफडवितां आले म्हणजे भराभर उड्डाणें करावयास हरकत पडणार नाहीं. ज्या मानानें लांबचा किंवा जवळचा प्रवास असेल त्या मानानें विजेच्या डब्या भरून घेतल्या म्हणजे झालें. पंखांचें आकारमानसुद्धां यावरच ठरवावें लागेल. व्यापारी लोक यांचीं दुकानें काढतील. विजेच्या पेट्यांचे व लहानमोठ्या पंखांचे संच ते भाड्यानें किंवा विक्रीला ठेवतील. ज्याला जसे हवेत तसे तो घेईल. अंगांत व पायांभोंवतीं उबदार विजारी किंवा वस्त्रवेष्टणें असलीं आणि या पेट्या व हे पंख बसविले कीं, चित्रांत काढलेल्या यक्ष, गंधर्व, किन्नरांप्रमाणें किंवा पऱ्यांप्रमाणें आपल्याला हवेंतून भराभर जातां येईल. आपले गोजिरवाणे पाय या भुईला लावतो कोण ? अशी मौज होईल. अर्थात् कृत्रिमच करावयाचें तर तें हरतऱ्हेचें व रंगांचें करण्याची इच्छा होईलच होईल. मग कोणी पोपटाचे पंख घेतील. कोणी साळुंकीचे घेतील. कोणी गरुडाचे घेतील. कोणी निरनिराळ्या चित्रविचित्र मिश्रणांचे घेतील. खालीं उतरलें कीं, पंखजोडी खुंटीला लावून ठेवावी, विजेची पेटी कपाटांत ठेवावी आणि इतर कामाला लागावें असा प्रकार सुरू होईल. हें घडून यावयास आतां फारसे दिवस लागणार नाहींत असें वाटतें.

खरोखर एवढें झालें म्हणजें विधात्याची चूक दुरुस्त झालीसें ठरेल आणि जीवित अत्यंत रसराशित, कान्तिमान्, आल्हादप्रत आणि गतिमान् होईल.

---

## कठिण शब्दांचे अर्थ

ओखटवाणें = गलिच्छ. फडत्कार = फडफडाट. कोशागार = भांडार. सहस्रनेत्र = इंद्र. ( येथें सहस्र डोळयांचा पिसारा असणारा मोर. ) पडदणी = आडवें लावून घेण्याचें वस्त्र.

## अभ्यास

(१) माणसांना विजेचे पंख बसवून घेण्याची सोय झाली आहे अशी कल्पना करा, व तुम्ही स्वतः पंख बसवून घेतल्या-नंतरचा आपला एक दिवसाचा अनुभव पत्रांतून एका मित्राला कळवा.

(२) 'देवाचे खरे लाडके प्राणी म्हणजे माणसेंच, कारण त्यांना वाचा असते' अशा रीतीनें कोणता तरी मानवेतर प्राणी जर माणसांचा हेवा करूं लागला तर त्याच्या मनांत काय काय विचार येतील?

(३) निसर्गानें माणसाला दुबळें निर्माण केलेलें असलें तरी, आपल्या बुद्धीच्या जोरावर त्यानें अनेक शोध लावून निसर्गावर मात केली आहे. अशा पांच शोधांचीं नांवें सांगून त्यांची माहिती द्या.

• • •

मराठी ग्रंथ संग्र...
अनुक्रम ........
विभाग ........
नों. दि. २

# पीटरची ज्ञानलालसा

[ ज्यांच्या मतांचा व कृतींचा प्रभाव यूरोपच्या व पर्यायानें जगाच्या इतिहासावर व राजकारणावर ठळकपणें पडला अशा कांहीं पुरुषश्रेष्ठांचीं चरित्रें ' पाश्चात्य पुरुषश्रेष्ठ ' या पुस्तकांत प्रा० माटे यांनीं दिलीं आहेत. या पुस्तकांतील प्रख्यात रशियन राजा ' पीटर दी ग्रेट ' याच्या चरित्रांतून प्रस्तुतचा उतारा घेतलेला आहे. पाश्चात्य देशांत जे कांहीं कर्तबगार पुरुष होऊन गेले त्यांतच पीटरची गणना करावयाला हवी. त्याचा जन्म इ० स० १६७२ मे च्या ३० तारखेला झाला. ' रोमॅनोव्ह ' राजघराण्यांतील हा चौथा पुरुष होता. प्रा० माटे याचें वर्णन असें करतात : ' प्रत्यक्ष शककर्ता जरी नव्हे तरी रशियन इतिहासांत एका नव्या काळाचा कर्ता व पौर्वात्य रशियाला पाश्चिमात्य रशिया बनविणारा असा हा मोठा जबरदस्त वीर होऊन गेला.' रशियन इतिहासांत नवा कालखंड पीटर निर्मू शकला याचें कारण त्याच्या अंगीं दोन अत्यंत थोर असे गुण होते. एक गुण म्हणजे त्याची विलक्षण तीव्र अशी जिज्ञासा, ज्ञान संपादन करण्याची हौस व दुसरा गुण म्हणजे स्वतः अपरिमित कष्ट सोसून आपल्या अर्धरानटी राज्यांत त्यानें घडवून आणलेल्या अतिशय उपयुक्त अशा सुधारणा. या सुधारणांमुळें तर रशियाच्याच काय पण अवघ्या यूरोपच्या इतिहासांत पीटरचें नांव अजरामर झालें आहे.

पुढील उताऱ्यांत पीटरच्या ज्ञानलालसेचें व त्याच्या किंचित् राकट, आडदांड पण निर्मळ अशा स्वभावाचें मोठें मनोरम चित्र लेखकानें काढलें आहे. तशीच त्यानें केलेल्या नानाविध सुधारणांचीहि विस्तृत माहिती येथें दिलेली आहे. ज्ञानाची अनिवार भूक असलेला विद्यार्थी व प्रजाहितदक्ष राजा – पीटरच्या स्वभावाच्या या दोन्ही बाजूंचें दर्शन हृदयंगम आणि उद्बोधक आहे यांत संशय नाहीं. ]

पीटर अवघा अठरा वर्षांचा होता. पण इतक्या लहानपणींसुद्धां त्याच्या अंगांत बरीच आवरशक्ति व हें करीन तें करीन असा हव्यास होता. पीटरच्या शिक्षणासाठीं शिक्षक नेमलेले होते. परंतु ते मोठे बोजड, आळशी व आपला धंदा नीट न जाणणारे असे होते. शिक्षकांच्या हातून असें पीटरचें कांहींच बरें झालें नाहीं. पण जात्याच त्याचा अंकुर फार जोराचा होता. पीटर म्हणजे मूर्तिमन्त जिज्ञासा होता असें म्हणावयास हरकत नाहीं. तरी कांहीं प्रास्ताविक शिक्षण म्हणून हवेंच असतें. पण चार ओळींसुद्धां व्याकरणशुद्ध लिहावयास त्यास शिकविलें नव्हतें ! जहाजें बांधावयाची विद्या त्याला एका डच माणसानें शिकविली. गॉर्डन नांवाचा एक स्कॉच सरदार रशियन फौजेंत नोकरीस होता, त्याजकडून पीटरनें लष्करी शिक्षण घेतलें. थोडें जुजबी अंकगणित त्यास शिकविलेलें होतें. इतर युरोपियन भाषांपैकीं फक्त डच भाषाच काय ती त्यास बोलतां येत असे. तेव्हांच्या राजपुत्रांच्या मानानें हें शिक्षण कांहींच नव्हतें. रशिया म्हणजे एक भला आडदांड, अर्बुज, असंस्कृत, व चरचट लोकांचा देश होता. सगळेच लोक केवळ गांवढे असत. कायदे फार थोडे. देशांत हालचाल काय ती चोर-दरवडे-खोर करतील ती इतकाच प्रकार होता. राजघराणें व कांहीं सरदारांचीं घराणीं यांचेंच लक्ष काय तें वरिष्ठ प्रकारच्या हालचालींत गुंतलेलें असावयाचें. बाकी सर्व आपापल्या व्यवसायांत गुंतलेले. राजकारणाच्या उलाढाली करणारे तरी कांहीं विशेष फिरलेले, नव्या कल्पना आणणारे, ज्ञानाचे लोभी, देशाचे कडकडून अभिमानी असे होते म्हणाल तर तसेंहि नाहीं. कांहीं अडाख्यांवर कामें करणारे व हळूहळू मिळत जाणाऱ्या अनुभवानें शहाणे होत जाणारे, असे लोक असतात; त्यांतलेच हे लोक असत. मोंगल, तार्तार, कोसॅक इत्यादि बिलंदर भामट्यांशीं नित्य वागण्याचा प्रसंग असल्यामुळें त्यांच्या वृत्तींतहि रानवटपणा भरला होता. माणसांचीं नाकें कापणें, हात तोडणें, जीव घेणें, वगैरेंत विशेष उग्र असें त्यांना कांहींच वाटत नसे.

असल्या लोकांतच पीटर वाढलेला होता. अर्थात् त्या मानानें तोहि असला जंबूशेरी वळणाचाच माणूस होता. राजाचा मुलगा म्हणून त्याच्यावर कांहीं अभिजातपणाची तकतकी दिसे असें मुळींच नाहीं. बोलणें-चालणें, निदान लहानपणाचे मनाचे व्याप, करमणुकीचीं साधनें, थट्टा-

मस्करी यांच्या पद्धती, यावरून हा माणूस केवळ जाडाभरडा व राकट संवयींचा असा दिसे. राजा झाल्यावर टकरी लावणें, लटक्या लढाया लावणें यांत वाटेल तेवढा वेळ तो घालवी. रक्तपात झाला तरी त्याच्या मतानें ती खोटी लढाई असावयाची ! शोभेची दारू उडवावयाची म्हटली कीं, इतकी बेसुमार उडवावयाची कीं, गांवांतल्या घरादारांना आगी लागल्या तरी याची हौस चाललेलीच असावयाची. पण इतकेंहि असलें तरी हें ध्यानांत हवें कीं, या वेळीं तो केवळ पोरसवदा माणूस होता.

मॉस्को शहराच्या शेजारीं एक सरोवर आहे. तेथें नावा बांधण्याचें काम सुरू होतें. त्याकडे पीटरचें लक्ष फार असे. अर्थात् एकदां समुद्र तरी काय असतो हें पाहावें म्हणून तो वयाच्या एकवीस-बाविसाव्या वर्षीं आर्कैंजल येथें आला. तेथील समुद्राचा तो गंभीर घोष ऐकून व अफाट विस्तार पाहून त्याच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. इतर देशांच्या नाविकांच्या नवलकथा, इंग्लंड, हॉलंड, स्पेन इत्यादि देशांतील शूर दर्यावर्दी तांडेलांचे पराक्रम व त्यांनीं केलेलें इतर देशांचें आक्रमण यांविषयीं पुष्कळ गोष्टी त्यानें ऐकल्या होत्या. समुद्र पाहून त्याला उल्हास वाटला आणि हा दर्या हस्तगत झाला तर आपलें वैभव वाढेल व इतर युरोपियन राष्ट्रांशीं आपली बरोबरी होईल असें त्याच्या मनानें घेतलें. त्यानें आपले कांहीं स्नेही परदेशीं धाडले, अशासाठीं कीं, त्यांनीं नव्या विद्या रशियांत आणाव्या. पण त्याचें समाधान होईना. आपण स्वतःच जाऊन सर्व देश पाहावे, राजकारणी लोकांशीं बोलावें, व विशेषतः निरनिराळ्या विद्या शिकाव्या अशी त्यास इच्छा झाली. दरम्यान अझोवच्या अंगास कांहीं युद्धप्रसंग निघाला. राजा म्हणून हाहि लढाईत होता. तेथें शत्रूंनीं याच्या फौजेस चांगलें चोपलें. पुढील वर्षीं तयारी करून तो पुन्हां गेला व त्यानें तें ठाणें घेतलें. तेथें त्याच्या ध्यानांत आलें कीं, राजा होणें फुकटचें काम नाहीं. इतउत्तर काळांत शेजाऱ्याशीं व युद्धांत तरबेज असलेल्या स्वीडन देशाशीं युद्धें करावीं लागणार हेंहि त्यास दिसत होतें. अर्थात् सगळ्या यूरोपभर फिरून नाना कला व हरतऱ्हेच्या विद्या या स्वतः अवगत करून घेतल्या पाहिजेत असें ठरवून तो परदेशीं जावयास निघाला. ही गोष्ट दिसावयास साधी वाटते. पण सर्व इतिहासांत हिला जोड नाहीं. आपल्या देशाच्या

उत्कर्षासाठीं स्वतः शहाणें झालें पाहिजे व आपण विद्यार्थीपण पत्करून, क्षुल्लकपणा घेऊन, प्रजाजनांना घडी लावून दिला पाहिजे ही वासना राजालाच झाल्याचीं उदाहरणें इतिहासांत इतरत्र सांपडणार नाहींत.

आपण विद्या व कला शिकावयास परदेशीं जात आहों असें पीटरनें आपल्या प्रजेस केव्हांहि सांगितलें नाहीं. इतर राजेलोकांशीं राजकारणें करण्याकरितां आपण जात आहों असें सांगून व 'पीटर मिहिलो' हें टोपण नांव धारण करून तो बाहेर पडला. रिगा, लिबो या गांवांवरून तो कोनिंग्ज-बर्गकडे गेला. त्या वेळीं स्वीडन देशाची हद्द बाल्टिक समुद्राच्या अलीकडे मुख्य भूप्रदेशावर पुष्कळच पसरली होती व बाल्टिक समुद्र म्हणजे स्वीडिश राज्याच्या पोटांत असलेल्या प्रचंड सरोवरासारखा होता. स्वीडिश लोक मोठे भांडखोर होते; त्यांचा उपद्रव रशियाला फार होई. म्हणून पीटरनें जातां जातां त्यांच्याविरुद्ध इतरांशीं कांहीं करारनामे करण्याची खटपट केली. पण तिचा उपयोग झाला नाहीं. रशियाला समुद्रकिनारा नाहीं ही गोष्ट त्याला येथें फार जाणवली व तो मिळविणें म्हणजे बाल्टिकच्या दक्षिणेस असलेला स्वीडिश अंमल कायमचा उठविल्याशिवाय भागावयाचें नाहीं ही बाब त्याच्या मनांत कायम ठसली.

एके जागीं त्यानें एक अपराध्यास फांशी देण्याचें चक्र पाहिलें. त्यावर बांधून घालून गरगरां भोंवडून अपराध्यास कसें मारतात हें त्यास पाहावयाचें होतें. कारण आपल्या देशांतहि ही पद्धत त्यास सुरू करावयाची होती. पण त्या वेळीं कोणी फांसाचें गिऱ्हाईकच तेथें मिळेना! तेथून तो पोलंडकडे वळला व मग हॉलंडकडे गेला. वाटेनें त्याची सुधारणाप्रियता ऐकून लिब्निज नांवाच्या तत्त्ववेत्त्यानें एक मोठी थोरली योजना त्याच्यापुढें हजर केली. पीटर म्हणाला, "मला इतक्या भानगडी नकोत. तुला जहाजें कशीं बांधावयाचीं हें शिकवितां येत नाहीं ना? मग तुझें काल्पनिक कोळ्याचें जाळें ठेवून दे." आमस्टरडॅमच्या जवळ समुद्रकांठच्या एका खेड्याला तो पुढें गेला. तेथें बोटींत बसून वल्हवणें, मच्छीमार लोकांशीं सारखें बोलत राहाणें, यांत तो गुंग होऊन गेला. पण त्याच्या जिज्ञासेला डोळे फार होते. सडकेनें फिरतांना कोठें पूल दिसला कीं, गाडींतून उतरून त्यानें त्याची

अनुक्रम ... विभाग ...

लांबीरुंदी मोजावी, कोठें गिरणी दिसली कीं, ती कशी चालते हें बारकाईनें पाहावें किंवा विशेष बरी वसति कोठें दिसली कीं, तेथें शिरून त्या घरांची पाहाणी करावी असा त्याचा शिरस्ता असे. आपण राजे, तेव्हां या गोष्टी कशा कराव्या असा विचार त्याला शिवलाहि नाहीं. यंत्रें पाहिलीं कीं, पराकाष्ठेचा मोह त्याला पडे व त्यांच्या गतीची आणि जोराची त्यास कल्पना नसल्यामुळें तो भलतेंच कांहीं तरी करी. एकदां एक रेशमाची गिरणी पाहात असतां तिचें झपाट्यानें गरगरणारें चाक हातानें थांबवण्याचा प्रयत्न त्यानें केला! थोड्यांत चुकलें नाहीं तर तेथेंच सगळा ग्रंथ आटपावयाचा! तो छापावयाची कला शिकला, खोदकाम शिकला, शरीररचनाशास्त्र व वस्तुधर्मशास्त्र यांचाहि त्यानें अभ्यास केला. रेखा-कला म्हणजे ड्रॉइंग तेंहि येत असलें पाहिजे असें त्यास दिसलें; कारण त्याशिवाय सुतारकाम नीट यावयाचें नाहीं व सुतारकाम आल्याशिवाय जहाज बांधण्याची कला यावयाची नाहीं हें त्यानें ओळखिलें होतें. या सर्वांचें ज्ञान मिळविण्याची त्याची खटपट अहर्निश चालू होती! शेवटीं आपल्या हातानें त्यानें एक जहाज बांधिलें तेव्हां त्याला पराकाष्ठेचा हर्ष झाला. आणि हीं कामें करीत असतां स्वतःची हंडी तो स्वतःच उकडीत असे. पण इतकें झालें तरी आमस्टरडॅम येथील जहाजाची कला त्याला इतकीशी पसंत पडेना, म्हणून त्यानें इंग्लंडास जावयाचें ठरविलें. तेथें जातांच टकशाळा, वेधशाळा, रॉयल सोसायटी इत्यादि संस्था त्यानें पाहिल्या. कारखान्यांत तो एखाद्या हमालासारखा राबूं लागला. हातांत घण, हातोडा, करवत घेऊन कामाच्या बारीकसारीक खाचाखोंचासुद्धां त्यानें माहीत करून घेतल्या. एकदां असाच हमालकामाचा झपाटा चालू असतां इंग्लडचा राजा त्याला भेटावयास कारखान्यांत आला होता. याप्रमाणें सर्व सामुद्रिक माहिती करून घेतल्यावर पीटर परत फिरला व स्वदेशांत मोठें बंड उद्भवल्याचें ऐकून कोठेंहि न रेंगाळतां त्वरेनें राजधानीस प्राप्त झाला. ही पीटरच्या ज्ञानार्जनाची हकीगत थोडक्यांत सांगून झाली आहे; पण एवढ्या वेळांत तो पहिल्या प्रतीचा नावाडी बनला, जहाजाचें बांधकाम करण्यांत पटाईत झाला, व शिवाय गोलंदाजीची विद्याहि पढला. पुढील वीस वर्षांत त्याला या सर्वांचा अतोनात उपयोग झाला.

पीटरनें आपल्या अर्धरानटी राज्यांत सुधारणा करण्यासाठीं स्वतः जे अपरिमित कष्ट केले त्यामुळें त्याचें नांव रशियाच्याच काय पण अवघ्या यूरोपच्या इतिहासांत अजरामर झालें आहे. पीटर पुढें येण्याच्या आधीं प्रगति घडवून आणण्यासाठीं खटपट करणारे लोक अगदींच नव्हते असें नाहीं; पण त्यांच्याहून जाणता आणि कष्टाळू असा एखादा म्होरक्या त्यांस हवा होता. पीटरच्या रूपानें तो त्यांस मिळाला. या लोकांच्या मदतीनें पीटरनें अनेक उलाढाली केल्या.

पहिल्या सपाट्याला त्यानें राज्यांतील सुभेदारपद्धति मोडून टाकली. रशिया देश अवाढव्य आहे. त्याचे अनेक सुभे पाडून त्यांवर कारभारासाठीं सुभेदार नेमलेले असत. या सुभेदारांना मोठमोठ्या जहागिरी असत, पण पगार मात्र मुळींच नसे. आपल्या इकडेहि हाच प्रकार पूर्वीं होता. आपल्या जहागिरीचें उत्पन्न खाऊन सुभ्याचा कारभार चालवणें हें वास्तविक यांचें काम होतें. पण कारभारांत टंगळमंगळ करून आपल्या उत्पन्नाबरोबर सुभ्याचें उत्पन्नहि खाण्यास हे लोक सोकावलेले होते. पीटरनें ही जहागिरदारी बंद केली व प्रत्येक कामगाराला त्या त्या जागेचा पगार नेमून दिला. सुभेदारांच्या प्रांतांचीहि गुंतागुंत झालेली होती. एकाच गांवावर अनेकांनीं आपला हक्क सांगावा असें झालें होतें. त्या वांटण्या त्यानें नीट आंखून दिल्या. या सुधारणा करतांना कित्येक अमीर-उमरावांचा रोष त्याला सहन करावा लागला. पण तो रोष झाला तरी बेहेत्तर असें म्हणणारा पीटर होता. याप्रमाणें रशियाचे त्रेचाळीस प्रांत पाडून प्रत्येक सुभेदारास वरिष्ठाकडे कारभाराचा जाब देणें प्राप्त झालें.

पुढें पीटरनें अष्टप्रधान अथवा दशप्रधान पद्धति सुरू केली व परदेशी राजकारण, युद्ध, आरमार, खजिना, कायदा इत्यादि दहा खात्यांवर दहा मंत्री नेमिले. ही वरील कारभाराची व्यवस्था झाल्यामुळें सरदारांचा लुटारूपणा थांबून प्रजेला हायसें झालें आणि कामाची वांटणी खातेवार झाल्यामुळें एकेका प्रकरणाचा निकाल होऊ लागून प्रजेला सुख होऊं लागलें. प्रजेच्या अंगीं लागण्यासारख्या आणखी दोन सुधारणा त्यानें केल्या. परदेशांशीं लढाई चालू नसणें म्हणजे शांतता आहेसें मानणें अशी चाल असे. पीटरनें हा अर्थ बदलला. प्रजेला आपल्या व्यवहाराला सोपेपणा व निर्धास्त-

पणा प्राप्त झाला तरच ती खरी शान्तता हें पाहून त्यानें पोलिस खातें चांगलें बलिष्ठ केलें आणि सर्व देशभर चोऱ्या, मारामाऱ्या करीत फिरणाऱ्या उच्चल्या उडाणटप्पूंच्या मागें शिपायांचा ससेमिरा सारखा लाविला; इतका कीं देशांत चोऱ्या, मारामाऱ्या बंद झाल्या. खोटीं नाणीं पाडणारे व चोर यांच्या बातम्या प्रजेनें सरकारांत ताबडतोब कळविल्या पाहिजेत असा सक्त दंडक त्यानें घातला. या सुधारणेनें एकंदर जनसमूहाची पीटरवर विलक्षण भक्ति बसली. धार्मिक बाबतींतहि त्यानें हात घातला. धर्मगुरूंच्या मठांकडे मोठमोठालीं उत्पन्नें होतीं. प्रत्येक घराचा एक धर्मोपदेशक असे. यामुळें मठांत उपदेशकांची म्हणजे जोगी आणि जोगतिणी यांची गर्दी जमलेली असे. पीटरनें ओळखलें कीं धर्मोपदेशकांची जरूरी असली व त्यांचें चालावें म्हणून उत्पन्नें हवीं असलीं तरी घरटीं एक उपदेशक असण्याची जरूरी नाहीं त्यानें एक आचार्यमंडळ नेमून उपदेशकांचें स्वतंत्र खातें बनविलें व त्याच्याद्वारां सरकारी उत्पन्नें फुकट खाणारे हजारों ऐदी लोक मठांतून पिटाळून लाविले.

याप्रमाणें हातीं असलेल्या उत्पन्नाची शिस्तवार वांटणी, त्याच्या सुयुक्त विनिमयावर राज्यकारभाराची घडी, व प्रजेच्या सुखाची वाढ हीं कायम करतांना उत्पन्न वाढविल्याशिवाय नवीन गोष्टींचा उपक्रम करतां येत नाहीं हें पीटर ओळखून होता. रशियाच्या बाजारपेठा तेव्हां परदेशी मालानें भरलेल्या असत. पीटरनें सर्वत्र प्रवास केला तेव्हांच कोण कोण परके लोक रशियांतील पैका खाऊन गबर होत आहेत, हें त्याच्या ध्यानांत येऊन चुकलें होतें. म्हणून देशी उद्योगधंद्यांना त्यानें हरतऱ्हेनें उत्तेजन दिलें. उगाच इकडे तिकडे भटकून लोकांच्या दातृत्वाचा गैरफायदा घेणारे सहस्रावधि लोक त्यानें धनोत्पादक धंद्यांत राबावयास लाविले. खाणींचे शोध लावून लोखंडाचा व्यापार त्यानें सुरू केला. परदेशी कारागिरांच्या पगारी मदतीनें त्यानें उंची कापड, पायमोजे, कांतडी सामान इत्यादि धंदे उभारून शेतकऱ्यांच्या हितासाठीं औतें व जनावरांची पैदास या कामांकडेहि लक्ष पोहोंचविलें. या उद्योगाचें माप पंधरा वर्षांच्या अवधींत त्याला उत्तम काढतां आलें. कारण राज्याचें मूळचें तीस लक्षांचें उत्पन्न एवढ्या अवधींत एक कोटीवर गेलें !

रशियाला शत्रू बरेच होते. त्यांच्याशीं झुंजतांना पीटरच्या ध्यानांत आलें कीं, आपली फौज म्हणजे केवळ बाजारबुणगे होत. पण तेहि पुरेसे मिळत नसत. म्हणून त्यानें लष्करी नोकरी सक्तीची केली. तिचें रूप मात्र असें होतें कीं, प्रत्येक परगण्यानें अमुक इतके शिपाई सरकारांत पुरविलेच पाहिजेत. प्रत्येक धडधाकटानें लष्करी शिक्षण घेतलेंच पाहिजे असें मात्र नव्हे. हळूहळू त्याची फौज बलिष्ठ झाली व तिच्या बळावर इतरांना त्याचा वचकहि जास्त बसूं लागला. बत्तीस हजारांपासून एक लाखापर्यंत त्यानें फौजेची वाढ केली. फौजेला शिक्षा देण्याच्या कामीं पीटर काळासारखा करडा होता. जो शिस्त मोडील त्याचें 'डोकें मेखसूखालीं' सडकलें जाईल असा त्याचा नियम असे.

शिक्षणाकडेहि पीटरचा ओढा अतिशय होता. ज्या माणसाला लिहिण्या-वाचण्याचा गंधहि नाहीं, त्याला सरकारी नोकरी देतां कामा नये, असें त्याचें मत असे. तसेंच ज्या सरदारांना सहीसुद्धां करतां येत नाहीं, त्यांच्या पदव्या काढून घेतल्या पाहिजेत असें तो स्पष्ट म्हणे. तो गादीवर बसला तेव्हां मठांतून शाळा असत, नाहीं असें नाहीं; पण तेथें शिक्षण म्हणजे इतकेंच कीं, र, ट, फ करीत बायबल वाचतां यावें व राजांची आणि पृथ्वीवरील देशांची जुजबी माहिती व्हावी. इ. स. १७१४ सालीं प्रांतों-प्रांतीं अमुक एक तऱ्हेच्या शाळा उघडण्यांत याव्या असा त्यानें हुकूम सोडला. पण अनेक खटपटी होऊन पांच वर्षांच्या मुदतींत मोठ्या मारा-मारीनें एक शाळा सुरू झाली आणि तिच्यांत अवघे सव्वीस विद्यार्थी दाखल झाले! सुधारणा करणारा असेल मोठा आकांक्षी आणि हिम्मतवान्; पण त्या सुधारणा तो कोणत्या लोकांत करीत आहे यावर पुष्कळच अवलंबून असतें. पीटरच्या ज्या अनेक सुधारणा केवळ मुंगीच्या पायानेंच चालू झाल्या त्यांतील शिक्षण ही एक होती. कित्येक लेखकांनीं त्याला दोषसुद्धां दिला आहे कीं, नाहीं त्या लोकांपुढें हा भला गृहस्थ विनाकारण डोकेफोड करीत बसला होता. पीटरनें देशाटन फार केलेलें असल्यामुळें हजारों गोष्टी त्यानें पाहिल्या होत्या. अर्थात् त्याला वाटे कीं, आपल्या देशांत त्या त्या सर्व असाव्या. पण सहस्रावधि वर्षांच्या ज्ञानविन्मुखतेंत आणि आळसांत खारलेले त्याचे ते 'देशबंधू' नव्या गोष्टी भराभरा पत्करीनात. स्थापत्य;

नौकानयन व गणित यांच्या अभ्यासासाठीं पाठशाळा जरूर हव्यात असें ठरवून सरकारांतून जी काय हरतऱ्हेची तरतूद करावयास हवी होती ती त्यानें केली. मोठमोठे पगार देऊन जर्मनी, इंग्लंड इत्यादि देशांतून प्रोफेसर लोकहि त्यानें आणविले. पण प्रश्न हा पडला कीं, त्यांच्यापुढें बसावयाचें कोणी ? स्थापत्याच्या कॉलेजमध्यें मोठ्या मिनतवारीनें तेरा विद्यार्थी आले. शेवटीं पीटरचा खरा स्वभाव प्रकट झाला. हे लोक बऱ्या बोलानें आपलीं मुलें शाळेंत धाडावयाचे नाहींत, हें पाहून स्वतःचीं आश्रित अशीं जीं कित्येक घराणीं होतीं त्यांतील ऐंशी मुलगे त्यानें निवडून काढले आणि त्यांनीं शिकलेंच पाहिजे अशी सक्ति आरंभिली. अर्थात् एवढ्या अवाढव्य देशांत हा प्रयत्न म्हणजे ' दर्यामें खसखस ' असाच होता. पण पीटरच्या धडपडीमुळें इतकें मात्र झालें कीं, विद्येसंबंधानें समाजांत जी उपहासबुद्धि होती ती नष्ट झाली आणि लिहितांवाचतां न येणें म्हणजे मोठी नामुष्कीची गोष्ट आहे इतकें त्यांस वाटूं लागलें. सन १७०७ सालीं एक छापखाना आणि कांहीं कंपॉझिटर असें साहित्य त्यानें मॉस्को राजधानीस आणविलें व तेथें छापण्याचें काम सुरू केलें. भाषा कोणती वापरावी असा प्रश्न पुढें निघाला; तेव्हां दरबारची भाषा हीच छापखान्यांत सुरू करावी असा निकाल देऊन त्यानें सर्व रशियाची एकच भाषा अथवा बोली करून टाकली. कारण जी भाषा छापली जाईल तीच शेवटीं लोक पत्करणार हें त्यास माहीत होतें. त्यानें लायब्ररी, पदार्थसंग्रहालय व कलाभुवन अशां-सारख्या संस्थाहि चालू केल्या व सन १७१३ सालीं मॉस्को शहरीं पहिलें वर्तमानपत्र सुरू केलें. त्या वेळेपर्यंत सृष्टीच्या आरंभापासून कालगणना करण्याची व वर्षारंभ सप्टेंबरांत धरण्याची चाल रशियांत होती. ती त्यानें बंद करून इतर खिस्त्यांचा प्रघात उचलला. यावरून दिसून येईल कीं, पीटरची दृष्टि फार फांकली होती, व स्वदेशकल्याणाची त्याची इच्छा केवळ अनिवार होती.

घरगुती व व्यक्तिविषयक आचारांत आणि चालीरीतींत सुद्धां त्यानें उलथापालथी केल्या. त्याच्या कालापर्यंत बायकांनीं म्हणजे झांकूनपाकूनच राहिलें पाहिजे अशी सक्ति असे. पीटरनें ही चाल साफ मोडून टाकली. व वागणुकीचे नवे दंडक घातले. म्हणजे असें कीं पूर्वेकडील चाली मोडून

पश्चिमेकडील सुरू केल्या. पूर्वीचा पोषाखसुद्धां त्यानें फेंकून दिला आणि जरा तरतरीत दिसेल असा नवा पेहराव कसा करावा हें त्यानें लोकांस शिकविलें. फ्रान्स इत्यादि देशांतील सोज्वळ, दिसण्यांत ठाकठिकीचीं व शारीरिक सौंदर्याकडे बारीक लक्ष देणारीं माणसें त्यानें पाहिलीं होतीं. पण घरीं पाहावें तों हजामती वाढलेले, बोकडासारख्या दाढ्या पिंजारलेले, असले घामट, गबाळशाही आणि घाणेरड्या पिंवळ्या दातांचे सगळे लोक! शेवटीं चिडून जाऊन त्यानें कायदा केला कीं, सर्वांनीं दाढ्या केल्या पाहिजेत; जो करणार नाहीं त्याला दंड ठोठावण्यांत येईल! ही तऱ्हा पाहून एकदां हॉलंडचा वकील म्हणाला, "सरकार, हें काय चालू आहे?" पीटरनें उत्तर केलें, "गाढवांचीं माणसें बनवीत आहें."

पीटरच्या अंगच्या अशा विविध प्रकारच्या कर्तबगारीमुळें त्याच्या वैगुण्यांकडे आपलें लक्ष इतकेसें जात नाहीं. अपराध्यांना शिक्षा कराव्या किंवा करूं नयेत याचा कसलाहि विवेक तों करीत नसे. कोठें बंडें उठलीं तर बंडखोरांची कसलीहि गय न करतां, त्यांचा बीमोड करून तो त्यांस इतकें हैराण करी कीं, त्यांना 'त्राहि भगवन्' होत असे. नीतिविचारहि त्याला अगदीं वावडा होता. रोजच्या रोज दारू ढोसून झिंगून पडण्यांत त्याला कांहींच विशेष वाटत नसे. एरवींहि तो स्वभावानें उथळ, उतावळा किंबहुना पोरकट असे. एखादें कांहीं चांगलें वर्तमान आलें तर मोठमोठ्यानें घसा फोडून भोंवतालच्या सर्व लोकांना तो तें सांगत असे. कोणत्याशा एका युद्धानंतर त्याला हवा होता तसा तह ठरल्याचें ऐकल्याबरोबर भर चव्हाट्यावर तो प्रत्यक्ष नाचूं उडूं लागला! राजधानींत नेहमीं आगी फार लागत. त्यांतूनच त्यानें एकदां करमणूक करून घेतली. एके दिवशीं आग लागल्याचीं शिंगें गांवभर उगीचच्या उगीच वाजवावीं म्हणून त्यानें बंबवाल्यांना सांगितलें. लागोपाठ बोभाटलेल्या ठिकाणीं लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटल्या; त्यांजकडे पाहून डोळे मिचकावून पीटर म्हणाला, "आगबीग कांहीं नाहीं, तुमची थोडी गंमत केली!" पण खुद्द राजेसाहेब व प्रजा या सांस्कृतिक दृष्टया एकाच तोलाच्या असल्यामुळें असल्या गोष्टींचें कोणाला कांहीं वाटत नसे. हें सर्व खरें असलें तरी त्याला कामाचा कंटाळा नसे.

रोज पहांटे पांच वाजतां उठून, सर्व विधी उरकून तो शिरस्तेदाराला कामाला बोलवी. सात वाजतां अठरा कारखाने तपासावयास निघे. परत येऊन एक वाजेपर्यंत टपाल रवाना करी. मग जेवणखाण इत्यादि होई. जेवणांतहि फारसा खादाडपणा नव्हता. उगाच शंभर हजार वाढपे आणि आचारी तो मुदपाकखान्यांत बाळगीत नसे. कामें उरकणारा जबरदस्त असे. एक परराष्ट्रीय वकील लिहितो : ' हा राजा म्हणजे रशियांत उभ्या असलेल्या एखाद्या उंच शिखरासारखा आहे. शहाणपणा, बारकाई, अवलोकन, विचारांचा स्पष्टपणा आणि मनाची बळकटी या गुणांत याला तोड नाहीं. ' खरोखर सध्यांच्या रशियन जीविताचें असें एकहि अंग नाहीं कीं, ज्यावर पीटरच्या हाताचा ठसा उमटलेला नाहीं. त्याच्या कल्पनेला विधायकपणा व हाताला यश विलक्षण होतें. सुधारणेपुढें आपलें शरीरसुख, नाजुक नातीं आणि विरोधाचें बुजगावणें हीं त्यानें कःपदार्थ मानलीं. त्याचें सर्व आयुष्य म्हणजे कर्तबगारीनें खेंचून भरलेलें एक त्रेपन्न वर्षें उंचीचें लहानसें पोतें होतें. अहोरात्र कष्टांनीं शरीराला झीज येऊन नव्या रशियाला जन्म देणारा हा कर्मशूर राजा वयाच्या केवळ त्रेपन्नाव्या वर्षी म्हणजे इ. स. १७२५ सालीं मरण पावला.

---

## कठिण शब्दांचे अर्थ

अर्बुज = रानवट, गांवढळ. मोगल, तार्तार, कोसॅक = रशियांतील रानटी टोळ्या. जबूशेरी = आडमुठा, गांवरान. ( जंबूशेरी ही एक ज्वारीची जात आहे. ही जात फारशी उच्च समजत नाहींत. म्हणून जंबूशेरी म्हणजे गांवरान. ) वस्तुधर्मशास्त्र = पदार्थविज्ञानशास्त्र. अहर्निश = रात्रंदिवस. हंडी = भाताचें भांडें, रोजचें जेवण. टंकशाळा = छापखाना. वेधशाळा = आकाशस्थ तारे व ग्रह यांचें दुर्बिणींतून निरीक्षण करावयाची जागा. सामुद्रिक = समुद्र-विषयक. गोलंदाजी=तोफ उडविण्याची कला. अंगीं लागण्याजोगा = हितावह होण्याजोगा. ससेमिरा = त्रास, कटकट. जोगीजोगतिणी = योगी व योगिनी. घरटी = घरागणिक एक. ऐदी = आळशी. सुयुक्त = योग्य. मेखसू = लोखंडी,

जाड टोकाचा दांडा.(पेशवाईमध्यें मोठ्या गुन्हेगारांचें डोकें मेखसूखालीं सडकलें जाई.) येथें अत्यंत कडक शिक्षा अशा अर्थी हा वाक्प्रचार योजिला आहे. जुजबी = मामुली. खारलेले = मुरून गेलेले. स्थापत्य = इमारती, पूल वगैरे बांधण्याची कला. बोभाटलेल्या = बोभाटा झालेल्या. अठरा कारखाने = कामाचीं निरनिराळीं खातीं. कर्मशूर = कर्तृत्वसंपन्न.

## अभ्यास

(१) विद्या मिळविण्यासाठीं पीटर परदेशांत गेला असतां तो तिकडे आपली दैनंदिनी (डायरी) ठेवीत असे अशी कल्पना करा व या दैनंदिनींतील एका दिवसाचे त्याचे उतारे द्या.

(२) 'पीटरच्या जिज्ञासेला डोळे फार होते.' या विधानाचें स्पष्टीकरण द्या. पीटर ज्या निरनिराळ्या विद्या शिकला त्यांची थोडक्यांत माहिती देऊन पुढील राज्यकारभाराच्या दृष्टीनें त्या विद्यांची उपयुक्तता सांगा.

(३) 'पीटरनें केलेल्या सुधारणांवरून त्याची दूरदृष्टि आणि देशहिताची कळकळ आपणांस दिसून येते.' कशी तें सांगा.

(४) 'सध्यांच्या रशियन जीवनाचें असें एकहि अंग नाहीं कीं, ज्यावर पीटरच्या हाताचा ठसा उमटलेला नाहीं.' या विधानाचें स्पष्टीकरण द्या.

(५) 'नव्या रशियाला जन्म देणारा कर्मशूर राजा' असें लेखकानें पीटरचें वर्णन केलें आहे. पीटरनें 'नवा रशिया' कसा निर्माण केला तें सविस्तर सांगा.

● ● ●

## पहिला वसन्त : : ३

[ 'अनामिका' या पुस्तकांतील 'पहिला. वसन्त' या लेखाचा हा शेवटचा भाग आहे.

मानवजात ज्या वेळीं अगदीं बाल्यावस्थेंत होती त्या वेळच्या निसर्गाचें चित्र या लेखांत लेखकानें रेखाटलें आहे. चारी दिशांना प्रचंड डोंगर आकाशाला जाऊन भिडले होते. त्यांच्यावर बर्फाचीं जाड आस्तरणें पसरलीं होतीं. दऱ्याखोऱ्यांतून हिंस्र श्वापदांच्या गर्जना उठत होत्या. पठारांखालच्या तळवटांत दोनदोन पुरुष उंचीचीं गवतें माजलीं होतीं. त्या रम्य आणि भयानक परिसरांतलि प्रत्येक वस्तु अगदीं ताजी, नवी, सार्द्र आणि रसाळ दिसे. या रम्यभीषण निसर्गाच्या आणि हिंस्र श्वापदांच्या सहवासांत आपले पूर्वज त्या वेळीं राहात असत. त्या काळचा मानव हा जवळजवळ पशूप्रमाणेंच असावयाचा. स्नान करणें, वस्त्रें परिधान करणें, अन्न शिजवून खाणें, घरें बांधून त्यांत राहाणें, आणि भाषेच्या योगानें आपलें मनोगत परस्परांना कळविणें, संस्कृतीचे हे कोणतेहि विशेष त्या वेळच्या मानवांना अवगत नव्हते. त्या वेळचा मानव कच्चेच प्राणी खाई. गुहांमधून वसति करी आणि वानरांसारखा कचकचाट करून एकमेकांशीं बोले.

अशा रीतीनें मानवप्राणी हा निसर्गासन्निध राहात असतां भोंवतालच्या सृष्टींत एकदां एक विलक्षण क्रान्ति घडून आली. थंडगार वारे वाहूं लागले. झाडांची पालवी झडली, वृक्षांचीं पर्णहीन खोडें भेसूर दिसूं लागलीं आणि पांखरें निवारा सोडून दूर उडून गेलीं. सृष्टीचें हें बदललेलें रूप पाहून मानव भयभीत झाला. आपल्या जीवनाचा अंतच जवळ आला कीं काय असें त्याला वाटूं लागलें. धडधडत्या छातीनें आणि भयभीत अन्तःकरणानें तो आपल्या सभोंवतालच्या सृष्टीचें तें भयाण स्वरूप बघत राहिला.

आणि मग एकाएकीं एक चमत्कार झाला. सुखदायक उष्ण वारे वाहूं लागले. झाडांच्या अंगांत चैतन्य संचरलें. त्यांच्या छिद्रांतून नवे अंकुर फुटले. झाडें तांवूस पालवीनें गजबजून गेलीं. परागंदा झालेलीं पांखरें पुन्हां आपापल्या घरट्यांत आलीं. चहूंकडे पक्ष्यांची मंजुळ किलबिल सुरू झाली. फांद्याफांद्यांवरून फुलांचे घोंस लोंवूं लागले आणि जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला. ही सारी किमया त्या पहिल्या वसन्त ऋतूची होती. सृष्टीला आनंदित व सौंदर्यसंपन्न करणाऱ्या वसन्ताचें स्वागत मानवप्राण्यानें मोठ्या आनंदानें केलें. झाडांची पालवी पाहून त्यानें वस्त्र परिधान केलें, पांखरांचें कूजन ऐकून तो गाऊं लागला आणि वृक्षांभोंवतीं फेर धरून त्यानें नर्तन केलें! वसन्त आला आणि त्यानें मानवाला संस्कृतीचा, सुधारणेचा पहिला धडा शिकविला!

त्या वसन्ताच्या आगमनाचें वर्णन पुढील उताऱ्यांत प्रा. माटे यांनीं केलें आहे. ‘देवाचे खरे लाडके कोण?’ या लेखाप्रमाणेंच पुढील लेखांतहि त्यांच्या सूक्ष्म निसर्गनिरीक्षणाची व रम्य कल्पकतेची आपणांस उत्तम साक्ष पटते. ]

पंधरा वेळां सूर्य डोंगराआडून बाहेर आला आणि पंधरा वेळां डोंगराआड गरंगळत खालीं गेला. ‘जगत्’ म्हणावयाचें पण तें सर्वथा स्थिर होतें. पण सूर्याच्या खेपा वायां गेल्या नाहींत. तुझें गेलेलें वैभव तुला परत करीन, असें पृथ्वीला बजावीत बजावीत तो नित्य येत जात होता. अशी त्याची ईर्षा दिसत होती. मात्र कांहीं वेळपर्यंत खिन्न होऊन, तोहि आपल्या मार्गावरून ढळल्यासारखा झाला होता. होतां होतां त्याच झाडांच्या अंगांवरून आणि फांद्याफांद्यांतून निराळे वारे वाहूं लागले. या वाऱ्यांच्या झोतांनीं पृथ्वीवरील पसरलेला सगळा जीर्ण पसारा नाहींसा झाला आणि त्याच्या झुळुकांनीं झाडांच्या आणि वेलींच्या त्वचेला सुख उत्पन्न होऊं लागलें. कांहीं नवा संदेश या झुळुकांबरोबर आला होता काय? कदाचित् आला असावा. कारण ते जबरदस्त अश्वत्थ वृक्ष आणि ते जटाधारी वटवृक्ष थोडे टवटवीत वाटूं लागले. त्यांचीं अंगें नव्या रसांनीं भरल्यासारखीं झालीं. ते आतां

आपल्या रन्ध्रारन्ध्रांतून कांहीं संतोषाचा, आनंदाचा, हर्षाचा उद्गार काढणार असें वाटूं लागलें. त्यांच्या रन्ध्रांतून तांबूस अंकुर फुटूं लागले. अश्वत्थाचा सगळा देह दरदरून गेला. प्रत्येक अंकुरानें अश्वत्थ वृक्ष उल्हासाचें अस्फुट हास्य करीत आहेसें दिसूं लागलें. अरण्यांतील सर्वच वृक्षांच्या अंगांत आल्यासारखें झालें. सावधपणानें जपून, हळूहळू, ती गव्हरांतील अर्बुज प्रजा, डोळे ताठ करून, एकमेकाला धरून, आपापल्या खबदाडांतून बाहेर पडूं लागली आणि झाडांच्या कोंवळ्या डिक्शांना हात लावून पाहूं लागलीं. हात लावून तीं एकमेकांकडे वळलीं आणि त्यांना जर बोलतां येत असतें तर ' हा काय चमत्कार आहे ? ' म्हणून त्यांनीं एकमेकांस विचारलें असतें. रात्रीं गुहेच्या दारांत जागत बसलेल्या व आतां उंच नाक करून जोराजोरानें घोरत पडलेल्या त्या आडदांड बाप्याकडे हीं माणसें परत गेलीं आणि ढोसढोसून त्यांनीं त्याला जागें केलें. तोडून आणलेल्या ओंजळभर तांबूस डिक्शा त्यांनीं त्याच्यापुढें ठेवल्या. सर्वजण धांवत झाडांच्या गर्दींत प्राप्त झाले. त्यांचीं तोंडें उजळलीं. चार पांच दिवसांत झाडांचे बुंधे, फांद्या, डहाळ्या अर्धवट उमललेल्या तांबूस पानांनीं गजबजून गेल्या. ' ही ही ही ' करून हीं उघडींनागडीं माणसें झाडांच्या भोंवतीं फिरत राहिलीं आणि नाचूं लागलीं. त्यांनीं हातांत हात घातले आणि झाडावेलीभोंवतीं ' ही ही ही ' करींत तीं नाचूं लागलीं. माणसें नाचावयास शिकलीं. जिकडे पाहावें तिकडे लक्षावधि मुगारे; कोंवळीं लुसलुशीत पानें ! झाडांना नवें वैभव प्राप्त झालें. त्यांची पूर्वींची ऐट परत येणार असें दिसूं लागलें. आतां ती लपलेली प्रजा निःशंकपणानें बाहेर पडली. सूर्याचें उगवणें सुशोभित दिसूं लागलें आणि गुलाबी वस्त्रें पांघरलेल्या त्या झाडांचीं प्रतिबिंबें पाण्याच्या सपाट आरशांत पडून झाडांची शोभा द्विगुणित झाली. होतां होतां पानें हिरवींगार झालीं. पानांची पालवी झाली आणि सर्व वृक्षराज व लताराणी गारीगार झाल्या. त्यांच्याभोंवतीं रोज सकाळीं, संध्याकाळीं त्यांची बदलती शोभा पाहात, ते रानवट घेर धरून नाचूं लागले. भोंवतीं भोंवतीं हिंडतां हिंडतां त्यांतलाच हिरवा पाला त्यांनीं आपल्या कमरेभोंवतीं बांधला. तीं माणसें उल्हासानें नाचूं लागलीं. तीं नाचावयास शिकलीं आणि झाडांचें अनुकरण करून त्यांनीं आपल्या कमरेभोंवतीं पाळवी बांधली आणि तीं मग लाजावयास

शिकलीं. झाडांचीं प्रतिबिंबें कवटाळावयास तीं पाण्यांत उतरलीं; आणि त्यांचीं अंगें स्वच्छ झालीं; त्यांचे केंस पाण्यानें सडक झाले. सर्व सृष्टि हर्षनिर्भर झाली. माणसानें स्नान केलें, वस्त्र परिधान केलें, आणि बेहोष होऊन नर्तन केलें.

झाडें नव्या पालवीनें गजबजून गेलीं. फुलांचे झुपकेच्या झुपके त्यांच्या अंगांवर लोंबूं लागले. सहस्र पाकळ्यांचा घमघमाट सगळ्या रानभर दरवळला. दरम्यान पांच सहा कावळे येऊन गेले होते. त्यांच्या कावकावीनेंसुद्धां तीं अर्बुजें शहारित झालीं होतीं. इतक्यांत चारहि दिशांनीं पक्ष्यांचे थवेच्या थवे परत आले. गांवाहून परत आल्यावर जसें आपण आपल्या घरांत शिरतों तसे हे पक्षी आपापल्या पूर्वीच्या ठिकाणीं शिरले; आणि हर्षभरित होऊन त्यांनीं आपल्या कलकलाटानें सारें गगन भरून सोडलें. हात उंच करून ‘ हो हो हो ’ करीत तीं माणसें नाचूं उडूं लागलीं आणि संध्याकाळीं झाडांभोंवतीं घेर धरला असतां, वरच्या कोकिळेचें कुहू कुहू आणि साळुंकीची सुरेल तान ऐकून त्यांनींहि कुहू कुहू करावयास आणि आवाजानें तान मारावयास सुरुवात केली. एकमेकांचे हे स्वर ऐकून तीं हंसत आणि कोकिळा व साळुंकी पुन्हां ओरडते का हें पाहावयास थांबत. त्यांचे स्वर पुन्हां ऐकतांच तीं पुन्हां गाऊं लागत ! सृष्टीचें वैभव परत येतांच माणसें गाऊंहि लागलीं; त्यांनीं स्नानें केलीं. त्यांचे देह स्वच्छ झाले; त्यांचे केंस पाण्यानें सडक होऊन पाठीवर लोंबूं लागले. त्यांच्या कमरेभोंवतीं पाल्याचें आवरण आलें. तीं हातांत हात घालून घेर धरून गाऊंहि लागलीं ! नेमकें आठवत नाहीं. पण हें सगळें वसंताच्या आगमनाबरोबर झालें एवढें खरें. चित्रविचित्र पानें-फुलें अर्पण करणाऱ्या चैत्र महिन्यांत हें झालें. भावी काळांत ‘ संस्कृति, संस्कृति ’ शब्दांनीं गौरविलेल्या आमच्या वैभवाचें हें आरंभस्थान होय. त्या वैभवाची ही जन्मभूमि होय. ज्या वसंताच्या आगमनामुळें हें घडलें तो वसंत धन्य होय. माणसांना माणुसपणा आला आणि मानवी जीविताला शोभा आली. त्यांना नीट बोलतांहि येत नव्हतें, मग मोजतां कोठें येणार ? आणि काळ मोजावा ही कल्पना तरी कशी आलेली असणार ? यानंतर किती सहस्र वर्षांनीं माणसाला ‘ एक ’ या शब्दाचा उद्भव व बोध झाला कोणास ठाऊक ! हिजरी सन काल सकाळीं झाला,

शालिवाहन शक व इतर इसवी इत्यादि सन परवांच्या दिवशीं झाले. विक्रमाचा संवत् तेरवांच्या दिवशीं झाला. यांचे आरंभदिन आपण मानवप्राणी शुभ समजतों. पण या सृष्टीला विचारा, झाडावरच्या पांखरांना विचारा, रानांतल्या श्वापदांना विचारा, माझ्या त्या प्रियकर अश्वत्थाला विचारा, पाण्यांत पडलेल्या सावल्यांना विचारा कीं, खरा खरा शुभ दिवस कोणता? ते सारे उंच घोष करून सांगतील कीं, ज्या वसंतांत माणसें शुचिर्भूत झालीं, त्यांनीं वस्त्र परिधान केलें, त्यांनीं केशभूषा रचिली, त्यांनीं नर्तन केलें, त्यांनीं गायन केलें, तो वसंत खरा पहिला वसंत होय आणि त्याचा पहिला दिवस म्हणजे आपली खरी वर्षप्रतिपदा होय!

---

## कठिण शब्दांचे अर्थ

जगत् = गमन करणारें. अश्वत्थ = पिंपळ. रंध्र = छिद्र. गव्हर = गुहा. डिक्शा = तुरे. मुगारे = अंकुर. सडक = मोकळे, सरळ. हर्षनिर्भर = आनंदित. शहारित = रोमांचित. शुचिर्भूत = पवित्र.

## अभ्यास

(१) पहिला वसन्त आला त्या वेळच्या रानटी मानवप्राण्यांपैकीं तुम्ही एक आहांत अशी कल्पना करा आणि वसन्त-ऋतूच्या आगमनानें निसर्गांत काय काय फेरफार झाले व त्यांच्यामुळें तुम्हांला कसा हर्ष झाला त्याचें वर्णन करा.

(२) 'पावसाळ्यांतली पहिली सर' या विषयावर एक निबंध लिहा.

(३) 'वसन्ताच्या आगमनानें माणसांना माणुसपणा आला आणि जीविताला शोभा आली.' या वाक्यांत सूचित केलेल्या विचाराचें विस्तृत स्पष्टीकरण द्या.

(४) हिजरी सन, शालिवाहन शक, विक्रम संवत् यांची माहिती मिळवून त्यांवर टिपणें द्या.

● ● ●

# केळकरांचे लेखनगुण : : ४

[ साहित्यसम्राट् नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या निधनानंतर प्रो. माट यांनीं तात्यासाहेबांवर सुंदर मृत्युलेख लिहिला होता. त्या लेखांतून पुढील उतारा घेतलेला आहे.

कै. तात्यासाहेब यांना ‘ साहित्यसम्राट् ’ ही पदवी सर्व मराठी रसिकांनीं एकमतानें दिलेली आहे. ती पदवी किती यथार्थ आहे हें तात्यासाहेबांनीं जें विविध प्रकारचें, गुणसंपन्न आणि प्रचण्ड साहित्य निर्माण करून ठेवलं आहे त्यावरून आपणांस सहज कळून येतें. तात्यासाहेबांची बुद्धि तीव्र होती, भावना सखोल होती आणि रसिकता सर्वस्पर्शी होती. ‘ न खलु धीमतां अविषयो नाम ’ असें एक संस्कृत वचन आहे. त्याचा अर्थ असा कीं, बुद्धिवन्ताला कोणताहि विषय अगम्य वाटत नाहीं. कै. तात्यासाहेबांच्या बाबतींत हें वचन अगदीं खरें होतें. कोणत्याहि विषयांत त्यांची मति सारख्याच अप्रतिहत वेगानें चालत असे. साहित्यांतील एकूण एक क्षेत्रांत तात्यासाहेबांच्या तेजस्वी प्रतिभेचा विलास आपणांस दिसून येतो. ‘ केसरी ’सारख्या जबाबदार पत्राचें तात्यासाहेबांनीं वर्षानुवर्षे संपादन केलें आणि तें करीत असतां आठवड्याच्या आठवड्याला अतिशय सुबोध, सोज्वळ व सुरस असा भरपूर मजकूर वाचकांच्या पदरीं टाकून सात्त्विक मनोरंजनाबरोबरच त्याला त्यांनीं ज्ञानहि दिलें. याखेरीज नाटकें, कादंबऱ्या, लघुकथा, तात्त्विक प्रबंध, साहित्यचर्चात्मक लेख आणि निरनिराळ्या पुस्तकांना लिहिलेल्या प्रस्तावना यांच्या रूपानें तात्यासाहेबांनीं जें डोंगराएवढें साहित्य निर्माण करून ठेवलें आहे तें पाहिलें म्हणजे मन विस्मयानें थक्क होतें आणि आदरानें भारावून जातें.

तात्यासाहेबांच्या लेखनांत अनेक साहित्यगुण आहेत. त्यांचें लिहिणें अतिशय सोपें असे. अवघड विषय सुगम करून सांगण्याचें कसब त्यांच्या-जवळ होतें. भाषा तर त्यांच्यापुढें हात जोडून उभी असे. नानाविध मनोरंजक उपमा-दृष्टान्त देऊन आपला विषय खुलविण्याची हातोटी त्यांना चांगली साधलेली असे आणि नर्मविनोदाच्या नाजूक छटांनीं त्यांच्या साहित्याची शोभा अधिकच वाढलेली असावयाची. कोणत्याहि प्रश्नाच्या दोन्ही बाजूंचा विचार करून लिहावयाची प्रथमपासूनच संवय ठेवल्यामुळें तात्यासाहेबांच्या लेखनांत नेहमींच समतोलपणा व संयम असे. तें कधींच भडक वा एकारलेलें नसावयाचें.

पुढील उताऱ्यांत प्रा. माटे यांनीं तात्यासाहेबांच्या या विविध साहित्य-गुणांचें मोठ्या तन्मयतेनें वर्णन केलें आहे आणि तात्यासाहेबांच्या साहित्याला एवढी सार्वत्रिक लोकप्रियता व प्रतिष्ठा कां लाभली त्याचें मर्म उकलून दाखविलें आहे. तात्यासाहेबांना वर्षानुवर्षे पाहिलेल्या व त्यांचें लेखन पहिल्यापासून आपुलकीनें वाचीत आलेल्या एका रसिक साहित्यि-काचें विवेचन या दृष्टीनें हा लेख वाचनीय आहे यांत शंका नाहीं. तात्या-साहेबांच्या लेखनगुणांचें वर्णन करतांनाच श्रेष्ठ साहित्याच्या कसोट्याहि प्रा. माटे नकळतच येथें सांगून गेले आहेत. ]

तात्यासाहेबांनीं जें वाङ्मय लिहिलें तें बुद्धि आणि भावना यांच्या मिश्रणानें लिहिलें आणि त्यांचें आवाहन सामान्य माणसांना सुद्धां होत राहिलें. अर्थात् वाङ्मयलेखक म्हणून त्यांचें नांव चिरस्थायी होईल. वाङ्मय-सम्राट् ही जनतेनें त्यांना बहाल केलेली पदवी अगदीं यथार्थ आहे. सतत तीस वर्षेपर्यंत त्यांनीं हें साम्राज्यपद बिनहरकत भोगलें. ‘ वाङ्मयसम्राट् ’ ही पदवी तात्यासाहेबांना खरोखरच शोभली. ‘ लोकमान्य ’ हें पद जसें टिळकांच्या नांवाशीं कायमचें संलग्न झालें आहे तसेंच ‘ वाङ्मय-सम्राट् ’ हें पद केळकर यांच्या नांवाशीं संलग्न झालें आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, शिवरामपंत परांजपे, गोविंदराव देवल, राम गणेश गडकरी असे मोठमोठे खंदे लेखक जेव्हां लिहीत होते तेव्हांच या पदवीवरचा आपला हक्क केळकर शाबीत करीत होते हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. हे सारे लोक लेखनशूर

होते यांत शंकाच नाहीं, पण तात्यासाहेबांचा चौफेरपणा त्यांना साधला नाहीं. कारण केळकरांची सहानुभूति सर्वस्पर्शी होती आणि त्यांची प्रज्ञा सहस्रनेत्र होती. त्यांच्या सहानुभूतिपाशांतून एकहि विषय सुटला नाहीं. आणि त्यांच्या प्रज्ञेच्या प्रखर पण मंजुळ किरणांनीं ज्याचें अंतःकरण खुलें झालें नाहीं असा एकहि प्रसंग उद्भवला नाहीं. जो विषय किंवा प्रसंग हातीं यावा तो हृद्य आणि प्रिय बनवावा हें विलक्षण कसब तात्यासाहेबांना साधलेलें होतें आणि विशेष म्हणजे हें कीं, हें सारें त्यांना आठवड्याच्या आठवड्याला करतां येत असे. आळोकेपिळोके देऊन, वेणा देऊन, लहरीची वाट पाहून हें कसब कांहीं लेखकांनीं दाखविलें आहे. केळकरांना या यातना सोसायला वेळच नसे. त्यांना हुकमी लिहावें लागे. परंतु केळकर यांना हें कसब जन्मतः साध्य झालेलें होतें. तात्यासाहेबांनीं कधीं नव्या गोष्टींचा द्वेष किंवा तिरस्कार केला नाहीं. पुष्कळांचें असें होतें कीं, त्यांच्या तरुणपणीं ज्या गोष्टी त्यांना प्रिय झालेल्या असतात त्याहून निराळ्या, उत्तरवयांत भेटूं लागल्या कीं, ते त्यांचा द्वेष किंवा तिरस्कार तरी करतात; किंवा निदान ते बुजल्यासारखे तरी करतात. पण वाचकवर्ग जों जों अधिक हव्यासी व चोकस बनत चालला तों तों केळकर यांच्या शक्तीहि प्रगल्भ होत चालल्या. आवडीनिवडी आळून जाणें हें त्यांच्या बाबतींत झालेंच नाहीं. एखाद्या गवयाच्या ठराविक तानांप्रमाणें कांहीं लेखकांच्या विचारांना ठराविक वळण लागतें. परिस्थितीनें लेखक लोक किटून व आंबून जातात. व शेवटीं शेवटीं त्यांचीं मनें कोंझीं व कुढीं बनतात, आणि कांहीं थोडींशीं वर्षे कुस्ती खेळण्यांत गेल्यावर जसा एखादा बाळका वस्ताद हौद्याच्या कांठावर बसूं लागतो तसे हे लेखक केलेसवरलेपणाचें वैभव भोगीत वाङ्मयसभांतून वागूं लागतात. पण तात्यासाहेबांना याचा विटाळहि झाला नाहीं. पंचाहत्तर वर्षांच्या वयालासुद्धां, नवीन नवीन ज्ञानराशी लुटण्याची व त्या आपल्या वाचकांना पोहोंचविण्याची तरतरी व उमेद त्यांच्या ठिकाणीं शेवटपर्यंत दिसून येत होती. याचें कारण हेंच कीं, त्यांची सहानुभूति सर्वगामी आणि त्यांची प्रज्ञा सहस्रनेत्र होती.

नव्याची आवड त्यांना असली तरी, त्यांच्या लेखनाची मूळ भूमिका स्वदेशप्रेम व आपल्या संस्कृतीची डोळस आवड यांवरच बसविलेली होती.

मात्र यांचा उपयोग केळकर यांनीं युक्त ठिकाणींच केला. त्यांनीं आपलें लेखन वाचकांना एवढें प्रिय बनविलें तें आणखीहि कांहीं साधनांनीं होय. पैकीं विचारसौष्ठव हें एक प्रमुख साधन होय. त्यांची प्रतिभा अत्यंत पुष्ट असल्यामुळें, तापलेल्या भूमविर पर्जन्य सुरू झाला म्हणजे तिच्यांतून लक्षावधि नवे नवे कोंब जसे भराभर बाहेर पडतात; तसे, प्रसंग प्राप्त होतांच अनेक मनोज्ञ विचार व सुंदर कल्पना त्यांना भराभर सुचत असत. वाचनाचा प्रवास चालूं असतां थोड्या थोड्या अवकाशानतर नवीन नवीन विचार व कल्पना वाटेनें भेटल्या तर, वाचकाला आल्हाद वाटत राहातो व त्याचें वाचन सुखाचें बनतें. तसेंच या विचारांत आणि कल्पनांतहि एक तऱ्हेचें मार्दव असावें लागतें. तें असलें तरच हें सुख वाचकाच्या अंगीं लागतें. नवे विचार पुष्कळदां भेसूर व अक्राळविक्राळ रूपाचे असतात व नव्या कल्पना आकरताळ्या आणि कजाग असतात. आणि त्या पाहून चमत्कृतीमुळें वाचक क्षणभर संतुष्ट झाला तरी, शेवटीं तो हैराण होऊं लागतो. केळकर यांच्या लिहिण्यांत यांतलें कांहींच नव्हतें. भडक किंवा एकान्तिक विचार त्यांना सुचत नव्हते असें नव्हे. ते त्यांना सुचत, पण सुचल्या-बरोबर ते त्यांना आपल्या विचारशक्तीच्या कह्यांत आणून सौम्य व ग्राह्य बनवीत. विचारांतील अतिशयोक्तीनें आपली प्रतिभा उज्ज्वल असल्याचा आणि कल्पना बेछूट असल्याचा गौरव प्राप्त करून घेण्यांत पुष्कळांना भूषण वाटतें ! पण माणसाचें खरें बळ आपल्या कल्पनेची वाघटळ बन-विण्यांत किंवा विचारांत पाखंड उत्पन्न करण्यांत नाहीं हें केळकर यांनीं ऐन उमेदींतच ओळखलें होतें. उच्छृंखलपणा आणि पाखंड हीं अवश्य तेवढीं मारलीं तर, त्यांचा गुण तर शिल्लक राहातोच; पण त्यांच्यांत गोडीहि उत्पन्न होते हें लक्षांत ठेवूनच केळकर यांनीं आपलें सर्व लिखाण केलें. यामुळें त्यांच्या लिहिण्यांत आकरताळें, ओक्साबोक्शीं रडणारें, आततायी, धुंद, किंवा बेहोष असें कांहीं सांपडावयाचें नाहीं. जटा आटपणारे रुद्रावतार आणि पाठीवर आसूड मारून घेणाऱ्या कडकलक्ष्म्या यांचें दर्शन तुम्हांला केळकर यांच्या लेखनांत व्हायचें नाहीं. सर्वच प्रतिपादनांत नियमितपणा किंवा संयम सारखा दिसत असतो.

या आटोपशीरपणाचा वापर त्यांनीं विनोदाच्या कामींहि केलेला दिसेल. घरांतील लहान मुलें एकमेकांकडे पाहून जशीं नुसतींच खिदळत राहातात किंवा पाय मोकळे करायला गेलेले चार वृद्ध पेणसंलदार झाडाखालीं बसून, आपल्या नोकरींतल्या आठवणी उकरून काढून, जसे नुसतेच हंसत बसतात व आराम पावतात तसा कांहींहि प्रकार तात्यासाहेबांच्या लिखाणांत दिसत नसे. त्यांचा विनोद प्रतिपाद्याच्या अनुषंगानें, योग्य तो ताल धरून अंगासरसाच चाललेला दिसतो. हा त्यांच्या संयमाचा गुण आहे. कित्येकदां तर असें घडे कीं, विवेचनांतील शब्दांतच हास्योत्पादक रूपकांची योजना झाल्यामुळें विनोदाचें निराळें रूपसुद्धां वाचकाला प्रतीत होत नसे. विनोदाच्या सुताची नरम काडी सणंगाच्या न्यहार विणीत एकरूप झालेली दिसे. हा आटोपशीरपणा कित्येकांना पसंत नसतो. जिलब्या साखरेच्या पाकांत कुस्करून खाल्ल्या म्हणजे तें ब्रोडण पुरेसें मिष्ट झालें आहे असें अनेकांना वाटतें; तांबड्या भगवतीचें किंवा चिंचेच्या बलकाचें सार केलें व भुरक्याबरोबर ब्रह्मानंदीं टाळी लागली म्हणजे आपण खरोखरीचें सार भुरकलें हें त्यांना पटतें ! अशांची गोष्ट निराळी होय. त्यांना केळकरांचें वाङ्मय मिळमिळीत वाटेल यांत कांहींच शंका नाहीं. संयमांत गोडी असते हें कळावयाला रुचि उंच दर्जाची असावी लागते; केळकर यांनीं आपलें वाङ्मय लोकप्रिय बनविण्यास योजलेलें हें दुसरें साधन होय.

त्यांच्या लिखाणांतील सोपेपणा तर वाचकाला मित्रासारखा वाटे. सोपा विचार अवघड करून सांगण्यांत भूषण मानणारे लेखक अवघड विचार सोपा करून कसा बरें मांडतील ? अवडंबर हें त्यांचें मुख्य भांडवल असतें ! ते जो विचार सांगतात तो त्यांना नुकताच सुचलेला असतो; तो त्यांनीं दत्तक घेतलेला किंवा चोरून आणलेला असतो, तो त्यांच्या पुरता ओळखीचा झालेला नसतो; आणि त्याला काय नांव द्यावें हें त्यांना ठाऊक झालेलें नसतें. कदाचित् प्रेषितपणाचें अवसान आपल्या अंगांत शिरलें आहे असें त्या लेखकांना वाटतें आणि म्हणून अगदीं सोप्या गोष्टीसुद्धां हे लोक मोठ्या निबिड बनवितात आणि वाचक जर का भोळे असले तर, हे लोक आपल्या अवडंबराच्या बळावर तत्त्ववेत्त्याची भूमिका बळकावून बसतात ! केळकर यांचें प्रतिपादनाचें लिखाण त्याच्या साफ उलट असे.

तत्त्ववेत्त्याचा अभिनिवेश, सामान्य सिद्धान्त प्रतिपादणाराचा हट्ट, किंवा स्वतःलाच न उलगडलेल्या विचारांचे गुल्म त्यांच्या लिखाणांत कोठेंहि आढळत नसत. आपणहि जणूं काय एखादी साधी गोष्ट सांगत आहों किंवा एखादें साधें प्रमेय प्रतिपादीत आहों अशा समजुतीनें लेखक लिहीत आहे असें वाचकाला वाटे. आपण कोठें तरी गिरिकुहरांत खेंचलें जात आहों अशी जाचक जाणीव वाचकांच्या मनांत कधींहि उत्पन्न होत नसे. याचें कारण हेंच कीं, प्रतिपाद्य विषय तात्यासाहेबांना उत्तम कळलेला असे; आणि भाषाहि त्यांच्यापुढें हात जोडून उभी असे.

एखादा प्रश्न उद्भवला असतां त्याच्या साधकबाधक बाजू पाहणें आणि तारतम्यानें समधात बनवून त्या वाचकांपुढें मांडणें या कामांत तात्यासाहेबांचा हात धरणारा मराठी भाषेंत आजवर कोणी झाला नाहीं. परंतु या साधकबाधक बाजू पाहण्याची शक्ति तात्यासाहेब यांना ज्याप्रमाणें मननानें त्याप्रमाणेंच अखंड वाचनानें प्राप्त झाली होती. त्यांचा वाचनाचा हव्यास शेवटपर्यंत कायम होता आणि वाचलेल्या मजकुरांतील अवश्य ते विशेष मनांत कायम राहण्याइतपत त्यांची स्मृति चिवट आणि समावेशक होती. यामुळें ते लिहूं लागतांच त्यांची स्मृति जागृत होई; आणि जो एक साधा प्रसंग किंवा जें एक साधें कलम त्यांना वर्णावयाचें असेल त्याच्या-भोंवतीं इतिहास आणि वाङ्मय यांतील अत्यंत मनोरम आणि आकर्षक प्रसंग व कल्पना येऊन उभ्या राहात व अशा रीतीनें तो विचार किंवा प्रसंग भुण्डा न वाटतां कांहीं एका गमतीदार परिवेषांत उभा आहे असें वाचकाला वाटूं लागे. आठवणी जाग्या होणें हीहि प्रतिभाच होय. चांगल्या उपमा म्हणजे काय असतात हें पाहिलें तर, दिसून येईल कीं, त्या सुंदर सादृश्यांच्या आठवणीच होत. जशीं सादृश्यें आठवावयाचीं तसे विचारहि केवळ स्वतंत्रपणें सुचावयाचे असें नव्हे, तर आठवावयाचेहि; असें घडलें तर लेखकाच्या अंगांत मोठीच प्रतिभा आहे असें म्हणावयास हवे. सुचणें व आठवणें ही उभयविध प्रतिभा केळकर यांच्या लिखाणांत ठळकपणानें दिसून येते.

वाङ्मयांत अवतरणारे जे कांहीं दुय्यम गुण असतात त्यांचाहि भरपूर सांठा केळकर यांच्यापाशीं असे. प्रसंगच पडला तर उपहास आणि छद्म-

भेद या साधनांचा भरपूर उपयोग तात्यासाहेब करीत असत. प्रतिक्रिया म्हणून करावयाची टवाळी हीहि त्यांना अगदींच अनवगत होती असें नाहीं. पण या साधनांचा उपयोग ते केवळ आपद्धर्म म्हणून करीत. तसेंच खुबी आणि प्रांजलपणा यांचें बेमालूम मिश्रण करण्याची लोकोत्तर हातोटी तात्यासाहेब यांनाहि साधलेली होती. समजेल त्याला खुबी नाहीं तर इतर भोळ्यांना प्रांजलपणा असें हें एक मिश्रणाचें कसब आहे. साधल्यास गंभीर विचार, नाहीं तर थट्टा अशा प्रकारचें दुहेरी धोरण जसें कांहीं लोक आपल्या संभाषणांत ठेवतात तसाच प्रकार प्रांजलपणा व लावून बोलणें यांच्या मिश्रणांत केळकर हेहि मधूनमधून करीत. अर्थात् वर सांगितल्या-प्रमाणेंच या कामांतहि ते आपला नेहमींचा संयम ठेवीतच. प्रतिस्पर्धी कोण आहे यावर संयमाची मर्यादा अर्थातच अवलंबून असे. आणि जेवढ्यापुरता मतभेद तेवढ्यापुरता बखेडा असें त्यांचें धोरण असे. शेंपटीचा एक केंस ओढला तर, उग्र श्वापदें आपला क्रूर मोहरा सबंधच्या सबंध या क्षुद्र अपराध्याकडे वळवितात. पण गाईच्या पाठीला जर बोटानें स्पर्श केला तर अवतींभोंवतींच्या तसूभर जागेंत ती आपली त्वचा थरथरविते व उगाच सर्व अंगाची काहील करून न घेतां मतभेद दर्शवून मोकळी होते. आतांच सांगितलेलीं जीं साधनें त्यांचाहि उपयोग केळकर हे जितक्यास तितकाच करीत असत.

---

## कठिण शब्दांचे अर्थ

आवाहन = बोलावणें. प्रज्ञा = बुद्धिमत्ता. सहस्रनेत्र = अत्यंत डोळस. हृद्य = हृदयाला जाऊन भिडणारा. वेणा = वेदना. आवडीनिवडी आळून जाणें = आवडीनिवडींना ठराविक, सांचेबंद स्वरूप येणें. कोंझी = संकुचित. हौदा = कुस्तीचा आखाडा. आकरताळया = आकस्ताळ्या, भेसूर. पाखंड= संशयीपणा. प्रतिपाद्य = चर्चा करावयाचा विषय. सुताची काडी = सुताचा धागा. सणंग = लुगडें. न्यहार = सफाईदार. बोडण = मिश्रण. भगवती = मिरचीची पूड. अभिनिवेश = आव. गुल्म = कुंज. समधातं = सारखें केलेलें.

परिवेष = वर्तुळ. छन्नभेद = विंग फोडणें. आपद्धर्म = संकटाच्या वेळींच आचरणांत आणायची गोष्ट. मोहरा = चेहरा. काहील = आग, भडका.

## अभ्यास

(१) तात्यासाहेब केळकरांच्या लेखनाचीं कोणकोणतीं वैशिष्ट्यें या लेखांत लेखकानें सांगितलीं आहेत ?

(२) पुढील वाक्यांचें सविस्तर स्पष्टीकरण द्या :—

(अ) ‘ संयमांत गोडी असते हें कळावयाला रुचि उंच दर्जाची असावी लागते. ’

(ब) ‘ आठवणी जाग्या होणें हीहि एक प्रतिभाच आहे.’

(३) या लेखावरून उत्तम पत्रकाराच्या अंगीं कोणकोणत्या गुणांची आवश्यकता असावयाला हवी असें दिसतें ?

(४) ‘ संयम व चौफेरपणा हे तात्यासाहेबांच्या लेखनाचे प्रमुख गुण होते ’ असें प्रा. माटे म्हणतात. याप्रमाणेंच तुमचे आवडते असे पांच मराठी लेखक घेऊन त्यांपैकीं प्रत्येकाच्या लेखनाचे तुम्हांला कोणते प्रमुख गुण वाटतात तें सांगा.

• • •

# राज्यें व मनोराज्यें : : ५

[ ‘ उपेक्षितांचें अंतरंग ’ या पुस्तकांतील ‘ माझें मनोराज्य ’ या लेखां-तून पुढील उतारा घेतला आहे. प्रा० माटे यांच्या एरव्हींच्या लेखनापेक्षां अगदीं वेगळ्या धर्तीचा असा हा लेख आहे. त्यांच्या व्यक्तित्वाच्या एका निराळ्याच बाजूचें मनोरम दर्शन या लेखांत आपणांस घडतें. ‘ राजे लोकांना परमेश्वरानें त्यांचीं राज्यें दिलीं आहेत पण तो दयाघन परमेश्वर गरिबांना अगदींच विसरला आहे असें नाहीं. त्यांच्यासाठीं त्यानें मनोराज्यें राखून ठेवलीं आहेत.’ या मध्यवर्ती कल्पनेवर या लेखाची उभारणी केलेली असून आपलें स्वतःचें मनोराज्य लॉटरींत बक्षीस मिळवणें हें असल्याचें लेखकानें सांगितलें आहे. लेखाच्या प्रारंभींच्या भागांत राजेलोकांचा केलेला सूक्ष्म उपहास जितका मर्मभेदक आहे तितकाच पुढील भागांतला नर्मविनोद खुसखुशीत आहे. राजे लोकांचीं राज्यें व सामान्यांचीं मनोराज्यें यांची लेखकानें केलेली तुलना किती बहारीची आहे ! मनोराज्यें आपण सर्वजण करीत असतों, तथापि त्या मनोराज्यांचे खरे फायदे व खरीं सुखें हा लेख वाचल्यानंतरच आपल्या ध्यानांत येतात. प्रा० माटे यांच्या मृदु विनोदाचा व रम्य कल्पकतेचा एक नमुना म्हणून हा लेख वाचनीय आहे यांत शंका नाहीं. ]

राजे लोकांना त्यांचीं त्यांचीं राज्यें असतात आणि ते तीं सुखानें भोगतात. पण देवाला गरिबांची काळजी आहेच ! तो करुणाघन परमेश्वर गरिबांना विसरलेला नाहीं. गरिबीची भरपाई तो कशी ना कशी करीतच असतो ! राजे लोकांना त्यानें उंच उंच हवेल्या आणि प्रशस्त प्रासाद दिलेले असतात. पण तेवढ्यानें तो गरिबांना विसरला आहे, असें होत नाहीं. या हवेल्यांच्या आणि प्रासादांच्या सावल्या, उन्हापासून रक्षण व्हावें म्हणून,

त्यानें गरिबांसाठीं राखून ठेवलेल्या असतातच ! राजवाड्यांतील सुंदर भोजनगृहांत खात बसावयास नाना प्रकारचीं मिष्टान्नें त्यानें राजांना दिलेलीं असतात; पण म्हणून गरीब लोकांना तो दयाघन केवळ विसरून गेला आहे, असें नाहीं. या मिष्टान्नांतून निघणारे स्वादिष्ट सुगंध बाहेर बसलेल्या गरिबांच्यासाठीं त्यानें राखून ठेवलेले असतातच ! तिलोत्तमेसारख्या सुरूप स्त्रियांचा चिरंतन सहवास राजे लोकांना त्यानें दिलेला असतो हें खरेंच; पण दयाळू परमेश्वर गरिबांना अगदींच विसरला आहे, असें मानणें चूक आहे. या स्त्रिया राजवाड्यांत जातां-येतांना मोटारींतून धांवत असल्या म्हणजे राजनिष्ठेसाठीं त्यांच्याकडे पाहून टाळ्या वाजविण्याचा हक्क त्यानें गरिबांसाठीं राखून ठेवलेलाच आहे ! राजांना परमेश्वरानें समृद्ध राज्यें भोगावयास दिलेलीं असलीं तरी, तो सर्वांना सम लेखणारा परमेश्वर गरिबांना अगदीं विसरून गेलेला आहे, असें शुद्ध नास्तिकांशिवाय कोणीहि समंजस व श्रद्धाळू माणूस म्हणणार नाहीं; त्यानें गरिबांना राज्यें दिलेलीं नसलीं तरी त्यानें गरिबांच्यासाठीं मनोराज्यें राखून ठेविलेलीं आहेतच !

एरवीं परमेश्वरानें राजांच्या राजवाड्यांना सांवल्या कशाला बरें ठेवल्या असत्या ! आपण रसिकबुद्धीनें परमेश्वराच्या करणीकडे पाहावयास शिकलें पाहिजे. त्याला गरिबांची काळजी नसती तर, राजवाड्यांतील पक्वान्नांना सुवास असण्याचें काय बरें कारण होतें ! राजस्त्रिया इकडून तिकडे व तिकडून इकडे मिरवत असतां टाळ्या वाजविण्याचें सुख जर आपणां प्रजांना परमेश्वराच्या मनांत पुरवावयाचें नसतें तर, राजांनीं इतक्या स्त्रिया कशाला बरें केल्या असत्या ? त्यांना काय एकपत्नीव्रताची किंमत माहीत नाहीं ! त्यांना काय सद्‌गुणांची ओळख नाहीं ! राज्याच्या बाबतींत असेंच आहे. आपणां गरिबांना परमेश्वराच्या मनांत सुखी ठेवावयाचें नसतें तर त्यानें मनोराज्यें ही सर्व मनुष्यमात्राला व्यापून राहिलेली संस्था कां बरें निर्मिली असती ? परमेश्वराचे गूढस्थ हेतू समजावून घेणें हाहि एक मोठा सुरस उद्योग आहे ! राज्याचें खरें वैभव व सुख हें ध्यानांत आलें तर, हा उद्योग कसा सुरस आहे हेंहि कळेल.



अनुक्रम ९८८९४
दिनांक २१ ... 
क्रमांक ८८०.५

राजे लोकांच्या राज्यापेक्षां मनोराज्यें हीं शतपट बरीं, हें कोणीहि कबूल करील. राजे लोकांच्या मुकुटांना आंतून कांटे असतात, असा गोड बोभाटा निदान कवि लोकांनीं तरी केलेला आहे. खरें काय असतें, हें राजांच्या मुकुटाकडे आंतून पाहण्याचा योग न लाभल्यामुळें सांगतां येत नाहीं. पण मनोराज्यांतील मुकुटांना असले कांटेबिटे कांहीं नसतात. ते आंतून अत्यंत मृदु व बाहेरून झगझगीत असतात. राजांचे मुकुट सगळे शिळे असतात; बापाचाच मुकुट मुलगा घालतो आणि त्यांतच वेड्यासारखी धन्यता मानतो. मनोराज्यांतील मुकुट नित्य नवे असतात. राजे लोक तींच उष्टीं रत्नें, तेच उष्टे पाचू व तेच उष्टे इंद्रनील आपल्या मुकुटांना लावतात; पण मनोराज्यांत रत्नांच्या नव्या नव्या खाणी प्रत्यहीं प्रकट होतात आणि म्हणून येथें उसनवारी किंवा शिळवड कधींहि भेटावयाची नाहीं. राजे लोकांना राज्यें जिंकावयास केवढे कष्ट पडतात; केवढीं साहसें त्यांना आचरावीं लागतात; केवढे घातपात; केवढी जाळपोळ; केवढी दगलबाजी ! पण मनोराज्याच्या कमाईला कसलेहि कष्ट नाहींत. त्यांत कसलींहि साहसें नकोत; कोणास मारावयास नको; कोणाचीं घरें जाळावयास नकोत; कोठें दगलबाजी करावयास नको. फक्त डोळे मिटून तक्क्याला टेकून पडलें कीं, राज्यें व साम्राज्यें लोळण घेत आपल्या पायांशीं येऊं लागतात ! पुनः राजे लोकांना प्रजांचा उपसर्ग फार; आणि आधुनिक काळांत तर हा उपसर्ग सारखा वाढत चालला आहे. राजे लोकांना आपलीं राज्यें संभाळणें कठिण होत चाललें आहे. मनोराज्यांत हें कांहीं नाहीं; कारण तेथें मुळांत प्रजाच नसते, नुसतेंच राज्य असतें ! यामुळें हे असले जाच-काच त्या राज्यांत सहन करावे लागत नाहींत. प्रजाच नसल्यामुळें राज्य चालविण्याचे कष्टहि या राज्यांत पडत नाहींत.

पण या राज्याचे फायदे एवढेच आहेत, असें नाहीं. चांगल्या वस्तूचा गुणच असा आहे कीं, तिच्यांतून हरतऱ्हेचे लाभ होत असतात. राज्यें कमावतांना राजांना जसे कष्ट पडतात, तसें तीं गमावतांनासुद्धां त्यांना कष्ट पडतातच. राज्य गमवूं लागलें कीं, राजांचा जीव अगदीं वरखालीं होतो; ते केवढी धांवाधांव करतात; केवढी रडारड त्यांना करावी लागते; पुन्हां कत्तली, पुन्हां मारामारी ! वास्तविक पाहतां राज्यें मिळवितांना

त्यांना कष्ट पडावे, हें बरोबर आहे; पण राज्यें गमावतांनासुद्धां त्यांना कष्ट पडावे, हें विपरीत आहे ! ते नुसते गप्प बसून राहिले तरीसुद्धां त्यांचीं राज्यें आपोआप जातील ! मनोराज्यांत असला विपरीत प्रकार मुळींच नाहीं. राज्य मिळविण्याचे कष्ट जसे त्यांत नाहींत, तसें तें गमावण्याचे कष्टहि त्यांत नाहींत. एखादा ढेकूण चावला, किंवा एखादा डांस गुणगुणला, किंवा मानेखालचा तक्क्या जरा जास्त रेलला कीं, एवढ्या थोड्या खर्चांत मनोराज्य सहज नाहींसें होतें. खरोखर राज्य असें असावें. मिळविण्यास यत्न नाहींत, घालवावयास कष्ट नाहींत ! आपल्या राजांनीं इकडे लक्ष द्यावें आणि येतांना आणि जातांना आणि जवळ असतांना अनंत कष्ट देणारीं तीं आपलीं राज्यें आपखुशीनें सोडून देऊन मनोराज्येंच करावयास त्यांनीं शिकावें, हें त्यांच्या हिताचें नाहीं का ?

पण राजे महाराजे या सुखाची लज्जत केव्हां ओळखतील ते ओळखोत. मला मात्र या मनोराज्याचें सुख मनास वाटेल तेव्हां भोगावयास सांपडतें. न कळतच या मनोराज्याचा तोरणा आपण केव्हां घेतों व त्याचा प्रसार केव्हां होतो, हें माझें मला कळतहि नाहीं. पण कित्येकदां हवें तेव्हां हें मनोराज्य मला उभें करतां येतें. इतरांचा अनुभव काय असेल तो असो, पण माझ्या मात्र हें वारंवार ध्यानांत आलें आहे कीं, मनोराज्य हें केव्हांहि जिंकतां येतें. मनाला ज्या वेळीं विशेष त्रास झाला असेल, बौद्धिक श्रम फार झाले असतील, एखाद्या अप्रिय प्रसंगाचा विसर पडावयास हवा असेल, तेव्हां तेव्हां मी मनोराज्यांत सहज गर्क होतों. अगदीं जाणूनबुजूनच हें मला करतां येतें. फोनोग्राफचा बोटांत पिन धरलेला वांकडा हात जसा आपल्याला हवा आहे त्या ठिकाणीं ठेवतां येतो तसा हा मनोराज्याचा हात हवा आहे त्या वेळीं, ठराविक ठिकाणीं मला ठेवतां येतो. मी आजारी असलों म्हणजे मला या मनोराज्याची आवड फारच वाटते व तें साधतेंहि फार लवकर. तासतास, दोनदोन तास आपल्याला प्रिय असलेल्या सुखाचा आस्वाद या मनोराज्यांत घेतां येतो व त्यामुळें रुग्णावस्थेचे क्लेशहि कमी होतात. शारीरिक कारण काय असेल तें असो, पण अंथरुणांतून जर मी उठून बसलों किंवा विशेषतः उठून उभा राहिलों, तर हें मनोराज्याचें आस्वाद्य सुख एकदम नाहींसें होतें.

मनोराज्यें अनेक असतात; पण मला लॉटरींत बक्षीस मिळण्याचें मनोराज्य फारच आवडतें. कांहीं कारणानें जर तें हातचें गेलें तर, थोड्या श्रमानें मला तें पुन्हां मिळवितां येतें. झोंपेंत चांगलीं चांगलीं स्वप्नें एखाद्या वेळीं पडतात. आपल्याला पंख असून आपण झेपावत चाललों आहों; किंवा वाटेनें जातांना आपल्याला पैसे सांपडत आहेत; असलें कांहीं तरी स्वप्न असतें. कांहीं कारणानें जाग आली तर, वाईट वाटतें व अंथरुणांत पुन्हां घुसमटून पडलें तर तें स्वप्न पुन्हां चालू होतें. तसाच अनुभव मनोराज्याच्या बाबतींत सुद्धां मला येतो, व म्हणून तासचे तास या मंजुळ अनुभवांत निघून जातात. लॉटरीचें तिकीट घेतलेलें असणें हें मनोराज्याच्या गाढ सुखाचें अगदीं साधें उगमस्थान असतें. आपल्याला जितका पैसा खर्चावासा वाटतो तितका आपल्या प्रयत्नांनीं मिळणें मला तरी आतां अशक्य दिसतें, व म्हणून तो लॉटरीनें मिळेल अशी कल्पना असते. कुणाला असें वाटतें कीं, एखाद्या निपुत्रिक श्रीमंताची मुलगी आपल्याला मिळेल. कुणाला वाटतें कीं, एखादा निपुत्रिक संस्थानिक आपल्याला दत्तक घेईल. कुणाला वाटतें कीं, घराच्या परसांत आळवाची खाच खणतांना आपल्या कुदळीचें टोंक मोहोरांच्या हंड्यावर खणकन् वाजेल. शाळेंतलीं पुस्तकें वाचून एखाद्याला वाटतें कीं, एखादी जलदेवता विहिरींतून बाहेर येऊन हिरेजडित सोन्याची कुऱ्हाड आपल्याला देईल; किंवा एखाद्या गोष्टीवेल्हाळाला वाटतें कीं, आपल्या खोलीच्या कोपऱ्यांतून ' येऊं का, येऊं का ? ' असा आवाज निघत राहील आणि आपण धाडस करून ' ये, ये ' म्हटल्याबरोबर एवढा मोठा मोहोरांचा हंडा आपल्यापुढें दाणकन् येऊन आपटेल. वयाच्या मानानें, किंवा संभवाप्रमाणें पाहातां, किंवा अनुभवावरून, मला यांतलें कांहींच शक्य दिसत नाहीं. पण लॉटरीचें बक्षीस मिळणें कदाचित् शक्य आहे. अर्थात् याला थोडें भांडवल खर्चावें लागतें. म्हणजे तिकिटासाठीं रुपया, दीड रुपया खर्च करणें. तेवढें एकदां खर्च केले म्हणजे लॉटरीचा निकाल लागेपर्यंतच्या दोनअडीच महिन्यांत हें मनोराज्याचें सुख मनमुराद अनुभवावयास सांपडतें !

---

## कठिण शब्दांचे अर्थ

तिलोत्तमा = जगांतल्या सर्व सुंदर वस्तूंतील तिळ तिळ सौंदर्य गोळा करून निर्माण केलेली स्त्री. ( सुंद आणि उपसुंद हे दोन राक्षस बंधू तिलोत्तमे-साठीं परस्परांशीं लढून मरण पावले. ) येथें अत्यंत लावण्यवती स्त्री असा अर्थ. समृद्ध = संपन्न. लज्जत = गोडी. मंजुळ = मधुर.

## अभ्यास

( १ ) 'राजे लोकांच्या मुकुटाला आंतून कांटे असतात' असें येथें लेखकानें म्हटलें आहे. राजे लोकांच्या मुकुटाचे हे कांटे कोणते ? सविस्तर उत्तर द्या.

( २ ) माणसांना पडणारीं कांहीं गमतींचीं स्वप्नें येथें लेखकानें वर्णिलीं आहेत. तुम्हांला पडलेलें एखादें मजेदार स्वप्न पंधरा-वीस ओळींत लिहा.

( ३ ) तुमचें स्वतःचें एखादें आवडतें मनोराज्य वर्णन करा.

( ४ ) येथें लेखकानें राजे लोक व गरीब माणसें यांची तुलना करून दोघांचीं निरनिराळीं सुखें वर्णन केलीं आहेत. तुमच्या मतानें राजा व गरीब मनुष्य या उभयतांत खरा सुखी कोण ?

( ५ ) एक गरीब मनुष्य एका राजाला भेटावयाला आला आहे अशी कल्पना करून त्या दोघांमधील संवाद लिहा.

● ● ●

# आमचा खंड्या : : ६

[ ‘ अनामिका ’ या पुस्तकांतून प्रस्तुतचा लेख घेतला आहे. ‘ खंड्या ’ हें एक रेखीव आणि सुंदर असें स्वभावचित्र आहे. पशु असूनहि माणसा-इतका किंबहुना थोडासा अधिकच समंजस, शहाणा, इमानी आणि मायाळू असा हा मुका जीव आपल्या मनावर विलक्षण परिणाम करतो. त्याचें रूप जसें आकर्षक तसेच त्याचे गुणहि आपल्या मनाला मोहून टाकणारे आहेत. खंडयाच्या अंगची माणुसकी व त्याची बुद्धिमत्ता पाहून आपणाला जेवढा विस्मय वाटतो तेवढेंच कौतुकहि वाटतें. आणि शेवटीं खंडयाच्या मृत्यूचें वर्णन वाचतांना लेखकाइतकेंच आपल्यालाहि दुःख होतें.

आपल्या बाळपणच्या या मित्राचें चित्र प्रा० माटे यांनीं अतिशय सहृदयतेनें व जिव्हाळ्यानें रेखाटलें आहे. तें चित्र पाहून ‘ अशा प्राण्यां-पर्यंत आपलें ममत्व पोहोंचणें किती आवश्यक आहे ! ’ असा विचार लेखकाप्रमाणेंच आपल्याहि मनांत आल्याखेरीज राहात नाहीं. ]

आमचा खंड्या आम्हां मुलांपैकींच एक होता. इतकेंच कीं, तो चार पायांवर चालत असे आणि त्याला बोलतां येत नसे. सगळ्या जन्मांत बापड्यानें एक अक्षर तोंडावाटें काढलें नाहीं. आम्हीं तो म्हसवडच्या बाजूनें आणला होता. म्हसवड म्हणजे माणदेश आणि माणदेशाचें मुख्य वैभव म्हणजे कडक उन्हाची रणरण आणि कुसळांनीं भरलेला फोंडे माळ हें होय. पांच पांच कोस जमीन तुडवीत गेलांत तरी सांवलीचें झाड भेटायचें नाहीं कीं पाण्याचा टिपूस सांपडायचा नाहीं. असल्या बोडक्या आणि वैराण मुलखांत शिकार करणारीं कुत्रीं कसलीं असतील याची कल्पनाच करायला हवी. तीं उन्हानें धोपलेलीं असावयाचीं; त्यांचे जबडे

उघडे पडलेले असायचे; त्यांच्या तांबूस जिभा लळलळत असायच्या; गोमाश्या झाडण्यासाठीं तीं पाय झाडीत असायचीं; आणि पोटें भकाटीला गेलेलीं असून काय खावें म्हणून तीं दीन मुद्रेनें आजूबाजूला बघत असायचीं. यांच्यांत निरनिराळी श्रेणीं असतात. आमच्या खंड्याची जात कोणती होती तें मला आतां आठवत नाहीं. सामान्यतः शिकारी कुत्रीं लांब, चोपलेलीं, रोडकीं अशीं असतात. खंड्या तसा नव्हता.

आमच्या घरीं तो आला तेव्हां तो पिलासारखा दिसत होता तरी, हाडापेरानें थोराड वाटे. वयाच्या मानानें दांड दिसत असे. अंगावरचे केंस इतर कुत्र्यांच्या मानानें थोडे लांब असत. छाती, मांड्यांची मागची कड आणि मान यांवरचे केंस विशेषच लांब होते. पण खंड्याची खरी शोभा म्हणजे त्याचे कान होते. आंतील कानाचे कोंके फार मोठे होते असें नाहीं, पण त्यांवर वाढलेले केंस एखाद्या गोसाव्याच्या दाढीसारखे लांबलचक असत. खालीं वांकून तो कांहीं हुंगीत असला तर, त्याच्या त्या केंसांचीं टोकें भुईला लागत ! या लांब केंसांमुळें खंड्याचा चेहरा मोठा गंभीर दिसे. गुलामाचे डोळेसुद्धां एखाद्या गांजेकस गोसाव्याच्या डोळ्यांसारखेच लाल-भडक असत. आपल्याइकडल्या कुत्र्यांपेक्षां त्याचें नाकोटें लांब असून त्या-वर काळेपांढरे केंस असत. पण मी कितीहि तपशिलानें या आमच्या लहान-पणच्या सोबत्याचें वर्णन केलें तरी, त्याचा मोहरा वाचकांच्या डोळ्यांपुढें जसाचा तसा उभा राहाणें कठिण आहे. अशी कांहीं शोभा असतेच कीं, जिच्यापर्यंत शब्द पोंचत नाहींत.

या चतुष्पाद प्राण्याचें स्मरण मला आतां झालें म्हणजे तत्काळ लहान-पणची माझ्या मनाची हुरहूर मला पुन्हां वाटूं लागते. एखादा अल्लड धाकटा भाऊ असावा तसा हा खंड्या होता. त्याला देवानें वाचा दिली नव्हती याचें मला फार वाईट वाटतें.

प्लेगच्या दिवसांत आम्ही दरसाल रानांत राहायला जावयाचें. असला एक खंड्या राखणीला असला म्हणजे कोणीहि बिनघोर घोरत पडावें ! चोरांनीं जर आमच्या 'वाडींत'—वाडग्यांत—येण्याचें धाडस केलें असतें तर, खंड्यानें या चोरांना फाडून खाल्लें असतें. नुसत्या उग्र मुद्रेच्या बळा-वरच तो माणसांना पंचवीस हात दूर उभें करी. सकाळीं साडेसाताच्या

सुमारास वाडग्याच्या फाटकांतून बाहेर पडून तो सडकेवर जाई व पूर्वेकडे तोंड करून संथपणें उभा राही. कोणाला वाटलें असतें कीं, हा सूर्याला नमन करीत आहे! पण त्यांतलें कांहीं नव्हतें. तिकडून आमचा दूधवाला येत असे! खंड्या त्याची मार्गप्रतीक्षा करीत उभा राहावयाचा. पहिल्या पहिल्यानें दूधवाला पुढें येण्यालाच धजत नसे. अशी उग्र चर्या त्या कुत्र्याची होती. पुढें त्याला कळलें कीं, एरवीं हा कुत्रा कोंकरासारखा गरीब आहे. अंगणांत वाळत घातलेल्या सतरंजीवर पोरें गमतीनें पसरलेलीं असलीं म्हणजे त्यांच्यांत हा जावयाचा. तीं मुलेंहि त्याला धरून लोळवीत. त्याला ‘ आ ’ करायला लावीत आणि त्याच्या त्या अक्राळविक्राळ तोंडांत खुशाल हात घालीत! पण हा कुणाला कधीं चावला नाहीं कीं, कुणाला त्यानें कधीं ओरखाडलें नाहीं.

पण लहान मुलांशीं कोंकरासारखा खेळणारा हा अस्ताप जीव एक विशेष प्रकारची गर्जना कानीं आली म्हणजे एखाद्या सिंहाच्या छाव्याप्रमाणें भयंकर रूप धारण करी. अजिमताऱ्याच्या पूर्वेकडील पायथ्याला जें विस्तीर्ण मैदान् आहे त्यावर आमच्या झोपड्या होत्या. किल्ल्याच्या पूर्वाभिमुख डोंगराचा उजवा हात वांकण घेत घेत खूप लांबवर गेलेला आहे. या वाकणांत मोठें जगल असून हा सारा टापू झाडीनें भरून गेला आहे. शिकारी लोक इकडे पुष्कळदां येतात. एकदां शिकाऱ्यांनीं सकाळीं दहा वाजतांच रान उठवावयास सुरुवात केली. तो गोंगाट सुरू होतांच खंड्या मान वर करून तिकडल्या रोखानें पाहात उभा राहिला त्याच्या गळ्याला सांखळी होती. शिकारीचे आवाज त्याच्या ओळखीचे होते असें दिसतें. निरनिराळे कर्कश व भेसूर आवाज कानांत भरू लागतांच त्यानें कानांचे बुंधे चाळवावयास सुरुवात केली आणि घशांतून एक चमत्कारिक गुरगुर तो काढूं लागला. होतां होतां त्याचें सगळें अंग थरथरूं लागलें! पायाच्या नख्यापासून तों नाकपुड्यांपर्यंत त्याच्या अंगांतला चेव दिसूं लागला. तो सांखळीला हिसके मारूं लागला. जोरानें उडी मारावी अशा रीतीनें तो सगळेंच्या सगळें अंग पुढें झेंपावूं लागला. सांखळीच्या हिसक्यानें दरवेळीं तो मागें पडे; व पुन्हां तो पुढें झेप घाली. त्याला अडवून धरणें अत:पर अशक्य होतें. तो त्या हिसक्यांनीं गळफांस लागून मेला

असता. गळ्याची कडी सोडतांच खंड्या वाऱ्यासारखा निघाला. त्याच्या-बरोबर कोण धांवणार? हां हां म्हणतां, मैदान ओलांडून तो झाडींत शिरला. आम्ही सगळे काळजींतच होतों. सुमारें तीन तासांनीं खंड्या परत आला. अंगावर कुसळें चिकटलेलीं, अंगाचे ओरखाडे निघालेले, केंस विसकटून गेलेले, तान्हेनें आणि भुकेनें धोपलेला आणि चोपलेला हा गडी दाराशीं येऊन उभा राहिला! या वेळीं त्याच्या अंगांतील आवेश आणि क्षात्रवृत्ति आमच्या प्रत्ययाला आली.

या प्राण्याला माणसाचें शहाणपण होतें. खरें म्हणजे शहाण्या माणसाचें शहाणपण त्याला होतें असें म्हटलें पाहिजे. आम्ही ज्या घरांत होतों त्याचीं सारीं दारें एकासमोर एक अशीं ओटीपासून परसापर्यंत गेलेलीं होतीं. दरवाजांतून ओटीवर आलें कीं, डाव्या हाताला सारी ओटी; पुन्हां समोरचें दार ओलांडून गेलें कीं, डाव्या हाताला सारें माजघर असें शेवटच्या परसापर्यंत होतें. स्वयंपाकघरांत आम्ही जेवायला बसत असूं. एखाद्या दिवशीं खंड्याच्या मनांत काय येई कोणास ठाऊक, पण परसांत परस्पर यायला जी वाट होती ती सोडून तो या अनेक दारांतून शिरत शिरत परसांत जाई. स्वयंपाकघरांत आमची पंगत बसलेली असायची. तो आमच्या समोरून जाई. पण या शहाण्या प्राण्यानें एकदांहि कधीं आमच्या ताटाकडे किंवा स्वयंपाकाकडे ढुंकूनहि पाहिलें नाहीं. मग थांबून भाकरीसाठीं शेंपटी हालविणें लांबच राहिलें. हें त्याचें वर्तन खरोखर अगदीं शहाण्या माणसा-सारखेंच असे. हें त्याला कसें सुचत असें कोणास ठाऊक! पण ही निर्लोभ आणि बिनहावरी वृत्ति पाहून आम्हांला मोठें नवल वाटे. किती तरी माणसांना सुद्धां हें शहाणपण नसतें. खंड्या एखाद्या सुसंस्कृत माणसाप्रमाणें स्वयंपाकाकडे किंवा आमच्या पानाकडे न बघतां सरळ निघून जावयाचा. जणूं कांहीं तो मनांत म्हणत असे, "आपणाला इकडे पाहून काय करावयाचें आहे? आपल्याला जी भाकरी घालणार आहेत ती वेळेवर आपल्या पुढें येईलच. माझ्या धन्यांनो! तुम्ही स्वस्थ जेवा."

खरोखर अशा प्राण्यापर्यंत आपलें ममत्व पोहोंचणें किती अवश्य आहे. तें पोंचलें तरच, आपण खरे रसिक. दाव्याचीं सुटून इकडे तिकडे मोकाट हिंडूं लागलेली गाय आडवून आडवून पुन्हां वाड्यांत आणून सोडण्याच्या

कामांत तर तो एखाद्या गुराख्यापेक्षांहि जास्त चतुर होता. खंड्या एक विश्वासू नोकरच होता. आमच्या गाईला गुराख्यापेक्षां खंड्याचीच खरी राखण होती, आणि भीतीहि होती. त्याला जर बोलतां आलें असतें तर, त्यानें चांगलाच पगार मिळविला असता आणि आम्ही तो संतोषानें दिला असता.

पण खंड्याचें शहाणपण माणसांनासुद्धां लाजविणारें होतें. याची एक साक्ष सांगतों. आम्ही रानांत राहात होतों. तेथून तीन-चार मैलांवर माझी बहीण दुसऱ्या एका रानांत, प्लेगनिमित्त राहात असे. ती तेथें प्लेगानेंच वारली; म्हणून तिच्या घरच्या मंडळींना आम्ही आमच्याकडे घेऊन आलों. बरोबर त्यांचीं हांतरुणें-पांघरुणें होतीं. तीं घरांत घेणें धोक्याचें होतें. आमचें वाडगें, खूप ऐसपैस म्हणजे चांगलें एक एकरभर होतें; म्हणून आमच्या झोपडीपासून बऱ्याच अंतरावर एका बाजल्यावर हीं सारीं चिरगुटें आम्हीं उन्हांत म्हणून ठेवून दिलीं. तीन-चार दिवस तीं तेथेंच ठेवावयाचीं होतीं. वाडग्यांत येण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती. म्हणून रात्रीच्या वेळीं तीं कोणीं घेऊन जाईल असें आम्हांला कधीं वाटलेंच नाहीं. रात्र पडली; आम्ही झोपीं गेलों; खंड्या झोपडीच्या बाहेर दाराशींच नेहमींप्रमाणें होता. सकाळीं उठून माणसें पाहातात तों खंड्या अंगणांत नाहीं! आम्ही इकडे तिकडे पाहूं लागलों. जातां जातां त्या दूर टाकलेल्या कपड्यांकडे गेलों; तों त्या बाजल्याच्या शेजारीं नख्यांनीं काढलेल्या एका डबऱ्यांत खंड्या पाय पुढें पसरून बसलेला! धन्याचीं चिरगुटें झोपडीपासून लांब पडलेलीं होतीं तीं जातील ही खंड्याला भीति! म्हणून नेहमींचें अंगणांतील ठिकाण सोडून हा इमानी प्राणी त्या बाजल्यापाशीं रात्रभर बसून राहिला! थंडी लागत होती म्हणून त्यानें नख्यांनीं एक पसरट डबरा काढला आणि त्याच्या ऊबेंत कपड्यांवर खडा पाहारा करीत हा आमचा मित्र सकाळपर्यंत ताटकळत राहिला होता. खरोखर माणसाच्या जातींतल्या चाकरानेंसुद्धां अशी धन्याच्या हिताची काळजी दाखविली नसती. त्याला सांगावें लागलें असतें कीं, तूं येथें बसून राहा; आणि बसला असता तरी तो चडफडत बसला असता. खंड्याला कोणी सांगितलें होतें? त्याला हें शहाणपण उपजतच होतें, आणि हा विश्वासूपणा आणि मालकाच्या हिताची ही काळजी त्याच्या अंगीं

उपजतच होती. खंड्या माणसांपेक्षां किती तरी शहाणा, इमानी, आणि सच्चा होता. त्याला जर बोलतां आलें असतें तर, त्याची खरी योग्यता कळून आली असती.

खंड्याला जर बोलतां आलें असतें तर, त्याची गणना चांगल्या चांगल्या माणसांत सहज करतां आली असती. तो कोठल्याहि म्युनिसिपालिटीचा मेंबरच काय पण अध्यक्षहि झाला असता; आणि मेंबर किंवा अध्यक्ष होऊनहि त्यानें संस्थेचा दर्जा किती तरी वाढविला असता. त्यानें आपल्याच घरापुढें कंदिलाचा खांब बसवून घेण्याचा आग्रह धरला नसता आणि घराचा गडगा कमिटीच्या नोकरांकडून लावून घेतला नसता; त्यानें म्युनिसि-पालिटीच्या मालकीचीं लिंबाचीं झाडें तोडून आणून घरच्या चुलीला सरपण केलें नसतें आणि बैलांना घालावयाचा कडबा स्वतःच 'खाल्ला' नसता. त्यानें म्युनिसिपालिटीच्या बैलांना द्यावयाच्या मुगांत माती मिसळली नसती आणि म्युनिसिपल मालकीचा केर स्वतःच्या शेतांत खतासाठीं फुकट ओतविला नसता. तो रजिस्ट्रार असता तर, त्यानें मृत्युपत्र करतांना त्या मरणाराकडून पैसे मागितले नसते आणि फौजदार असता तर, त्यानें लांच घेऊन पुरावा जाळून टाकला नसता. तो बातमीदार असता तर, त्यानें खोटी बातमी दिली नसती आणि संपादक असता तर, त्यानें असत्याचा हट्ट धरला नसता. मास्तर असता तर, त्यानें आपल्या वह्या इमानानें तपासल्या असत्या आणि मुन्सफ असता तर, त्यानें न्यायाचा विक्रा मांडला नसता. तो भाजी-वाला असता तर, वजन करतांना त्यानें तागडीला झोका दिला नसता. आणि दूधवाला असता तर, त्यानें दुधांत पाणी घातलें नसतें. त्यानें आपलें इमान कधींहि गमावलें नसतें. तो नेकीनें राहिला असता आणि आपल्या वांट्यास आलेलें काम केवळ वेठ म्हणून नव्हे तर, कर्तव्य म्हणून त्यानें केलें असतें. हें सारें घडलें असतें पण त्याला वाचा नव्हती. आणि यामुळें त्याचें थोर मनोगत जागच्या जागींच जिरून जात असे. त्याच्या मनाच्या ऊर्मि आणि आवेग इमानांतून निघालेल्या असत. त्याला फार झालें तर, शेंपटी हलवितां येई आणि उल्हासानें इकडे तिकडे उड्या मारतां येत. पण येवढ्यानें काय होणार? त्याच्या थोर भावना खरोखर अव्यक्तच राहात.

एकदां आमची गाय आम्ही वाडग्याच्या बाहेर चरणीला लाविली होती. हिरवेंगार मैदान लांबवर पसरलेलें होतें. गाय चरणीस लावून मी तेथेंच हिरवळीवर पसरलों होतों. खंड्या शेजारीं होता. चरतां चरतां गाय बरीच दूरवर गेली. तिच्या शिंगाला लांबलचक दोरखंड बांधलेलें होतें. माझ्या अंगाला राहिलेलें त्याचें टोंक धरून मी गाईला परत ओढूं लागलों. गाय जवळ येईना, मी जोर करतांच गाय बेफाम बनली. गाय मोठी, हलकी, चपळ होती. तिचा मोहराहि मोठा देखणा आणि मानीपणाचा दिसे. मी परत ओढीत आहें हें तिला खपलें नाहीं. पाठीवर शेंपटी घेऊन चारहि पाय उचलून ती उड्या मारूं लागली. मी दोर ओढीतच होतों. या झटापटींत त्या लांबलचक दोराचे तीन-चार विळखे माझ्या पायांभोंवतीं पडले. गाय तर उड्या मारीत पळूं लागली. माझी फरफटच झाली. इमानी खंड्या शेजारीं होता. त्यानें माझी स्थिति ओळखली आणि तो गाईच्या समोर जाऊन तिला आडवूं लागला. गाय वळेल तिकडे खंड्या पुढें होई. त्यानें भुंकून भुंकून त्या गाईला मार्ग बंद करण्याची वेळ आणली. गाईला कुत्र्याइतकी अक्कल नसते. दोन्ही प्राणी माझ्या चांगल्या संवयीचे होते. पण एकानें माझी स्थिति अगदीं भयंकर करून सोडली व दुसऱ्यानें ती ओळखून मला वांचविण्याची शिकस्त केली. खंड्याच्या या पराक्रमाचें स्मरण मला चांगलेंच राहिलें आहे. माणसाला जशी स्वकीयांबद्दल काळजी वाटावी तशी या कुत्र्याला वाटली आणि त्यानें त्या गाईला असें रोखून धरलें कीं, तिला थांबणें भागच पडलें. त्या प्रसंगाच्या खुणा अजूनहि माझ्या दंडावर आहेत आणि खंड्याच्या उपकाराचें स्मरणहि माझ्या मनांत तितकेंच कायम आहे. चालू गोष्टीचें बरोबर आकलन होणें ही कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. मी दोर ओढीत होतों तोंपर्यंत खंड्या स्वस्थच होता, पण गाय बेफाम बनून माझ्या पायाला विळखे बसतांच मात्र 'आतां आपण कामाला लागलें पाहिजे' असा बुद्धिनिश्चय खंड्यानें केला व आपल्या पराक्रमानें त्यानें गाईला वठणीवर आणलें. ही समजशक्ति विशेष होय.

आम्हीं प्लेगचे दिवस रानांत काढले आणि प्लेग संपला म्हणून घरीं परत आलों. एक आठवडा गेला असेल. खंड्या गोठ्यांतील आपल्या जागे-

वरून एके दिवशीं सकाळीं बाहेर पडला नाहीं. थोडेसें ढोसल्यावर तो बाहेर आला; पण मागलेपुढले पाय ताणताणून आळस देऊं लागला; डोळे आणि मान लांबवून नाकानें कांहीं चमत्कारिक फूत्कार करूं लागला. आम्हांला वाटलें खंड्याला थंडी झाली असावी आणि म्हणून तो आळसावला असावा. दुपारीं नेहमींप्रमाणेंच दूधभाकरीचा काला त्याच्या पुढें आणून ठेवला; पण खंड्यानें पडल्या पडल्याच मान वर करून त्या काल्याकडे पाहिलें आणि तो पुन्हां मुरकटून पडला. त्याला मीं पुष्कळ आंजारलें-गोंजारलें; 'खंड्या, खंड्या' म्हटलें; पाठीवर थोपटून 'ऊठ ना' म्हणून दोन-तीनदां जोरानें ओरडलों; पण घशांतून गुरगुर काढून तो अधिकच सताड पसरला. वाचकाला खोटें वाटेल पण खंड्याचें अंग तापलेलें होतें. माझ्या हाताला तें कळलें. तेव्हां मात्र आम्हांला निराळी शंका आली. काय करावें हें कळेना. खंड्याला बहुतेक प्लेग झाला असावा असें सर्वांना वाटूं लागलें. पण त्यावर कांहींहि औषध नव्हतें. केवढीहि किंम्मत पडली असती तरी आम्हीं ती दिली असती. पण काय होतें हें पाहाण्यापलीकडे कांहीं करतां येईना. यामुळें तर फारच दुःख वाटूं लागलें. संध्याकाळीं खंड्या अगदीं गळाटला. त्याची मान ठणकत होती. त्याला सांगतां येत नव्हतें, पण त्याच्या चलनवलनावरून ध्यानांत आलें. मी हातानें त्याची मान चाचपून पाहिली तों आंब्याच्या कोयीसारखी गांठ हाताला लागली! अरेरे! खंड्या प्लेगनें मरणार हें आतां ठाम ठरलें. त्यानें अन्नपाणी सोडलेंच होतें. तो आतां डोळेहि उघडीना. खंड्या केवळ घरांतलें माणूस. पण मुकें माणूस इतकेंच काय तें. आणि म्हणून वाईट वाटूं लागलें. आम्हीं सारीं कष्टी होऊन बसलों. प्लेगच्या दिवसांत, चोरांचिलटांच्या भयांतून खंड्यानें आम्हांला संभाळून घरीं आणलें आणि आतां आम्हीं सारें सुखरूप झाल्यावर तो आपण स्वतः प्लेगनेंच मरत आहे, हें पाहून तर आम्हांला पराकाष्ठेची हळहळ उत्पन्न झाली. माझा मधला भाऊ फारच मायाळू होता. तो अगदीं ओक्साबोक्शीं रडूं लागला. दुःखानें दुःख पसरत जातें. आम्हीं सारीं माणसें चांगलीं धष्टपुष्ट आणि दिसायला थोडींशीं उग्र, पण खंड्याच्या या दुखण्यानें आमच्या तोंडचें अगदीं पाणी पळालें. दुसऱ्या दिवशीं खंड्याचे पाय थडथडूं लागले. ते ताठहि झाल्यासारखे वाटूं लागले. आतां त्याला शुद्ध नव्हती. दोन तासांनीं,

म्हसवडकडच्या माळावरच्या गोठ्यांत जन्मलेला हा जीव, आमच्या घरीं सातान्यास वाढून, मौजेंत दिवस घालवून, प्लेगनें नाहींसा झाला.

ज्यांच्या घरीं मायेचीं जनावरें आहेत त्यांना मी काय म्हणतों तें कळेल. घरांतलें माणूस गेल्यानें मनाला जें दुःख होतें तेंच आम्हांला झालें आणि पुढें कित्येक दिवसपर्यंत या शूर, सुंदर, व इमानी प्राण्याच्या आठवणी आम्ही एकमेकांना घोळघोळून सांगत होतों. आज एकूणचाळीस-चाळीस वर्षें झालीं; पण या श्वानयोनींत जन्माला आलेल्या आमच्या मित्राची माझी आठवण पहिल्याइतकीच ताजी आहे. आणि तो गेल्याचें माझें दुःख पहिल्याइतकेंच तीव्र आहे. माझ्या घरांतील जीं माणसें आजवर दिवंगत झालीं आहेत त्यांच्या स्मृतींची उजळणी जेव्हां एखाद्या वेळीं माझ्या मनांत चालू असते तेव्हां या अबोल प्राण्याचें स्मरणहि मला होतेंच होतें. खरोखर याला जर बोलतां आलें असतें तर, काय मौज झाली असती. मानवी कृतिच केवळ अपुऱ्या असतात असें नाहीं. विधात्याच्या कृतीसुद्धां किती ठिकाणीं तरी अपुऱ्या दिसतात. हा सिद्धान्त सिद्ध करायला अजूनहि कांहीं उदाहरणें हवींच असलीं तर, आमच्या खंड्याचें उदाहरण सहज उपयोगी पडेल.

---

## कठिण शब्दांचे अर्थ

टिपूस = थेंब. पोट भकाटीला जाणें = पोट खोल जाणें. बेणीं = बीजें, जाती. थोराड = मोठा. दांड = दणकट. कोके = कानाच्या पाळी. नाकोटें = नाकाड. अश्राप = निष्पाप. ममत्व = आपुलकी, प्रीति. डबरें = खड्डा. गडगा = दगडी गोटे रचून केलेली घराभोंवतालची कुंपणवजा भिंत.

## अभ्यास

( १ ) खंड्याला वाचा असती तर आपण आपल्या मालकाला गाईच्या तडाक्यांतून सोडवल्याचा प्रसंग त्यानें कसा वर्णन केला असता ?

( २ ) तुम्हीं पाळलेल्या एखाद्या आवडत्या पशूचें किंवा पांखराचें वर्णन पंधरा-वीस ओळींत करा.

( ३ ) या लेखांत समाजांतील निरनिराळे प्रतिष्ठित लोक आपल्या धंद्यांत कसा अप्रामाणिकपणा करतात त्याचें विनोदी वर्णन लेखकानें केलें आहे. या यादींत न आलेले कांहीं धंदेवाईक लोक घेऊन त्यांची आपापल्या धंद्यांतील लबाडी विनोदी भाषेंत वर्णन करा.

( ४ ) ‘ आपलें ममत्व अशा प्राण्यांपर्यंत पोहोंचणें अवश्य आहे, ’ या विधानांतील विचार स्पष्ट करा.

● ● ●

# संगीताचा जन्म : : ७

[ ' रसवन्तीची जन्मकथा ' या पुस्तकांतून प्रस्तुतचा उतारा घेतलेला आहे. ' गेयता हें काव्याचें प्रमुख लक्षण आहे ' असा एक नवा विचार या पुस्तकांत प्रा० माटे यांनीं मांडला आहे. पूर्वीच्या काळीं सर्वच वाङ्मय हें कवितारूप असावयाचें. त्यामुळें, ज्यांत शृंगार, वीर, करुण इत्यादि रस असतील, ज्यांत उपमा, रूपक वगैरे अलंकार असतील तें काव्य. ही काव्याची व्याख्या त्या वेळीं समर्पक असे; परंतु आतां छापखान्यांचा प्रसार होऊन लेखनाचें मुद्रण सुलभ झालें आहे. त्यामुळें लेखक लोक हे गद्य-लेखनाकडे झपाट्यानें वळले आहेत. आणि रस व अलंकार या दोन्ही गोष्टी गद्यांतहि आतां भरपूर प्रमाणांत आढळत आहेत. त्यामुळें 'गेयता' म्हणजे ' गातां येणें ' हें एकच काव्याचा वेगळेपणा दर्शविणारें लक्षण आहे. हा या पुस्तकांतील विवेचनाचा सारांश आहे.

खालील उताऱ्यांत, ताल व स्वर या ज्या गायनांतल्या अगदीं प्राथमिक गोष्टी, त्यांचा परिचय मनुष्यानें निसर्गापासून कसा करून घेतला असेल याचें अतिशय मनोरंजक विवरण लेखकानें केलें आहे. सृष्टीच्या प्रारंभकालीं निसर्ग आणि मानव यांचें निकट साहचर्य असे. आकाश, वायु, जल इत्यादि पंचमहाभूतें मनुष्य त्या वेळीं प्रथमच बघत होता. पशुपक्ष्यांच्या, वृक्षवेलींच्या हालचाली तो प्रथमच निरखीत होता. एकीकडे निसर्गातील विविध चमत्कारांनीं विस्मय पावतां पावतां व त्याचें कौतुक करतां करतांच दुसरीकडे त्यांच्याकडून तो अनेक नव्या गोष्टीहि शिकत होता. तळ्यांतील लाटांचे आघात, पांखरांच्या पंखांची फडफड, हरणांची चौखूर दौड यांवरून मनुष्याला तालाची प्रथम कल्पना आली व पुढें, कळकीच्या बेटांतून घोंगावणारा वारा, सिंहाची गंभीर गर्जना, कोकिळ, साळुंकी, चण्डोल इत्यादि पक्ष्यांचें मंजुळ गायन यांवरून तो स्वरविस्तार करावयास

शिकला. अर्थात् मनुष्य ताल व स्वर कसा शिकाला असेल यासंबंधीं लेखकानें मांडलेली ही एक केवळ उपपत्ति आहे. परंतु ती मांडतांना आपलें विवेचन त्यानें किती सुबोध आणि मनोरंजक केलें आहे तें बघण्याजोगें आहे. ]

सृष्टींतील कोणते ध्वनी ऐकून माणसानें गायनाच्या सुराचा अनुकार केला असावा हें ठरविणें मनोरंजक असलें तरी कठिण आहे. गायनांत ज्या दोन गोष्टी अगदीं सामान्य माणसाच्यासुद्धां ध्यानांत येतात त्या म्हणजे 'ताल' आणि 'स्वर' या होत. यांपैकीं ताल हा त्याला कदाचित् पहिल्यानें कळला असावा. सृष्टीचे व्यापार म्हणजे ऊन पडणें, पाऊस पडणें, वारा वाहणें किंवा आकाशांतील गोलकांचें वेळापत्रक अगदीं बरोबर चालणें, यांवरून ठरलेल्या गोष्टी पुन्हां पुन्हां नेमक्या वेळींच घडतात हें त्यांच्या प्रथम ध्यानांत आलें असेल, आणि म्हणूनच तालबद्धतेची प्रास्ताविक कल्पना जरी त्याला प्राप्त झाली असली, तरी प्रत्येक तालाची म्हणजे ठेक्याची कल्पना यावयास आतांच सांगितलेल्या प्रकारांहून अधिक जवळच्या व लवकर लवकर घडणाऱ्या गोष्टी त्याच्या लक्षांत यावयास हव्या होत्या.

कदाचित् शेजारच्या तळ्यांतील लाटांचें एकामागून एक सारख्या अंतरानें येणें आणि कांठच्या खडकाशीं टाळी देणें, यानेंहि तालाची अगदीं सूक्ष्मतम कल्पना नकळत त्याच्या मनांत शिरली असेल. मोठमोठे गृध्रपक्षी डोक्यावरून जवळून जात असतां त्यांच्या पंखांच्या झापा सारख्या अंतरानें वाजत असलेल्या ऐकूनसुद्धां तालाची कल्पना त्याला कळली असेल. क्रूर श्वापदांनीं भिवविल्यामुळें हरणांचीं पाडसें त्याच्या शेजारून जेव्हां चौखूर निघालेलीं त्यानें पाहिलीं असतील तेव्हां कोणत्याहि गायनशाळेंत तालाचें शिक्षण न घेतलेलीं हीं हरणें कांहीं ठराविक ठेक्यावर दौडत चाललेलीं आहेत हें याच्या कानांनीं खास ओळखलें असेल. पण हे दूरचे प्रकार पाहात असतां आणि त्यांविषयीं आश्चर्य पावत असतां रात्रीच्या अंधारांत तो मुरकटून पडला असतांना आपल्याच बरगडीखालीं कांहीं तरी ठक-ठकत आहे आणि त्याचे ठोके सारख्या अंतरानें पडत आहेत आणि अशा रीतीनें दुरून अनुमानितां येणारा ताल आपल्याच अंगांतसुद्धां आहे हें पाहून

त्याचें आश्चर्य दुणावलें असेल! आणि काळजांच्या ठोक्याहूनहि सूक्ष्म आवाज काढणारी आणि मंद गतीनें चालणारी श्वासोच्छ्वासक्रिया त्याला ज्या वेळीं कळून आली तेव्हां आतां आपल्या शरीराचें परीक्षण आपणच केलें पाहिजे आणि हा ताल कोठें कोठें आहे हें पाहिलें पाहिजे असें त्यास वाटलें असेल; आणि सकाळीं उठून इकडे तिकडे हिंडूं लागल्यावर, मागें-पुढें होणाऱ्या हातांची गति आणि आळीपाळीनें पडणाऱ्या पावलांची गति ही पाहिल्यावर तर, त्याची तालाची कल्पना निःसंशय कायम असली पाहिजे आणि त्या ठेक्यामुळें त्याला सहज आनंद वाटूं लागला असला पाहिजे. गायनांतील तालाचा आरंभ अशा रीतीनें संशोधितां येण्यासारखा आहे. तालानें आनंद कां वाटावा याचें उत्तर एवढेंच आहे कीं, तसें आपोआप होतें. सृष्टींत ऐकलेल्या ध्वनीचा प्रतिध्वनि उमटवावा अशी इच्छा माणसाला कां झाली या प्रश्नाचें उत्तर जसें 'ती आपोआप झाली' हें आहे तसेंच तालामुळें आनंद उद्भवण्याच्या बाबतींतहि म्हणावयास हवे.

ही तालाची अथवा ठेक्याची कल्पना आपल्या सगळ्या जीविताला व्यापून राहिलेली आहे. जी वस्तु मुळांत सुखप्रद असते तिची पुनरावृत्ति ठराविक वेळेला झाली म्हणजे त्या सुखांत भर पडत जाते हें खरेंच आहे. पण वास्तविक जी वस्तु मुळांत सुखप्रद नाहीं अर्थात् हमखास दुःखप्रदहि नाहीं तीसुद्धां जर ठराविक वेळेस पुन्हां पुन्हां प्राप्त झाली तरी त्या ठराविक पुनरावृत्तीनें सुद्धां एक तऱ्हेचें सुख उत्पन्न होतें. आपल्या घरा-शेजारीं जर एखादी पिठाची गिरणी असली तर, या पुनरावृत्तीचा अनुभव हमखास येतो. तिचें तें फक्फकणें मोठें श्रवणमनोहर आहे असें म्हणवत नाहीं. पण तेंच सारख्या ठेक्यावर ऐकूं येऊं लागलें म्हणजे त्यांतील त्रास-दायकपणा कमी होऊं लागतो. सारख्या ठेक्यानें ऐकूं येण्याऐवजीं तें फक्फकणें मधूनमधून कसेंहि कानीं येऊं लागलें तर, आपल्याला त्रास होतो. पण हा अनियमितपणा घालवून तोच आवाज जर नियमित येऊं लागला तर, ठेका धरल्यासारखें वाटून आपल्या मनाला किंचित् आंदोलन उत्पन्न होतें आणि त्यामुळें बरें वाटतें. पुष्कळांना असाच अनुभव आगगाडींतहि आला असेल. अर्धवट झोंप येत आहे म्हणून डोकें टेकून निजावें तों चाकांची रुळांवर चाललेली कर्कश खडबड ऐकूं येऊं लागते. मग लहान

ग्रं. क्र. ७३८६

लहान उड्या मारण्याच्या चाकांचा जसा कांहीं धर्म असावा असें वाटून दर लहानशा झेपेसरशी ती खडबड थोडी गोड वाटूं लागते. तिच्या त्या नियमितपणामुळें आणि आपल्या अंगांत भिरलेल्या गतीमुळें त्या खडबडीला ठेका प्राप्त होतो आणि मग आपल्या ओळखीचे कोणते तरी शब्द त्या ठेक्यावर बसवून लहान मुलें गाऊं लागतात, 'कशासाठीं—पोटासाठीं, खंडाळ्याच्या—घाटासाठीं'! ठेक्याचा परिणाम शेवटीं इतका होतो कीं, हे शब्द त्या चाकांतूनच निघत आहेत असें त्या मुलांना वाटतें.

बायका भाकरी करावयास बसलेल्या असतात. तेव्हां परातींतल्या भाकरीवर उजव्या हाताचा पंजा वळवितां येईल तितका डावीकडे वळवून घड्याळाच्या कांट्याप्रमाणें तो त्या भाकरीच्या अंगावरून थापटीत थापटीत त्या उजवीकडे नेतात. उजव्या अंगास तो अगदीं पूर्णपणें पोंचला म्हणजे पुन्हां डाव्या अंगाला त्या तो वळवितात. पण हें होत असतांना खुद्द भाकरी करणारिणीला आणि शेजारीं खुरमांड्या घालून बघत बसलेल्या मुलांना तालाची जाणीव आपोआप होते; आणि तालानें मनाला किंचित् झोका मिळत असल्यानें तिला तें कष्टाचें कामसुद्धां करमणुकीसारखें वाटतें. घराचें बांधकाम चालू असतां दगडाच्या किंवा चुन्याच्या पाट्या खालून वर द्यावयाच्या असतात. वास्तविक हें काम अतिशय कष्टाचें आणि हाडांना शीण आणणारें असतें. पण यांतच कामकरी लोक प्रथम ठेका उत्पन्न करतात. त्या ठेक्यानें सूक्ष्म आंदोलन उत्पन्न होतें. या आंदोलनानें श्रमालासुद्धां करमणुकीचें रूप येतें. आणि त्यांतच जर का त्या ठेक्यावर म्हणतां येण्यासारख्या चुटपुटत्या शब्दसंहति असल्या आणि त्यांतहि जर किंचित् शृंगाराची भावना असली,—'चल ग पोरी, तूं माज्या घरीं—केतकिचं पान् तुज्या सोवं शिरीं'—तर त्या काबाडकष्ट करणारांना श्रमाची बाधा इतकीशी होत नाहीं. निदान झाल्यासारखी वाटत नाहीं. याचें कारण पाहूं जातां अगदीं शेवटचें शृंगार हें आहे; त्याच्या मागचें गायन हें आहे; त्याच्या मागचें मानसिक आंदोलन हें आहे आणि त्याच्या मागचें म्हणजे वस्तूंचा नियमित ठेका अथवा ताल हें आहे. ताल हा आपल्या जीवितांत इतका मुरून गेलेला आहे.

तालाच्या पुढचें स्तवक आंदोलन किंवा झोका हें होय. झोका घेतला असतां आनंद वाटावा हा शरीराचा धर्मच दिसतो. नागपंचमीच्या दिवशीं मोठमोठाल्या वडाच्या झाडांना दोरांचे झोंपाळे बांधून हौशी तरुण लोक या टोंकापासून त्या टोंकापर्यंत पल्लेदार झोके घेऊन कसा आनंद अनुभवितात हें सर्वांनीं पाहिलेलेंच आहे. डुलण्यांत कांहीं एक आनंद असतो हें नाकारतां यावयाचें नाहीं. कांहीं लोक चालतांनासुद्धां डुलतात. मस्त पहिलवान डुलल्यानें सुख पावतो. खाऊनपिऊन चांगली भारावलेली रूपसुंदर गाय चालतांना थोडासा डोल घेते. यानें कदाचित् मत्तपणाचा भार कमी होत असेल. पण डोलण्यानें त्यांना सुख होतें हें खरेंच. विड्या करणाऱ्यांची गोष्ट पुष्कळांनीं पाहिली असेल. वास्तविक पाहतां त्यांत शरिराला झोका देण्याचें कांहींच कारण नसतें. पण असें दिसून येईल कीं, आपण जसें कांहीं एखाद्या जडशीळ कामांत गुंतलेलों आहों अशा ऐटीनें ते विडी करणारे थोडे थोडे डुलत असतात. संतोष व्यक्त करण्यासाठीं डुलण्याची चाल आहे. फारच आनंद झाला तर, उड्या माराव्या लागतात; पण संतोष हा आनंदाचें पहिलें स्तवक असून गंभीर असतो आणि म्हणून तो केवळ डुलण्यानें व्यक्त होतो; मग त्याचें कारण कानाला गोड लागलेलें गायन असो, भव्य विचारदर्शन असो किंवा नयनमनोहर अशी एखादी प्रतिमा असो.

या डोलण्यानें म्हणजे आंदोलनानें ज्याचा त्याला आनंद होतोच; पण तें आंदोलन पाहाणारालासुद्धां तो आनंद होतो. कारण त्या पाहाणाराच्या अंगांत सहानुभूतीची म्हणजे तोच अनुभव घेण्याची शक्ति असते. जोराचा वारा सुटला म्हणजे पालवीनें गजबजलेल्या आंब्याच्या मोठमोठाल्या फांद्या अंतराळांत झेंपावूं लागतात. झोके घेतांना फांद्यांना काय सुख होतें हें सांगतां येण्यासारखें नाहीं; पण त्यांचे ते झोके पाहणाराला अतिशय आनंद होतो यांत कांहींच संशय नाहीं. आपल्या परसांत जर कळकीचें बेट असलें आणि हिरव्यागार बारीक बारीक पानांनीं सुशोभित झालेले त्यांचे पल्लेदार फोक जर वाऱ्यांत झोके खात असले तर, परसांत आंचवावयास गेलेल्या खेळकर वृत्तीच्या मुलांना त्यांच्याकडे पाहून मोठा हर्ष होतो आणि बालपणीं सहानुभूति प्रखर असल्यामुळें तींहि तशाच माना डोलवितात. असा हा आंदोलनाचा प्रभाव आहे. वर सांगितलेल्या तालाला हें आंदोलन मिळालें म्हणजे

प्रमुदित वृत्ति व्यक्त करण्यासाठीं त्याच प्रकारचीं आंदोलनें आवाजाला द्यावीं असें माणसाला वाटूं लागतें; आणि एका टोंकापासून दुसऱ्या टोंका-पर्यंत झोका घेणारा मागेंपुढें होत असला तर, आपल्या आवाजांतहि त्याच्या झोक्याइतका पल्लेदार झोका उत्पन्न करूं पाहाणारे लोक त्याला साथ करतात; आणि अशा रीतीनें जें केवळ बाहेर दिसत होतें किंवा ऐकूं येत होतें तें आंदोलित आवाजानें आंतून प्रकट होतें.

वर एके ठिकाणीं म्हटलेंच आहे कीं, ताल आणि स्वर हीं दोन्ही माणसानें सृष्टींतूनच उचललेलीं असावीं. त्याला तालाची कल्पना कशी आली, तालांतून आंदोलन कसें उत्पन्न झालें आणि शेवटीं बाहेरचें आंदोलन आवाजाला आंदोलन देऊन व्यक्त करावें ही इच्छा त्याला कशी झाली हें स्पष्ट केलेंच आहे. कंठांतून कांहीं एक आंदोलित आवाज निघाला खरा आणि त्यानें उल्हसित मनोवृत्ति व्यक्त झाली हेंहि खरें. पण बाहेरचें आंदोलन आवाजाच्या अनुकरणानें व्यक्त करणें एवढ्यानेंच स्वराची कल्पना पूर्ण झाली नसली पाहिजे. त्यानें जसें कांहीं त्रुटित ध्वनी कानांनीं ऐकले होते, तसे कांहीं सुदीर्घ ध्वनीहि त्याच्या कानीं खास पडले होते. सृष्टीच्या व्यापारांतून जे ध्वनी त्यानें ऐकलेले होते त्यांचे प्रतिध्वनी उमटवून माणसानें मूलधातु बनविले; पण कांहीं सृष्टिव्यापारांतून व कांहीं पशुपक्ष्यांच्या आवाजां-तून चमत्कारिक सुरेल आवाजहि त्यानें पुन्हां पुन्हां ऐकलेले असले पाहिजेत.

लांब अंतरावर असलेल्या सिंहाची गर्जना जरी भयप्रद असली तरी ती दूर असल्यामुळें तिच्यांतील भयप्रदता कमी होऊन उरलेला गंभीर आणि मंद्र ध्वनि त्यानें निःसंशय आवडीनें ऐकला असला पाहिजे; आणि अनुकरण हें तर त्याच्या प्रवृत्तींत पाहिल्यापासून कायमचेंच होतें. एवढा गंभीर पण सुदीर्घ ध्वनि कानीं आल्यावर त्याचें अनुकरण आपणहि करावें असें वाटणें स्वाभाविक होतें. रानावनांतून एकटेंच हिंडतांना झाडांच्या फांद्यांतून, कळकीच्या बेटांतून, किंवा केवळ उंच पठारावरून, घोंघावत जाणारा वारा मधून मधून मोठे सुरेल शब्द काढतो हें त्यानें ओळखलें असलें पाहिजे. वालुकामय प्रदेशाची ज्यांना माहिती आहे ते सांगतील कीं, रानटी लोक कित्येक शतकें असें समजत होते कीं, वाळूच्या पोटांतून देवता गात असतात. अर्थात् तेथें देवता वगैरे कोणी नव्हत्या. त्या प्रदेशाचे खालचे

खालचे थर असे बनलेले असत कीं, नाना प्रकारचीं ऱ्हस्व-दीर्घ छिद्रें त्यांच्यांत राहून जात आणि एकदां वाऱ्याची झुळूक त्यांत शिरली म्हणजे या वाळुकेश्वरी आपोआप गाऊं लागत. हें देवतांचें मंजुळ गाणें पहिल्या पहिल्या माणसानें कितीदां तरी ऐकलें असेल. कोकिळा गाते हा केवळ कविसंकेत आहे असें आपण समजतों. पण ज्या वेळीं माणसाची श्रवणशक्ति अगदीं ताजी होती आणि सर्व सृष्टपदार्थांविषयींचें त्याचें कुतूहल सारखें जागृत असे, त्या वेळेस कोकिळेच्या 'कुहू'तून किती गोड ध्वनि उमटत आहेत हें त्यानें निःसंशय ओळखिलें असलें पाहिजे. पण साळुंकी, चण्डोल अशांसारखे कित्येक पक्षी केवळ त्रुटित असे स्वर काढतात असें नव्हे, तर ते लांब लांब तानासुद्धां मारतात. हें गाणें त्यांना मूळचेंच येतें. आपल्या त्या रसिक आणि भावड्या पूर्वजांनीं या सर्वांना आपलें गुरु केलें आणि त्यांनीं वारंवार दिलेली संथा इतकी हुबेहूब वठविली कीं, गुरूला जो स्वरविस्तार वश होत नव्हता तो आपल्याला वश होत आहे हें त्यांच्या प्रगमनशील मनानें चटकन् ओळखिलें. वृत्तीचें आंदोलन व्यक्त करण्या-साठीं आपल्या आवाजाला झोका द्यावा हें त्यांना माहीत झालेलें होतें. त्या झोक्याची आणि आतां सांगितलेल्या सुस्वर शब्दांच्या अनुकरणाची गांठ पडली आणि त्या दिवसापासून माणसाला गातां येऊं लागलें.

क्रोध आला असतां सिंह गर्जना करतो, पाडस दिसेनासें झालें असतां विरहानें गाय हंबरते व रानचा वारा पिऊन आणि पिकलेलीं फळें खाऊन आनंद पावल्यामुळें साळुंकी गाते, याचें आपल्या आंदोलित वृत्तीशीं असणारें साधर्म्य हेंहि त्याला निःसंशय कळलें; आणि ही जाणीव उत्पन्न होण्याच्या आधीं निरनिराळ्या भावना कशा प्रकट कराव्या हें पूर्वीं आपणाला कळत नव्हतें, पण आतां मात्र कळलें हें पाहून माणसाला खरोखरच हर्ष झाला असेल. स्वरांचा लंबायमान सुरेलपणा आणि भावनांचा प्रकर्ष यांचें साहचर्य कायमचें होऊन गेलें. अर्थात् असें समजावयाचें कारण नाहीं कीं, ताल आणि स्वर यांची वर सांगितलेली उपपत्ति केवळ याच अनुक्रमानें बनत गेली असेल. कसें झालें असेल यासंबंधींचा हा एक अजमास आहे.

## कठिण शब्दांचे अर्थ

अनुकार = अनुकरण. गोलक = ग्रह. गृध्रपक्षी = गिधाडें. आंदोलन = झोका. शब्दसंहति = शब्दांचा समुदाय, गाण्याची ओळ. स्तबक = अवस्था, पायरी. जडशील = अवघड, कष्टाचें. त्रुटित = तुटक. मंद्र = जाड. सुराचा एक प्रकार. संथा = पाठ. स्वरविस्तार = स्वर लांबविणें. प्रगमनशील = प्रगति करून घेणारें. लंबायमान = लांबविलेला. साहचर्य = जवळ असणें.

## अभ्यास

(१) 'आपल्या सर्व कला निसर्गाच्या अनुकरणांतून जन्माला आल्या आहेत. त्यांपैकीं गायनकलेचा जन्म कसा झाला असावा हें या लेखांत सांगितलें आहे.' याप्रमाणेंच चित्र-कला व नृत्यकला या निसर्गाच्या अनुकरणानें कशा निर्माण झाल्या असतील तें सांगा.

(२) 'ठेक्यावर गाणीं म्हटलीं म्हणजे जड कामें हलकीं वाटूं लागतात.' असें या लेखांत सांगितलें आहे. 'गाण्यानें श्रम वाटतात हलके' असें कवि केशवसुतहि म्हणतात. 'गाणें गाऊन श्रम हलके' केल्याचीं आणखी कांहीं उदाहरणें सांगा.

अनुक्रम ९७०७१
विभाग २२/७
क्रमांक ८०६
नों. दि. ९५२१५
शाखा

# तारळखोऱ्यांतील पिऱ्या : : ८

[ एक विचारवन्त लेखक म्हणून प्रा० माटे यांची जरी ख्याति असली तरी चिकित्सायुक्त लेखनाइतकेंच लघुकथा, निबंध इत्यादि ललित स्वरूपाचें लेखनहि ते कौशल्यानें व प्रभावीपणानें करूं शकतात. ' उपेक्षितांचें अन्तरंग ' या पुस्तकानें प्रा० माटे यांच्या लेखनचातुर्याचा एक नवाच पैलू रसिकांना दाखवून दिला. या पुस्तकांत प्रा० माटे यांनीं आपल्या लघुकथा एकत्रित केल्या आहेत. समाजामधल्या महार, मांग, रामोशी इत्यादि उपेक्षित वर्गातल्या व्यक्तींच्या जीवनावरतीच या लघुकथा प्रामुख्यानें आधारलेल्या आहेत. कथानकाचें वेगळेपण, ग्रामीण जीवनाचें जिवन्त व रससशीत चित्रण, व्यक्तिरेखांचा ठळक सुस्पष्टपणा, भाषेची डौलदार शैली आणि या सर्व गोष्टींना उठाव देणारी समाजसुधारणेची पोटतिडीक या गुणांमुळें प्रा० माटे यांच्या या सर्वच लघुकथा अत्यंत परिणामकारक वठल्या आहेत. या एकाच पुस्तकानें मराठींतील पहिल्या लघुकथालेखकांत प्रा० माटे यांचें स्थान अढळ झालें आहे.

याच पुस्तकामधून घेतलेली ' तारळखोऱ्यांतिल पिऱ्या ' ही कथा पुढें दिलेली आहे. पिऱ्या हा चोर आहे, दरोडेखोर आहे. तथापि, पिऱ्याविषयीं आपणाला तिटकारा वाटत नाहीं. उलट त्याच्याबद्दल एक तऱ्हेची आदरयुक्त आपुलकी आपणांस वाटूं लागते. कारण, पिऱ्याचें मन गुन्हेगारीकडे कां वळलें याचें लेखकानें सहानुभूतिपूर्वक विश्लेषण केलें आहे. मांग जातीचें चऱ्हाटें वळवण्याचें काम पिऱ्याला मिळमिळित वाटे आणि अंगचें स्वाभाविक शौर्य तर त्याला स्वस्थ बसूं देत नव्हतें. या दोन्ही गोष्टींचा मिलाफ होऊनच पिऱ्याचें मन गुन्हेगारीला प्रवृत्त झालें. शिवाय पिऱ्याच्या हातून होणारे बरेचसे गुन्हे समाजांतले संभावित लोक त्याला हुलीवर घालून त्याच्या हातून करवीत असत. अर्थात् पिऱ्याच्या गुन्हेगारीबद्दल त्याच्या–

इतकेच हे तालेवर लोकहि जबाबदार आहेत. तथापि, असें असतांनाहि शेवटीं हे लोक मोकळे सुटून एकट्या पिऱ्यालाच आपल्या गुन्ह्याची शिक्षा भोगावी लागते हें पाहून आपलें हृदय पिळवटून आल्याखेरीज राहात नाहीं.

पिऱ्या हा दरोडेखोर असला तरी मनाचा उमदा, सरळ व सत्प्रवृत्त आहे. आपल्या पत्नीवर तो प्राणांपलीकडे प्रेम करतो. खंडोबावर असलेली त्याची भक्ति कौतुक वाटण्याजोगी आहे. त्याचें शौर्य पाहून आपलें मन आदरानें भरून येतें. पिऱ्याला चांगलें शिक्षण मिळून त्याच्या अंगच्या गुणांना जर योग्य वाट मिळाली असती तर, काळ्या पाण्यावर जाण्याऐवजीं तो समाजांतला एक प्रतिष्ठित गृहस्थ बनला असता यांत शंका नाहीं. या दृष्टीनें शिक्षा भोगावयास जातांना ' आपल्याला मुलगा होईल त्याला लिहिणें शिकव ' हा पिऱ्यानें आपल्या बायकोला दिलेला संदेश किती सूचक व उद्बोधक आहे !

एका सरळ मनाच्या रांगड्या गड्याचें हें शद्बचित्र व त्याच्या धाडसी जीवनाची झालेली दुर्दैवी अखेर प्रा० माटे यांनीं किती सहानुभूतीनें, आत्मीयतेनें व प्रभावीपणानें रंगविली आहे पहा ! ]

कृष्णा नदी आणि सह्याद्रीचे उंच उंच डोंगर यांच्यामध्यें सातारा जिल्ह्यांत तारळी नांवाची नदी वाहते. भोंवतालचा उतरता प्रदेश तिच्या नांवानेंच मोडतो. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत पडणारें खंडोगणती पाणी या तारळखोऱ्यांतून कृष्णा-कोयनांच्या भरतीला जलदीनें वाहत जातें. हे डोंगर येथें किती युगें उभे आहेत आणि तारळखोऱ्याची झीज किती युगें चालू आहे, हें सांगतां येण्यासारखें नाहीं. तसेंच या खोऱ्यांत राहाणारे मानव नांवाचे निरनिराळे प्राणी येथें किती युगें राहात आले आहेत, हेंहि सांगतां येण्या-सारखें नाहीं. पण सह्याद्रीचीं पठारें आणि सह्याद्रीचे दरे हे कसे बनले आहेत, याची माहिती भूस्तरशास्त्री सांगत असतात. तांबड्या मातीचा थर कोठें आहे आणि मुरमाचा थर कोठें आहे, सगळ्यांच्या वर शेकडों हात जाडीचा काळा फत्तर कसा पसरला आहे आणि सगळ्याच्या खालीं कदाचित् काळी चिकणमाती कशी टिकून आहे याचा तपशील त्यांच्या

तोंडून ऐकतांना लहान विद्यार्थ्यांची मोठीच करमणूक होते. सगळ्यांच्या वरचा काळा फत्तर शेंकडों हात जाड असल्यामुळें महाराष्ट्रांत भूकंप कधींहि व्हावयाचा नाहीं; हें गुरुजींनीं दिलेलें आश्वासनहि विद्यार्थ्यांना मोठेंच समाधान उत्पन्न करतें. पण ज्या मानवी प्राण्यांनीं हें खोरें भरून राहिलें आहे त्यांचेहि थर पाहाण्यासारखे आहेत.

मधून मधून एखादा-दुसरा वरच्या पृष्ठावरचा खडा मुसलमानी आहे; त्याच्या खालीं गुजर मारवाडी आहे; त्याच्या खालीं चित्पावन ब्राह्मण आहे, त्याच्या खालीं देशस्थ ब्राह्मण आहे; त्याच्या खालीं मराठा आहे, पुष्कळ खोल गेल्यावर कुणबी आहे; त्याच्या खालीं मांग-रामोशी आहेत. समाज-सरोवर काळसर गढूळ आहे; त्या पाण्याला कसलाहि 'प्रसाद' राहिलेला नाहीं; पण पाहाणाराची दृष्टि 'प्रासादिक' असली तर, नाना प्रकारचे जल-चर वावरतांना त्याला तेथें दिसतात. जातां जातां दृष्टि तळाशीं गेली म्हणजे भलीं दांडगीं पण जड कांसवें तळाशीं बसलेलीं दिसूं लागतात. एखाद्या वेळीं एखादें कांसव खडबडून उठतें आणि पाण्यांत उरफाटा तीर मारून पृष्ठाकडे विनादिक्कत झेपावत येतें. त्याला पाहून सगळे प्राणी, सगळे जीव गलबल-तात. पिऱ्या मांग अशा धाडसी प्राण्यांपैकींच एक होता.

"आतां मातुर कार झाला! आमाला धरायापाइ तुमी आलाय जनूं! मंग? धरा ना!" पिऱ्या हंसून म्हणाला.

नाईकहि हंसला आणि म्हणाला, "पिराजी, आतां तुम्हांला धरायचं म्हणजे काय करायचं? तुम्हीं एक हिसडा मारला, तर मी या डगरीवरनं खालीं दऱ्यांत जाऊन पडेन!"

"अवं, तुमची भाकरी हाये; न धराल तर सरकार तुमचं डोक्सं मारील."

"जाऊं द्या, तुमची अन् माझी गांठच पडली नव्हती. असं झालं, म्हणजे संपलं."

"हां...हां! ही इगत तुमीं लइ नामी काढली; काडा वाइच तमाकू; वामनबुवा, अवं तुमचा अन् माजा काय वाकुडपणा लागतुया! बसा खिनभर, तुमी आपल्या वाटेनं जा; आन् मी कुठं जाणार त्यें मला इचरूं नका; मंजी संपलं समदं." पिऱ्या थोड्या विश्वासाच्या स्फुरणानें पुढें

सरला आणि शक्तिमंतानें इतरांकडे कौतुकानें पाहावें तसें नाईकसाहेबांकडे पाहूं लागला.

पिऱ्या फरारी झालेला होता; आणि त्याच्या शोधासाठीं पोलीस लोक सगळीकडे हिंडत होते. तो मोकळेपणानें हिंडत राहिला असता तर दडण्यासारखा नव्हता. पूर्वी पाहिलेला नसतांनाहि दहा हजार माणसांतून त्याला तुम्हीं हुडकून काढलें असतें. सृष्टीचीसुद्धां लहर असते. ती एखाद्या माणसावर इतकी फिदा असते कीं, आपल्या पदरच्या उत्तमोत्तम वस्तू ती त्याला खुशीनें बहाल करते. एखाद्याला असें तरतरीत, उच आणि रेखीव नाक देते कीं, तेवढ्या भांडवलावर तो जाईल तेथें त्याला यश मिळत जातें, आणि माणसें निमूटपणें त्याला वश होतात; एखाद्याला असे पाणीदार डोळे देते कीं, त्याच्या डोळ्यांना डोळा लावून पाहाण्याची कुणाची छातीच होत नाहीं; तो आपल्याकडे पाहात नसला म्हणजे त्याच्याकडे पाहावेसें माणसांना वाटतें; पण त्याची दृष्टि आपणांकडे वळतांच नजर चुकविणें प्राप्तच आहे असें त्यांना वाटूं लागतें. एखाद्याला अशी साकार आणि सुंदर जिवणी आणि चिंचोळी हनुवटी देते कीं, पाहाणाराच्या मनांत त्याच्याविषयीं अकारण प्रीति उत्पन्न व्हावी. हजारों निरनिराळ्या परी उत्पन्न करण्यांत सृष्टि आनंद मानतेसें दिसतें. त्यांतलीच एखादी सुबक पर किंवा तऱ्हा ज्याच्या वांटणीला येते तें माणूस भाग्यवान् ठरतें. पिऱ्याच्या वांटणीला असलें आकर्षक किंवा सुबक सौंदर्य आलेलें नव्हतें; मात्र सृष्टीनें आपल्याजवळचें सगळें उग्र वैभव त्याला दिलेलें होतें. हाडापेरानें पिऱ्या भला मजबूत असून वाईट दिसेसा उंच नव्हता. रानचा वारा सतत पीत असल्यामुळें आरोग्य आणि चपळपणा हीं त्याच्या मुद्रेवर स्पष्ट रेखलेलीं असत. ज्या डोंगरकठडीचा आश्रय त्याला सहस्र वेळां घ्यावा लागे तिचा एक सुटा पाषाण असल्यासारखाच तो होता. त्याच्या जातीचें मुख्य लक्षण जे लाल डोळे ते त्याला अधिकच लालबुंद लाभलेले असल्यामुळें लांडग्यांनासुद्धां त्याचें भय वाटावें अशी स्थिति होती.

बिचारा 'बामन' नाईक तपासांत हिंडतां हिंडतां डोंगराची एक कपारी चढून जों वर येतो तों हा डहाण्या वाघ सकाळच्या उन्हांत स्वस्थ बसलेला पुढें दिसला ! नाईक त्याच्या इतका जवळ प्राप्त झाला कीं, निसटून जाणें, किंवा पाहिलें न पाहिलेसें करणें त्याला शक्य नव्हतें.. चाहूल लागतांच

पिंजारलेल्या मिशांनिशीं आणि खून चढलेल्या डोळ्यांनिशीं पिऱ्यानें आपली मान वळवून मागें पाहिलें; दोघांची दृष्टादृष्ट झाली. धामणीच्या डोळ्यांना डोळा भिडला म्हणजे म्हैस पेंगळून खालीं बसते. नायकाच्या अंगाला दरदरून घाम फुटला! आसपास दहा पांच कोसांत कोणी नव्हतें. पिऱ्या आणि आपण, वाघ आणि मेंढी एवढींच आहों, हें नायकानें पाहिलें आणि आत्मसंरक्षणाचीं त्याच्या अंगांतील इतर कसबें आपोआप पुढें आलीं. त्याला सगळें विश्व आठवलें! पण तो झटकन् सावरला आणि त्यानें पिऱ्याला लवून रामराम केला. पिऱ्याला उगीच पिचकाऱ्या मारण्याची संवय होती. पिचकारी मारून तो म्हणाला, 'कुनीकडं चाललं बामनबुवा? अवं, इकडं आडरानांत कुनीकडं?' पण हें म्हणतांना त्यानें पाहिलें तों 'बामन' जरा 'न्यारा'च दिसला. मध्यम उंचीचा, अंगानें कसा जाडजूड, धोतराचा एक काचा मारलेला, केंस राखलेला अन् उर्मट वळणाचा रुमाल बांधलेला असा तो गृहस्थ पाहातांच पिऱ्यानें ताडकन् हेरलें कीं, आपल्या शोधांत फिरत असलेला हा एखादा पोलीस असावा. पण त्याची ती केविलवाणी स्थितिहि त्यानें पाहिली. पिऱ्या जागचा उठला, हंसतमुखानें त्यानें त्याचा हात धरला व त्याला जवळ बसवून घेतलें.

"मंग! नाईक, आमाला तुम्ही आतां कसं धरनार?' असें म्हणून पिऱ्या मनापासून हंसला. दोघांचा मनोमिलाफ झाला; नायकाची अगतिक स्थिति आणि पिऱ्याचें विनोदी औदार्य यांचा चमत्कारिक संगम झाला आणि शेवटीं तो म्हणाला, "बामनबुवा, जावा तुम्ही आतां आपल्या मुलांलेंकरांत कुशाल नांदा तुम्ही; आमच्या कपाळीं बगा ह्ये असं लिवलंया! आमाला तकडची काय बी खबर नस्ती, अन् कुनी एखांदा तालेवार आमाला घालतो हुलीवर अन् आपलं काम करूनशान् घ्येतो. अन् आमावर घोरपड आली मंजी अंग झाडून पार मोकळं हुत्याती, अन् मग आमाला असं रानावनांत येऊन पडावं लागतं. त्येचा आमचा काय वाकुडपना व्हता काई? त्ये कोन अन् आमी कोन्! पन ह्ये म्हंगालं, पिऱ्या ल्येका! येवढं काम कर, तुला जरीचं मुंडासं बांधूं, अन् आमच्या गळ्यांतली कंटी तुज्या गळ्यांत घालूं. आमी तडाका दिला त्यो जरा वाइच जास्त बसला, आतां काई करतां! असं रानावनांत फिरतुया.

पन तुमाला खंडोबाची आन नाईकदादा ! जावा तुम्ही आतां...पन बामन-बुवा ! आमुशा कवा येतीया व ? " अमावास्या केव्हां येते, हें सांगून नायकानें रामराम केला आणि जिवानिशीं सुटलों म्हणून आनंद मानीत आणि पिऱ्याच्या भाबड्या व उदार स्वभावाची तारीफ करीत तो त्वरेनें निघून गेला. तो पुरेसा दूर गेलासें पाहून पिऱ्याहि आपल्या उद्योगाला लागला.

" कारबारनी, तूं आलिस म्हून लइ नामी झालं; मला कसनुसं व्हतया; चांग्यानं बरबाट क्येलं व्हतं, त्ये खाल्ल्याधरनं लइ बंगाळ वाटतया. " पिऱ्या चंद्रीला म्हणाला, " पन त्वां पाला ठेचूनशान दिला, तवाच्यान उलीसं बरं हाये. " चंद्री हसून थोडी लाजून म्हणाली, " हाइच माझा हातगुन तसा ! पन् तुमी आतां हाकडल्या मुलकाला न्हाइ ऱ्हावावं, सरकारी मानसं मुरदाडं जकडं तकडं हिंडत्यात. अन् आपल्यांत बी पैशापायीं घात करनारीं माणसं हाइतींच कीं. "

पिऱ्यानें उत्तर केलें, " तूं म्हनतियास त्ये बी खरं, पन् येंवढी खंडुबाची जत्रा उरकूनशान मग मी जाईल. ह्ये बग, वर्सांतनं येकदां खंडुबाचं दर्सान घडतया त्ये दवडावं कसं ? जिवाला जपावं, तर दर्सान् बुडतया. "

" व्हय, पन्–" चंद्री म्हणाली, " जीव जगला तर धादां दर्सान घडंल. "

" खरी गोष्ट; पन् धर्माचं काम हाई; समद्या मुलकांतलं जातवालं जमत्यात; आपुन बी जावं. तूं बी चल माझ्या संगटं. आतां काय लई दिस न्हाइ ऱ्हाइलं. "

चंद्रीनें झाडाखालीं गार पाला खूप अंथरला होता; आणि त्यावर पिऱ्याचें घोंगडें घातलें होतें. चंद्रीच्या मांडीला डोकें देऊन पिऱ्या सताड पसरला होता. आडरानांतील डोंगराचें पठार, झाडाची सांवली, वर नील-वर्ण आकाश आणि सभोंवतीं दूरवर पसरलेली रानजमीन. नवराबायको सुखानें बोलत होतीं.

पिऱ्या आडदांड आणि चपळ; शिपायांना झुकांड्या देंण्यासाठीं तो आडमुलखांत वाटेल तशा वेड्यावांकड्या मजला मारी पण घरीं चंद्रीचा

जीव वर-खालीं होत असे. 'पिऱ्या कुठें आहे ?' म्हणून शिपायी तिला पुष्कळदां जाच करीत. पण तिचीहि जरब मोठी होती. चंद्री नवऱ्याला शोभेशीच बायको होती. तिनें आपले दोनहि हात दंडापासून गोंदून हिरवेगार केलेले होते. त्यांत पिऱ्याची फरशीहि गोंदून घेतली होती. ती हातावर असल्यामुळें ती एखादे वेळीं त्वेषानें म्हणे, 'माज्या अंगाला जर का कुनी ब्वॉट लावलं तर चेपलीखालीं त्याला असा मारीन कीं पानी मागून घेयाची न्हाई.' पायांत करकरीत चेपल्या घालून अन् काचा मारून ती चालूं लागली म्हणजे तिला हटकणें कांहीं सोपें काम नव्हतें. पिऱ्याच्या मुक्कामाची बातमी राखून, बरोबर कांहीं गोडधोड करून घेऊन, ही प्रेमळ आणि साहसी स्त्री रात्रीं अपरात्रींसुद्धां त्याच्या मुक्कामाला जात असे. एकदोन दिवस तेथें घालवावे आणि आडवाटेनें पुन्हां घरीं परत यावें, असें ती कितीदां तरी करी !

सडकेच्या बाजूचें केकताड कापावें; तें भिजत घालावें; तें ठेंचावें; त्याचा वाख करावा; त्याचीं चराटें करावीं आणि तीं डोक्यावर घेऊन बाजारांत विकायला बसावें हें पिऱ्यालाहि नकोसें वाटे आणि चंद्रीलाहि नकोसें वाटे. कांहीं तरी चांगलें व मोठें करावें, असें त्यांना वाटे. त्याला चराटें करण्याचें क्षुद्र आणि नेभळें काम नको असे; आणि त्याच्या अंगांत कृष्णाकांठच्या खिलारी खोंडाचें बळ असे. या दोन गोष्टी एक होऊन पिऱ्या 'पुंड' बनला होता आणि त्याच्या पुंडाईचीं रसभरित वर्णनें ऐकून लहानपणींच रंडकी झालेल्या चंद्रीनें त्याच्याशीं पाट लावला होता. त्याच्यावर तिचें प्राणांपलीकडे प्रेम असे आणि त्याचें जीवित सुखाचें करण्यासाठीं ही हिंमतबाज स्त्री हरतऱ्हेचें साहस करी. 'जत्रेला तूं माझ्याबरोबर चल' या पिराजीच्या शब्दांनीं चंद्रीला भारी आनंद झाला. जत्रा होईल हें एक, आणि नवऱ्यावर कांहीं किटाळ आलें तर आपण जवळ असूं ही जाणिव दुसरी. पण नवरा ही गोष्ट बरी करीत नाहीं, हें तिच्या मनानें खास घेतलें होतें. तुम्ही पालीच्या जत्रेचा नाद सोडा असें तिनें त्याला अनेकदां सांगितलें.

पण पिऱ्या म्हणाला, "तूं अशी कशी बोलतियास ? चंद्राबाई, तूं अशी कशी बोलतियास ? समद्या पिर्तिमींत आपल्याला कुनी हाये काइ ? येक आपलं जातवालं, अन् दुसरा पालींचा खंडुबा; वर्सांतनं येकदां दरसान घडतंया; त्यवडंबी सोडलं तर चोरी–दरुड्यापलीकडं काय रायलं ?"

चंद्राबाई स्फुंदून म्हणाली, " आपलं घर संबाळूनशान् ऱ्हावावं; उलीसा कामधंदा बगावा; वलं–कोरडं मिळंल तसं खाऊन दिवस काढलं पाइज्येती; ह्ये असलं काम सत ना नीत कसं चालंल ? आन् कोन चालू देतया ? "

पिऱ्याचा चेहरा जरा बदलला. तो म्हणाला, " मंग काय म्हणतियास ? केकताड कापाया जाऊं ? का ढोराचं मुडदं फाडूं आन् काताडीं मुसुल्मानाला इकूं ? काइ करूं तरी काइ ? ह्यो बग, ह्यो पिरा गुराचं मुडदं फाडाया अन् चराटं वळाया जन्माला न्हाइ आला; हाडकी हाडुळी ह्यो करणारा न्हाइ; योक वादाडा मारीन कुनाला, तर वर्साची बेगमी करीन तुजी. असा म्येललं आन खानारा न्हवं ह्यो पिऱ्या. अग, तूं कां घाबरतियास ? खंडुबा आपल्या पाठीवर हाये; जत्रेला जायचं मातुर सोडूं नगं. "

बोलणें होतां होतां या जोडप्याच्या अंगावर रात्र पसरूं लागली. झाडाखालून उठून तीं दोघें भर खडकावर येऊन बसलीं. गोफण आणि अडीच हात लांबीची ' फरशी ' यांच्या बळावर निर्भय राहून पिऱ्या आणि चंद्री यांनीं कित्येक रात्री भर रानांत उघड्यावर घालविल्या होत्या.

पालीच्या खंडोबाचें देऊळ ज्यानें बांधलें त्याच्या मनांत काय होतें, कुणास ठाऊक ! पण तें चालविणारे लोक तरी पूर्वीं मोठे उदार व धोरणी असावे. तारळखोऱ्याच्या ऐन गाभ्यांत हें बांधलेलें असून प्रतिवर्षीं येथें खूप यात्रा भरते. खंडोबा आणि म्हाळसाई यांच्या लग्नाचा समारंभ दरवर्षीं होतो व त्या निमित्तानें यात्रा भरते. यात्रेला इतर हिंदू येतातच, पण भोंवतालच्या खाऱ्यांतले तमाम मांग लोक जमा होतात; अखिल हिंदू अशा रीतीनें जमा होतात; इतकेंच नव्हे तर एका गमतीदार पीठिकेचें पालन तेथें बिनबोभाट होत राहातें. प्रथम गाभारा, मग सभामंडप, मग प्राकार, मग कुसूं व मग कुसवाबाहेरचें पटांगण असा देवळाचा नेहमींचा थाट असतो, तसाच येथेंहि आहे. इतर ठिकाणीं मांग लोकांना कोण आंत घेतो ! पण येथली पद्धति निराळी आहे. खंडोबाचें आणि म्हाळसाईचें लग्न व्हावयाचें असतें; म्हणून नवरा मुलगा म्हणजे खंडोबा आपल्या घरून निघून नवरीच्या मांडवांत जावयास निघतो. गाभाऱ्यांतून देव बाहेर काढतात व सभामंडपांत आणून पालखींत बसवितात; येथून पालखी प्राकारांत येते, पण अर्थात् कुसवाच्या आंतच असते. पालखी येथें असतांना मातंगांनासुद्धां पालखीला हात लावून

दर्शन घेण्याची सरसहा परवानगी असते. अवघ्या हिंदु लोकांची दर्शनासाठीं होणारी खेचाखेच पाहाण्यासारखी व अनुभविण्यासारखी असते. हा लाभ मातंगांना वर्षांतून एकदां घडतो; अर्थात् त्यासाठीं झाडून सारे मांग लोक या ठिकाणीं जमा होतात. गुन्हे करून फरारी झालेले मांगसुद्धां हा प्रसंग सहसा चुकूं देत नाहींत. मांग लोक इतके जमा होतात व त्यांची इतकी जूट असते कीं, फरारी माणूस येथें दिसत असूनहि प्रत्यक्ष पोलीस अधिकाऱ्यांनासुद्धां त्याच्या अंगाला हात लावण्याची छाती होत नाहीं. प्राकारांतून पालखी बाहेर आली म्हणजे समोर दोनहि अंगांना हजारों मांग रांगांमागें रांगा धरून चालूं लागतात. त्यांच्या हातांत चांगलीं दांडगीं टिकारणीं असून ते तीं उंच उभीं करून धरतात आणि अशा थाटानें खंडोबाची पालखी लगीनघराकडे चालूं लागते. काठ्या वर धरणारे हे मांग नवऱ्यामुलाच्या पुढें पहारेकऱ्यांसारखे चाललेले असतात. म्हाळसाईच्या मंडपांत जाऊन लगीन लागलें कीं, जत्रा जलदीनें फुटूं लागते. पण एवढ्या या प्रहर दीड प्रहरांत अखिल हिंदुमात्राचा तोबा उडतो. भंडारा इतका उधळतात कीं, सर्वांचीं तोंडें व वस्त्रें पिंवळींधमक होऊन जातात. हाहि एक सोहोळाच असतो. जनसंमर्दाच्या खेचाखेचींतील सौरस्य गोड वाटणारांना अस्पृश्यांनाहि संतोष झालेला पाहून अधिकच हर्ष होतो. असा हा प्रसंग मांग लोक कसा जाऊं देणार ? पिऱ्या फरारी खरा, पण ' वर्साचा दिस ' तो वायां कसा घालविणार ?

पालीला आज जत्रेचा मुख्य दिवस आहे. भोंवतालच्या प्रदेशांतील सहस्रावधि लोक जमा झालेले आहेत. खंडोबा आणि म्हाळसाई यांचें लग्न आज व्हावयाचें आहे. लग्नासाठीं लोक जमले तरी वऱ्हाडी मंडळींचीं आपआपलीं म्हणून कांहीं निराळीं कामें असतातच. तसेंच इतके वऱ्हाडी जमत असलेले पाहून त्यांचा उपयोग करून घेणारे लोकहि आपआपलीं कामें पाठीवर घेऊन येतातच. तेथें तर हजारों यात्रेकरू जमलेले; स्वाभाविकच मिठाईवाले, भंडारावाले, खाणावळवाले, कापडवाले, खारीकखोबरेवाले, पवाडे म्हणणारे, तमाशेवाले, खिस्ती मिशनरी, परिषदा भरविणारे, डोंबारी, भराडी, उचले, घंटीचोर, गुप्त पोलीस, उघड पोलीस असे नाना प्रकारचे लोक आपापल्या दृष्टीनें या जनसंमर्दाकडे पाहात दाखल

झालेले होते. माणसांचा गजबजाट आणि त्यांची कालवाकालव अशी होऊन गेली होती कीं, कोणतींहि दोन माणसें एकमेकांच्या ओळखीचीं असतील असें वाटत नव्हतें. पालखीवर टाकण्यासाठीं खोबरें आणि भंडारा विकत घ्यावा म्हणून दुकानांच्या पुढें गिऱ्हाइकांची मनस्वी गर्दी झालेली होती. याच गर्दींत भंडारा घेण्यासाठीं अनेक बाया बापड्या उभ्या होत्या. दिसायला थोडी घट्टमुट्ट पण अडवाणी, जीर्ण सुडकें नेसलेली आणि डोईवरून पुन्हां पुन्हां पदर ओढीत असलेली एक बाई दुकानापुढें मोड घेण्यासाठीं वांकली असतांना तिच्या कानाशीं कोणसें कुजबुजलें, 'त्यांनीं तुम्हांला हेरलं आहे; म्हाताऱ्याला सांग कीं, जलदी करून निसटून जा.' बाई सरळ होऊन त्या माणसाकडे पाहूं लागली तो काचा मारलेला, अंगासरसा जाडजूड, मध्यम उंचीचा अन् केंस राखलेला असा एक गृहस्थ दिसला. तिच्याकडे पाहून तो पुन्हां कुजबुजला, 'माझं काम मीं केलं आहे; आतां तुमचं तुम्ही पाहा; म्हाताऱ्याला जलदीनं बाहेर काढा.' इतकें बोलून तो गर्दींत शिरला आणि दिसेनासा झाला. बाईचा जीव गलबलला. म्हाताऱ्याला तिनें पवाडा ऐकत बसविलें होतें, तिकडे ती त्वरेनें गेली. हऱ्या रामोश्याचा पवाडा रंगांत आला होता. कपाळाला भंडारा फांसलेला, डाव्या हातांत तुणतुणें घेतलेला गांवढा शाहीर आवेशानें उभा होता. उजव्या हातानें आविर्भाव करून त्यानें कडवें म्हटलें, "हरबा म्हन्तो सायबाला, तुमी कुटल्या मुलकाला आला, अव किल्ल्याकोटाच्या वळविला, मी न्हवं झाडाचा पाला, कसं शिवत्याल या द्येहाला, म्या खंडोबाचा भंडारा ल्येला, सायोब बी ऐकूं लागला, त्येचं ध्यान पाहून दचकला, म्हनं राखिस जन्माला आला, कसं धरताया आतां याला, बगुनशान् तवा पाल्हिला, इचवानं नांगा टाकिला, र ऽऽ जी जी ॥ हरबानं ध्येय फुगविला, पट्ट्याला हात घातला, इंदरजितावानी पराक्रम क्येला, हटतां हटतां तटापाशीं गेला, पाठिनं समदा तट चढला, जसा गरुड गगनाला गेला, तसा हरबा गडावर ग्येला, सायोब खालता बोंबलत बसला, अरं जी जी र ऽऽ जी जी ॥" अवघे श्रोते थरारून गेले होते! त्या बाईचा म्हातारासुद्धां बेहोष झाला होता! बाई लगबगीनं आली आणि त्याच्या कोपराला दाबून तिनें त्याला बाजूला

घेतलें. म्हाताऱ्यानें जुनें पांढरें पागोटें कानशिलावरून तिढे देऊन बांधलें होतें. त्याच्या गालांवर पांढरीं झुलपें आणि ओंठावर भरदार तांबूस पांढऱ्या मिशा होत्या. त्याचें पोट फारच सुटलेलें होतें व त्यानें अंगांत मोठी घेरदार पैरण घातलेली होती. त्या बाईनें त्याला बाजूला घेतलें व म्हटलें, 'तुम्ही हतं ऱ्हाऊं नका; दगा व्हईल; बेगी बेगी भाइर पडा.' तो म्हणाला -'यवढी पालकी म्हाळसाईच्या मंडपांत जाऊं द्ये कीं मी उडालूं म्हनून समज.' बाईचा इलाज चालेना. 'खंडुबाचा भंडारा मी बी हरबासारकाच ल्येला हाई. हा हा म्हन्ता रान तोडून निगून जाईन!' लोक प्राकारांत शिरले. रगेल, आडदांड, पहिलवान, लालबुंद डोळ्यांचे, मोठमोठ्या मिशा राखलेले हजारों मांग पालखीला शिवून भक्तिभावानें नमस्कार करूं लागले. म्हातारा व त्याची बाई यांनींहि नमस्कार केला. म्हाताऱ्यानें भंडारा उधळला 'येळकोट, येळकोट' म्हणून गर्जना केली. पालखी बाहेर पडून हळूहळू म्हाळसाईच्या मांडवाकडे चालली. काठ्या उंच धरून चाललेल्या कांहीं बलदंड मांगांच्या आश्रयानेंच म्हातारा व बाई चाललीं होतीं. आसमंतात् कौतुकानें पण बारकाईनें न्याहाळीत कांहीं कांहीं लोक चालले होते. पालखी मंडपांत पोहोंचली. खंडोबाचें लगीन लागलें. यात्रा जलदीनें फुटूं लागली. मांगांचा जम विसकटला. आतां कोणी कोणाचा नव्हे. ज्यानें त्यानें स्वतःला सांभाळावें. शिपायांची टेहळणी उघड सुरू झाली. म्हातारा पागोटें बाजूला सारून आजूबाजूला पाहूं लागला. संध्याकाळ होऊन गेली होती; इतक्यांत पांचपंचवीस जवानांनीं त्याच्या अंगाभोंवतीं सरकफांस अचानक फेंकले आणि त्याला डांबून टाकलें.

चंद्री शूर खरी, पण गडबडली; 'म्हाताऱ्यानं काय केलंया? म्हाताऱ्यानं काय केलंया?' असें म्हणत ती त्याच्या शेजारीं उभी राहिली. शिपायांनीं त्याचें कानशिलावरचें पागोटें हिसकलें; त्याबरोबर त्याच्या गालांवरचीं पांढरीं झुलपें व ओंठावरच्या भरदार तांबूस पांढऱ्या मिशा एकदम निसटल्या! कोणी त्याची पैरण वर केली; आंत पाहतात तों अनेक धोतरें पोटाला लपेटलेलीं होतीं तीं त्यांनीं भराभर हुसकून काढलीं; त्याच्या कांखेला हिकमतीनें लोंबत असलेली फरशी एकानें सोडवून घेऊन हस्तगत केली. आतां 'म्हातारा' कुठला?. रानावनांत तरसासारखा भिरभिरणारा

पिऱ्या त्यांच्यापुढें जखडबंद होऊन उभा होता. चंद्री हताश होऊन त्या शिपायांच्याकडे पाहात उभी होती. त्यांत तो अंगासरसा जाडजूड अन् केंस राखलेला शिपाई तिनें ओळखला. तिच्या डोळ्याला कृतज्ञतेचें पाणी आलें. पिऱ्यानेंहि त्याच्याकडे क्षणभर टक लावून पाहिलें. त्यानें मोहरा फिरवला. पिऱ्या इतका जखडलेला तरी दंडेली करूं लागला. दरम्यान टोपी घातलेला, विजार घातलेला, गोरापान साहेब त्वरेनें पुढें आला, 'बहोत ठीक हुवा !' म्हणून त्यानें आपल्या लोकांना शाबासकी दिली.

'बडा बदमाश है !' हें त्या गोऱ्याचे शब्द ऐकतांच पिऱ्या आपली शूराची गर्दन फुगवून गरजला, 'कोन बदमाश हय ?' शिपायांनीं त्याला ताबडतोब रट्टे मारले व धक्के देत त्यांनीं त्याला हांकीत नेलें. चंद्री दुःखानें व निराशेनें भ्रान्त झाल्यासारखी इकडे तिकडे करूं लागली. तिच्या पिराजीला सरकारनें पकडलें आहे. शिपाई त्याला हांकून नेत आहेत. खंडोबाची जत्रा फुटली आहे. चंद्री व पिऱ्या यांची जोडी फुटली आहे खंडोबा व म्हाळसाई यांचें लग्न लागलें आहे. पिऱ्या चंद्री यांची ताटातूट झाली आहे.

कोर्टाचा निकाल लागून पिऱ्याला जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा झालेली आहे. खून केल्याचा आरोप त्याच्यावर सिद्ध झाला आहे. शिपायांच्या कडक पहाऱ्यांत त्याला कोर्टातून बाहेर आणलें आहे. पिऱ्या थकल्यासारखा झाला आहे. हातांत बेड्या व पायांत जड जड शृंखला असें त्याचें ध्यान पाहून सामान्य लोकसुद्धां घाबरे झाले आहेत. चंद्री तर दुःखानें व संतापानें बेहोष होऊन 'ठो ठो' करून जोरानें बोंबलली आणि म्हणाली, 'अव सरकार, अव त्येस्नी फशिवलं, त्येनीं काय केलंया, तुमच्या पायां पडत्यें; तुमापुडं पदर पसरत्यें; ह्ये बगा; त्येस्नी येरवड्याला तरी ठिवा.' शिपाई तिला धुडकावूं लागले. पिऱ्या गंभीरपणानें तिच्याकडे वळला. ती सडकेच्या कांठीं गटारांतून चालली होती. तो म्हणाला, "कारबारनी, ए चंद्राबाई, खंडुबा तुला सुकी ठेवील. म्या काय केलंया ? तालेवारांनीं सांगितलं, म्हूनशान क्येलं; पन् त्येंचा जरीचा मंदील त्येंच्या टकुरीला ऱ्हाइला. त्येंची कंटी त्येंच्या गळ्यांत ऱ्हाइली अन् माझ्या हाता-पायांत ह्ये बेड्या आल्या बग; चंद्रे, रडूं नग; तोंडांत माती घालूं नग; तुज्या पोटीं मी येतुंया. जो पोरगा हुईल त्येचं नांव खंडुबा ठीव; कपाळा-

वर हानून घेऊं नग. त्येला लिवनं शिकव. त्यो मोटा जाल्यावर इचरील कीं माझा बा कुटं हाई; तर त्येला सांग कीं सातासमिंदराच्या पलिकडं काळ्या पान्यावर हाई ! जगलं वाचलं तर अजूनबी परत येईल. ”

शिपाई झपाट्यानें हलूं लागले. जग आपल्या कामाला लागलें ! पिऱ्याची आठवण जग अजून विसरलें नाहीं.

---

## कठिण शब्दांचे अर्थ

प्रसाद = स्वच्छता. मातुर = मात्र. कार = कहर. खिनभर = क्षणभर. साकार = गोंडस. चिंचोळी = निमुळती. मनोमिलाफ = मन मिळणें. तालेवार = श्रीमंत. हुलीवर घालणें = चढवून गुन्ह्यास प्रवृत्त करणें. आन = शपथ. बरबाट = खीर. कसनुसं = कसेंसेंच. उलीसं = थोडेसें. हातगुन = हातगुण. धादा = दहादां. जरब = धाक. फरशी = परशु, कुऱ्हाडीसारखें एक हत्यार. पाट = पुनर्विवाह. केकताड = घायपात, एक वनस्पति. घायपाताचीं पानें भिजवून ठेंचून त्यापासून वाख तयार करतात. हाडकीहाडुळी = मेलेल्या जनावरांबाबतचे महारामांगांचे हक्क. पीठिका = परंपरा. टिकारणें = लांकडाच्या जाडजूड आंखूड काठ्या. भराडी, घंटीचोर = रानटी जाती. वघळ = डोंगरांत पाण्यानें पडलेली पन्हळ. राखिस = राक्षस. इंद्रजित = रावणाचा शूर पुत्र. बलदण्ड = शूर.

## अभ्यास

(१) दहा-बारा ओळींत पिऱ्याचें शब्दचित्र रंगवा.

(२) पिऱ्याची व त्याच्या मागावर असलेल्या पोलिसाची पठारावर भेट झाली त्या वेळची त्या दोघांची मुलाखत संवादरूपानें लिहा.

(३) पिऱ्याची व आपली अकस्मात् गांठ कशी पडली, पिऱ्याला पाहून आपण कसें घाबरलों, तथापि पिऱ्याच्या उदार स्वभावामुळें आपणांला त्यानें कसें सोडलें या सर्व गोष्टींची माहिती हा पोलिस पत्ररूपानें आपल्या एका सहकाऱ्याला कशी लिहील तें लिहा.

(४) या गोष्टींत खंडोबाच्या जत्रेचें वर्णन आलें आहे. तुम्ही पाहिलेल्या अशा एखाद्या जत्रेचें वर्णन करा.

(५) पिऱ्या हा दरोडेखोर असूनसुद्धां त्याच्याविषयीं आपणांला सहानुभूति कां वाटते ?

(६) आधुनिक लघुकथांच्या रचनेच्या दृष्टीनें या कथेची रचना तुम्हांला सैल किंवा विस्कळित वाटते काय ? कथेचा पहिला परिच्छेद वगळला तर कथेच्या सौंदर्यांत कांहीं उणीव पडेल काय ?

• • •

# आम्ही कलावंत आहोंत ! : : १

[ ‘ आपापलें हितगुज ’ या पुस्तकांत प्रा० माटे यांनीं निरनिराळ्या विख्यात पुरुषांच्या आत्मचरित्रांतील मनोरंजक व उद्बोधक उतारे संकलित केले आहेत. यांपैकीं कांहीं थोर पुरुष आपल्या देशांत तर कांहीं पाश्चात्य देशांत होऊन गेलेले आहेत.

कुणी तरी त्रयस्थ माणसानें लिहिलेल्या चरित्रापेक्षां त्या त्या व्यक्तीनें स्वतःच लिहिलेलें आपलें चरित्र हें केव्हांहि अधिक विश्वसनीय असतें. शिवाय इतरांना सहसा न दिसलेले चरित्रनायकाच्या स्वभावाचे अनेक कंगोरे त्याच्या आत्मचरित्रांत आपणाला पहावयास सांपडतात. या दृष्टीनें चरित्रांपेक्षां आत्मचरित्रें हीं अधिक मनोरंजक असून तीं आपणाला मनोरंजनाबरोबरच ज्ञानहि देतात यांत संशय नाहीं.

आपल्याकडच्यापेक्षां पाश्चात्यांत आत्मचरित्रें लिहावयाची प्रथा अधिक आहे. पाश्चात्यांमधील अनेक राजकारणी पुरुषांनीं, तत्त्वज्ञानी संशोधकांनीं, साहित्यिकांनीं व इतर कलावंतांनीं आपापलीं चरित्रें स्वतःच लिहून ठेविलीं आहेत. यांपैकीं जगद्विख्यात रशियन लेखक काउंट लिओ टॉलस्टॉय याच्या आत्मचरित्रांतून खालील उतारा घेतलेला आहे.

टॉलस्टॉय हा लेखक इ० स० १८२८ सालीं जन्मला. युद्धांत होणारी प्रचंड हिंसा पाहून अहिंसेच्या तत्त्वावर त्याची दृढ श्रद्धा बसली, आणि या तत्त्वानेंच पुढें त्याचें सर्व जीवन आणि साहित्य रंगून गेलें. आपणाकडे महात्मा गांधींच्या विचारांवर येशू ख्रिस्त, बुद्ध आणि टॉलस्टॉय या अहिंसावाद्यांच्या तत्त्वज्ञानाची दाट छाया पडली आहे. टॉलस्टॉय हा महान् प्रतिभाशाली लेखक होता. सर्व जन्मभर तो लिहीत होता. कादंबऱ्या, कथा, तत्त्वज्ञानपर ग्रंथ, कविता इत्यादि विविध प्रकारचें साहित्य त्यानें निर्माण केलें. रशियांतच नव्हे तर, सर्व जगभर आज जें समाजसत्तावादाचें तत्त्वज्ञान

पसरलें आहे. तें तत्त्वज्ञान बनविण्यांत टॉलस्टॉयच्या लेखनाचा बराच वांटा आहे.

तरुण वयांत टॉलस्टॉय हा समकालीन तरुण लेखकांच्या घोळक्यांत सांपडला होता. कांहीं दिवस या लेखकांचें त्याला मोठें कौतुक वाटलें. त्यांचें जीवितविषयक व साहित्यविषयक तत्त्वज्ञानहि त्याला निर्दोष आणि आकर्षक वाटलें. पण पुढें त्या लेखकांच्या वर्तनांतील विसंगति आणि आचरणांतील अनेक दोष पाहून लौकरच टॉलस्टॉयला त्यांचा वीट आला. या सर्व घटनांचें अतिशय मनोरंजक असें वर्णन खालील उताऱ्यांत त्यानें स्वतःच केलें आहे. ]

मी सव्वीस वर्षांचा झालों तेव्हां मी राजधानीच्या शहरीं आलों आणि तेथें माझी अनेक लेखकांशीं गांठ पडली. मीहि आधीं बरेंच लिहूं लागलों होतों. या कामीं मला मोठा डौल वाटे. माझ्या लिहिण्यांत व वाणींत लोभ आणि गर्व हींहि दिसून येत. शहरांत आल्यावर ते लेखक मला म्हणाले, ‘ बरें झालें तुम्ही आमच्यांत आलांत. तुम्ही लिहितांहि फार चांगलें. ’ वास्तविक खरी गोष्ट काय होती हें कळून यावयाच्या आधींच ज्या लेखकांच्या मेळाव्यांत मी येऊन पडलों होतों-त्यांची वागणुकीची तऱ्हा मीहि उचलली; आणि होतां होतां आत्मविकसनाची माझी प्रथमपासूनची इच्छा समूळ नष्ट झाली! या लोकांच्या तोंडून मीं जें ऐकलें त्यावरून मला एवढाच बोध झाला कीं, आपला वर्तनक्रम कितीहि छिनाल असला तरी त्यालाहि कांहीं युक्त कारणें असतात ! ग्रंथकर्तृत्वांतील माझ्या या मित्रांचें तत्त्व असें होतें कीं, जीविताचा एकंदरीनें विकासच होत जातो आणि या विकसनांत आपण जे विचारास चालना देणारे लोक, ते मोठाच वांटा उचलतों; आणि त्या लोकांतहि खास आपण म्हणजे कवि आणि कलावन्त त्यांचा महिमा तर विचारतांच कामा नये. आमचा जीवितहेतु म्हणजे मनुष्यप्राण्याला ज्ञान देणें हा होय. पण कदाचित् कोणी असा साधासुधा प्रश्न करील कीं, तुम्हांला स्वतःला काय कळतें ? आणि तुम्ही काय शिकविणार ! तर या लोकांच्या तत्त्वज्ञानांत यावरहि एक तोड तयार ठेवलेली असते. ती ही कीं, कलावंत आणि कवि यांना आपल्या ज्ञानाची जाणीव असावी लागते असें नाहीं.

त्यांचें ज्ञान स्वतःचें स्वतःच भासलें पाहिजे असें नाहीं ! मोठा झकास कलावन्त आणि कवि म्हणून माझी चहा होऊं लागली होती. अर्थात् आतांच सांगितलेली ही तोंड मी एकदमच पत्करली.

मी कलावंत आहें, मी कवि आहें, मी लिहितों, मी ज्ञान देतों, मी काय सांगतों हें माझें मलाच माहीत नाहीं ! अशी माझी वास्तविक स्थिति होती; पण यासाठींच मला पैसा मिळूं लागला. सुग्रास अन्न खावें, माड्या-खिडक्यांत राहावें, सुंदर स्त्रियांचा सहवास प्राप्त व्हावा आणि समाजांत मानमान्यता मिळावी असा प्रकार चालू झाला. माझी कीर्तिहि पसरत चालली. अर्थात् मला वाटलें कीं, आपण जें लिहितों तें खरोखरच चांगलें असलें पाहिजे. कविता म्हणून म्हणतात तिचा अर्थ हाच आहे आणि आत्मविकास म्हणतात त्याचाहि अर्थ हाच आहे; ही माझी भावना मला धर्माच्या ठिकाणीं दिसूं लागली, आणि अशा धर्माचा मी एक मोठा आचार्य आहे असें मला वाटूं लागलें. हा आचार्यपणाचा धंदा मोठा सुख-प्रद आणि फायद्याचा असे. अर्थात् यांत कांहीं गैर आहे कीं काय अशी शंका न येतांच माझे कित्येक दिवस या भावनेंत गेले. पण दोन तीन वर्षें जातांच या आमच्या धर्मांतहि कांहीं प्रमाद आहे कीं काय, अशी शंका मला येऊं लागली आणि मी त्याची तपासणी करूं लागलों. मला ही शंका येण्याचें पहिलें कारण झालें तें हें कीं, या धर्माचे आमचे ते जे मोठमोठाले उपाध्याय म्हणजे कलावंत व कवि त्यांचें एकमेकांशीं बिलकुल जमत नसे. कोणी म्हणत आम्ही सर्वांहून चांगले प्रतिपादक आहोंत; आमचेंच बोलणें ज्ञास्त उपयोगाचें आहे; ज्याची आज जरूर आहे तेंच आम्ही शिकवितों; पण हे जे आमचे दुसरे प्रतिस्पर्धी आहेत ते काय वाटेल तें सांगत बसतात. उलट दुसरे कोणी म्हणत कीं, ‘ भलतेंच एकादें ! आम्हीच खरे सच्चे प्रतिपादक आहोंत. तुम्ही मात्र केवळ भकत सुटतां. ’ अशा प्रकारें ते एकमेकांशीं तंडत असत, भांडत असत. तें एकमेकांना शिवीगाळ करीत असत. ते एकमेकांना फसवीत असत, आणि दगा देत असत. आमच्यांत असेहि कित्येकजण असत कीं, ते खरा कोण आणि खोटा कोण याची मुळींच क्षिति बाळगीत नसत; पण आमच्या या वादावादींतून आपला फायदा कसा करून घेतां येईल एवढ्यावर मात्र त्यांची दृष्टि असे. या सर्व कारणामुळें

माझ्या मनांत हा विचार भरत चालला कीं, आपला हा कलावन्तांचा आणि कवींचा पंथ असावा तितका पायाशुद्ध नाहीं.

याबरोबरच या पंथाच्या उपाध्यायांचें—लेखकांचें—चारित्र्य मी बारकाईनें पाहूं लागलों. तेव्हां मला कळून चुकलें कीं, या पंथाचे बहुतेक सगळे उपाध्याय नीतिभ्रष्ट आहेत आणि यांना कसलीहि दानत नाहीं; मी लष्करांत असतांना आम्ही जीं व्यसनासक्त माणसें तेथें असूं त्यांपेक्षांहि हे लोक अधिक नादान आहेत. पण यांच्या अंगीं आत्मविश्वास मोठा होता आणि ते मोठे आत्मसंतुष्टहि असत. जे खरोखरच पवित्र आहेत त्यांच्या अंगीं तरी हे गुण असतात; किंवा पावित्र्य म्हणजे काय हें ज्यांच्या गांवींहि नसतें त्यांच्या अंगीं तरी हे असतात. शेवटीं यांच्यावरून माझें मन अगदीं उडालें. माझी मलाच लाज वाटूं लागली. कारण हा पंथ म्हणजे शुद्ध लुच्चेगिरी आहे हें माझ्या पुरेपूर ध्यानांत आलें. पण असें झालें तरी, या लोकांच्यांत वागल्या-मुळें मला जी पदवी प्राप्त झाली होती ती माझ्याच्यानें सोडवेना. मी मोठा कलावान् झालों होतों. मी कवि झालों होतों. लोकांना शहाणे करणारा मी आहें असें ठरलें होतें. मला उगाचच वाटे कीं, आपण कवि आहोंत, कला-वंत आहोंत, आणि आपण काय शिकवीत आहों हें आपल्याला जरी कळलें नाहीं तरी, लोकांच्यापुढें पांडित्य करण्याचा आपला हक्कच आहे. आम्हां सर्वांची अशी खात्री होऊन चुकली होती कीं, आपल्याला बोलत राहिलें पाहिजे, लिहीत राहिलें पाहिजे, आणि जितकें म्हणून छापतां येण्या-सारखें आहे तितकें जलदीनें छापलें पाहिजे. आणि जर लोकांचें हित व्हावयास हवें असेल तर, हें सर्व अवश्यच आहे. आम्ही शेकडों लोक लिहीत होतों आणि छापीत होतों; आम्ही एकमेकांना विरोध करीत होतों आणि शिव्याशापहि देत होतों. तथापि आम्ही सगळे लोकशिक्षणाचें काम करीत होतों हें मात्र खरें !

आपल्याला कांहीं कळत नाहीं हें आमच्या ध्यानांतच येत नव्हतें. बरें कशास म्हणावें व वाईट कशास म्हणावें हे जे जीवितांतले अगदीं साधे प्रश्न आहेत त्यांचीं उत्तरेंसुद्धां आम्हांस देतां येत नव्हतीं. तरी आमचा बोलण्याचा धडाका चाललाच होता. आम्ही एकमेकांचें ऐकावयासहि तयार नव्हतों. आज याचा पक्ष घ्यावा, उद्यां त्याला शाबासकी द्यावी

म्हणजे तोहि केव्हां तरी आपला पक्ष घेतो व आपल्याला शाबासकी देतो, असें चाललें होतें. शेवटीं सर्वजण एकमेकांशीं भांडत बसत असूं. असा हा वेडेखाना तयार झालेला होता. आमच्या छापखान्यांत हजारों कामगार लोक रात्रंदिवस अगदीं टेकीस येईपर्यंत काम करीत असत खिळे जुळविणें आणि पानेंच्या पानें छापून काढणें हीं त्यांचीं कामें असत. आमचें हें पांडित्य सर्व रशियाभर पसरत असे. इकडे आमचा लिहिण्याचा धडाका चालूच होता. आपल्या हातून पुरेसें लोकशिक्षण होत नाहीं याचें आम्हांला वाईट वाटे आणि आपण इतकें करीत असतां लोक आपल्याकडे पुरेसें लक्ष देत नाहींत हें पाहून आम्हांला फार राग येई. खरोखर, आम्ही कांहीं भलतेंच करीत होतों. आतां मात्र आम्हांला त्याचा अर्थ चांगला उमगतो. जितका पैसा काढतां येईल आणि लोकांकडून जितकी वाहवा मिळवितां येईल तितकी मिळवावी हाच काय तो आमचा अगदीं आंतील आणि खराखुरा हेतु होता. अर्थात् हें साध्य व्हावें म्हणून पुस्तकें लिहिणें आणि वर्तमानपत्रें खरडणें एवढेंच काय तें आम्हांस करतां येण्यासारखें होतें. म्हणून आम्ही हें करीत होतों. पण असलें हें भिकार काम आमच्या हातून व्हावें म्हणून, आणि आपण म्हणजे कोणी तरी गोमागणेश आहोंत असें आपल्यालाच वाटावें म्हणून आम्हांला कांहीं तरी तत्त्वज्ञानाचा पुरवठा हवा होता. अपेक्षेप्रमाणें हें तत्त्वज्ञानहि आम्हांला लाभलें. “ जें जें कांहीं विद्यमान असतें तें तें सर्व युक्तच असतें; जें कांहीं अस्तित्वांत आहे तें विकसित होत असतें; हें विकसन संस्कृतीनें घडत असतें; संस्कृति किती झाली आहे याचें माप लोकांत वर्तमानपत्रें आणि पुस्तकें किती खपतात यानें लागतें; आम्ही पुस्तकें आणि वर्तमानपत्रें लिहितों म्हणून लोक आम्हांला पैसे देतात आणि आमचा मान करतात; अर्थातच आम्ही सर्वांत चांगलीं माणसें आहोंत आणि आमचाच सर्वांत जास्त उपयोग आहे. ” असें हें तत्त्वज्ञान होतें ! या बाबतींत आम्हां सर्वांचें जर एकमत असतें तर हें सगळें भाकड बरोबर ठरलें असतें. पण आमच्यापैकीं एकानें कोणताहि एक विचार सांगितला कीं, लागलीच बरोबर उरफाटा विचार दुसरा कोणी तरी सांगत असे. यावरून तरी आत्मशोधनाचा विचार आम्हांस सुचावयास हवा होता. पण आम्ही याकडे केवळ दुर्लक्ष करीत होतों व

लोक आम्हांला पैसे देत आणि ज्याच्या त्याच्या पक्षांतील लोक त्याची त्याची वाहवा करीत ! अर्थात् प्रत्येकाला वाटत असे कीं, आपण म्हणत आहोंत तें बरोबरच आहे. सुमारें सहा वर्षें असला उद्योग मीं करीत होतों.

---

## कठिण शब्दांचे अर्थ

मेळावा = समुदाय. आत्मविकसन = स्वतःचा विकास, प्रगति. छिनाल = अनैतिक. जीवितहेतु = जीविताचें मुख्य ध्येय. आचार्य = गुरु. प्रमाद = चूक. वादावादी = वादविवाद. पायाशुद्ध = शुद्ध, निर्दोष भूमिकेवर आधारलेला. दानत = सचोटी. गोमागणेश = विशेष महत्त्वाचें असें कुणी तरी. विद्यमान = अस्तित्वांत असलेले. भाकड = असत्य. आत्मशोधन = स्वतःच स्वतःची परीक्षा घेणें.

## अभ्यास

( १ ) आत्मविकासाची टॉलस्टॉयची कल्पना काय होती ? त्याच्या समकालीन लेखकांची कल्पना काय होती ? दोन्ही कल्पनांतला विरोध कुठें होता ?

( २ ) राजधानींतील लेखकांच्या संगतींत आल्यावर टॉलस्टॉयच्या मनाची निराशा कां झाली ? आपल्या एका मित्राला उद्देशून टॉलस्टॉय एक पत्र लिहीत आहे अशी कल्पना करा व त्या पत्रांत टॉलस्टॉयच्या या निराशेचें चित्र रंगवा.

( ३ ) ‘ कलावन्त आणि कवि यांना आपल्या ज्ञानाची जाणीव असावी लागत नाहीं. ’ हें टॉलस्टॉयच्या समकालीन लेखकांचें मत तुम्हांला पटतें काय ?

(४) 'आपला हा कवींचा आणि कलावन्तांचा पंथ पायाशुद्ध नाहीं' असें टॉलस्टॉयला कां वाटूं लागलें ?

(५) लेखकाचें लेखन आणि त्याचें जीवन यांचें परस्पर संबंध कोणते असावेत ? लेखकाचें चारित्र्य हिणकस असेल तर त्याच्या लेखनावर त्या गोष्टीचा परिणाम होईल कीं, नाहीं ?

(६) पैसा व कीर्ति मिळविण्यासाठीं लेखन करणारांची टॉलस्टॉयनें येथें कुचेष्टा केली आहे. तुम्हांला त्याचें हें मत पटतें काय ? लेखनाच्या अनेक हेतूंपैकीं 'पैसा' व 'कीर्ति' हेहि दोन हेतू असूं शकतात असें आपल्या संस्कृत साहित्यशास्त्रांत म्हटलें आहे. लेखनाचा मुख्य हेतु काय असावा ? पैसा व कीर्ति यांची अपेक्षा लेखकानें करणें कितपत बरोबर वा चूक ठरेल ?

• • •

अनुक्रम
विभाग
क्र.
नं.

# चंद्रभागेच्या वाळवंटांत

[ ‘ माणुसकीचा गहिंवर ’ या पुस्तकांतील ‘ मंगळवेढ्याचें कुसूं ’ या लेखांतून हा उतारा घेतला आहे.

मराठी संतमंडळांतील एक अस्पृश्य संत चोखा मेळा याच्या चरित्रा-वर जरी हा लेख आधारलेला असला तरी त्याच्या संदर्भानें, महाराष्ट्रांत झालेल्या एका प्रचंड धर्मक्रान्तीचें स्वरूप वर्णन करावें हाच लेखकाचा प्रमुख हेतु आहे. प्रसिद्ध संतश्रेष्ठ नामदेव आणि ज्ञानदेव यांनीं या महाराष्ट्रांत एक अतिशय लोकविलक्षण अशी धर्मक्रांति घडवून आणली आणि सुप्रसिद्ध अशा भागवत धर्मसंप्रदायाचा पाया घातला. ज्ञानेश्वर व नामदेव यांच्या काळची एकंदर परिस्थितिच अशी होती कीं ही क्रांति करणें त्यांना अत्यंत जरूरीचें भासलें.

ज्ञानेश्वरांपूर्वीं ‘ धर्म ’ ही केवळ मूठभर उच्चवर्णीयांची मिरास होऊन बसली होती. सर्व ज्ञान त्यांच्यासाठीं, परमेश्वराचें चिंतन व नामस्मरण त्यांनींच करावयाचें आणि मोक्षहि अखेर त्यांनाच मिळावयाचा असें केवळ ठरून गेलें होतें. शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रिया यांचा मिळून जो असंख्य वर्ग महाराष्ट्रभर पसरला होता त्यांना मात्र परमेश्वराचें नांव घ्यावयाचा अधिकार नसे. आणि यामुळें त्यांना कोणतेंहि मानसिक समाधान मिळ-विण्याचा मार्ग खुला नव्हता. ही परिस्थिति पाहून ज्ञानेश्वराचें प्रेमळ अंतः-करण कळवळलें आणि त्यानें अशी घोषणा केली कीं, ब्राह्मणांपासून तों शूद्रांपर्यंत परमेश्वराचें नामस्मरण करावयाचा अधिकार सर्वांना आहे. सर्व-जण परमेश्वराचींच लेकरें असल्यामुळें कुणींहि कुणाला उच्च-नीच माना-वयाचें कारण नाहीं. यज्ञयाग, जपतप, अनुष्ठान कांहींहि न करतां निव्वळ भक्तियुक्त अन्तःकरणानें परमेश्वराचें नांव घेतलें कीं कुणीहि तरून जातो !

या घोषणेनें भागवत धर्मसंप्रदायाची मुहूर्तमेढ महाराष्ट्रांत रोविली गेली. या संप्रदायाच्या अटी अत्यंत सोप्या होत्या. विठ्ठलाचें नामस्मरण करावें, गळ्यांत तुळशीची माळ घालावी. एकादशी, शिवरात्र हीं व्रतें करावीं, असत्य बोलूं नये, पाप आचरूं नये, सर्वांना समान लेखावें आणि अशा रीतीनें प्रपंच करून परमार्थ साधावा ही भागवत धर्मसंप्रदायाची साधी शिकवण होती. ही शिकवण लोकांना फार आवडली आणि भागवत धर्मसंप्रदायाच्या भगव्या पताकेखालीं हां हां म्हणतां हजारों भक्त जमा झाले. नामदेव व ज्ञानेश्वर हे उभयतां या संप्रदायाचे प्रवर्तक समजले जातात. नामदेवानें आपल्या रसाळ अभंगांतून नामाचा महिमा वर्णन केला तर, ज्ञानेश्वरानें श्रीकृष्णाच्या भगवद्गीतेचा अर्थ मराठीमध्यें सांगून संस्कृतच्या पेटींत कोंडलेलें ज्ञान बहुजनसमाजाला खुलें करून दिलें. पुढें एकनाथ, तुकाराम, रामदास यांच्यासारखे थोर संत व कविश्रेष्ठ या संप्रदायांत होऊन गेले व भागवत धर्माची प्रतिष्ठा त्यांनीं अतोनात वाढविली. विठ्ठल हें या संप्रदायाचें मुख्य दैवत आणि ' सर्वांभूतीं समत्व ' ही या संप्रदायाची मुख्य निशाणी होती. ब्राह्मणांपासून तों अतिशूद्रापर्यंत सर्वजण भेदभाव विसरून या संप्रदायांत एकत्र झाले आणि विठ्ठलाच्या गजरानें चंद्रभागेचें वाळवंट त्यांनीं दुमदुमून सोडलें.

चोखा मेळा हा ज्ञानेश्वराच्या समकालीन असलेला एक अस्पृश्य संत होता. ज्ञानेश्वर-नामदेवांच्या समतेचें विवेचन ऐकून चोख्याच्या मनाला शांति प्राप्त झाली आणि मराठी संतमंडळांत तो प्रविष्ट झाला. हा सारा रोमांचकारी कथाभाग पुढील उताऱ्यांत लेखकानें वर्णन केला आहे. ज्ञानेश्वराच्या भाषणांत आणि नामदेवाच्या अभंगांत भागवत संप्रदायाचें समतेचें रहस्य उत्तम रीतीनें विशद झालें आहे. या उताऱ्यांत महाराष्ट्रांतील एका अत्यंत प्रभावी अशा संप्रदायाचें दर्शन आपणास होतें. ]

पंढरपुरांत चंद्रभागेच्या तीरावर एक अद्भुत क्रांति घडून येत होती. कांहीं लोकविलक्षण धर्मकार्य मोहरत होतें, नव्हे आकाशांत झळकत होतें. नामदेव आणि ज्ञानदेव या दोन देवांनीं धर्मग्लानीचें तिमिर नष्ट करण्याचें

कंकण बांधलें होतें. त्यांच्या वाणीनें असंख्य माळकऱ्यांना वेड लावलें होतें. विठ्ठलसंप्रदाय फरारत चालला होता हें खरें; पण त्यांतील पोक्त अधिकारी माणसें मागें पडत चाललीं होतीं; आणि नामदेव, ज्ञानदेव यांच्यासारखीं तरणीं पोरें ‘मी सर्वांसाठींच आहें’ हा श्रीकृष्णाचा संदेश उंच आवाजानें, चंद्रभागेनें केलेल्या साथीबरोबर, सहस्रावधि लोकांना सांगत होतीं. मोक्षाची वासना सर्वांनाच असे, पण तो मिळवावयास ज्ञान, कर्म, इत्यादींची आवश्यकता असे व या गोष्टी सामान्य लोकांना कळण्यासारख्या नव्हत्या. शिवाय त्यांचा ‘अधिकार’ पूर्वपरंपरेप्रमाणें शूद्रांना आणि अतिशूद्रांना तर नव्हताच नव्हता. पण भगवंताच्या नामाचा घोष व जप भक्तियुक्त मनानें करीत राहिलें तर, मोक्ष मिळूं शकतो; हा नामघोष, हा नामजप करण्याचा अधिकार वाटेल त्याला आहे—म्हणजे अतिशूद्रालासुद्धां आहे—असा श्रीकृष्णाचा संदेश हीं तरुण मुलें सांगूं लागलीं होतीं. योग्याचें ज्ञान, कर्मवाद्याचें यज्ञयाग यांच्याहिपेक्षां मोक्षसाधनास नाम हें जास्त समर्थ आहे. तें भक्तियुक्त मनानें घ्यावें म्हणजे वाटेल त्याला मोक्ष मिळेल ही नवी घोषणा होती. ती ऐकावयास चंद्रभागेच्या तीरावर सहस्रावधि लोक जमा होत होते.

मंगळवेढ्यांतला चोखा केवळ तरुण मुलगा; हा नवा संदेश तो कानभर ऐकूं लागला. ही नवलाईच होती. पंढरपूर जवळच होतें. चंद्रभागेचें वांकण स्वच्छ पाण्याच्या पुरानें खळाळत होतें. कांठावरील वाळूच्या कणागणिक माणूस बसलें होतें. चारपांच नवीं पोरें गर्जत होतीं. त्यांच्या कोंवळ्या मिसरुडांतून नवे संदेश येत होते. गालफडें बसलेले लोक स्तिमितपणानें ऐकत होते. त्यांनीं काय नवल सांगितलें पाहा! ते म्हणाले, “अरे! देवाच्या दारांत कांहीं भेद नाहीं, तो सर्वांचा आहे; तो कुणालाच दूर करीत नाहीं. ब्राह्मण म्हणून जवळ करीत नाहीं; धेड म्हणून दूर लोटीत नाहीं. आपल्याकडे पाहात हा मंदिरांत उभा आहे. हा कोणाच्या एकाच्यां घरचा नाहीं. याचें नांव तुम्ही सारेजण खुशाल गा; त्यानंच पवित्र व्हाल; त्यानंच तरून जाल.” तो तरुण पोरगा मान उंच करून, टक लावून, कान टवकारून ऐकत होता. “तुम्ही ब्राह्मण असा, नाहीं तर धेड असा; त्याच्यापाशीं भेद नाहीं. लहान-थोर, स्त्री-पुरुष, श्रीमंत-गरीब त्याला सारे

सारखेच आहेत; त्याच्यापाशीं कुणाला जास्त अधिकार नाहीं; कुणाला कमी नाहीं; त्याच्या कृपेचा पाऊस सर्वांच्या भूमीवर सारखाच पडतो; त्याच्या श्वसनानें सर्वांचींच घरें सुगंधित होऊन जातात; त्याच्या सुहास्यानें सर्वांच्याच चित्तावर अमृताचे तुषार पसरूं लागतात. " चोखा आनंदाचे घुटके गिळूं लागला. तो मिसरूड फुटूं लागलेला, अंगानें कृश पण प्रफुल्लित मुखाचा पोरगा जोरजोरानें बोलूं लागला, " अरे ! देव काय कोणाच्या पिंजऱ्यांत राहातो ! अरे ज्यानें अनंत विश्वमंडळें रचलीं तो कुणाच्या संपुटांत राहील काय ? ज्यानें चौऱ्याऐंशी लक्ष योनी निर्मिल्या त्याला कोणाचाहि स्पर्श विटाळाचा ठरेल काय ? ह्याच्या अंगुष्ठापासून प्रत्यक्ष गंगाच निघालेली, तर कोणाच्या स्पर्शानें तो विटाळेल काय ? त्याच्या किरणाचें स्नान सर्वांनाच होतें; त्याच्या पुष्पांचा वास सर्वांनाच येतो; त्याचे चंदन कोणाच्याहि अंगणांत वाढतात; त्याचीं आम्रफळें कोणाच्याहि ताटांत आपलीं गोड मनोगतें ओततात; त्याची सनई जी साळुंकी ती कोणाच्याहि अंगणांतील झाडावर बसून ललकारी मारते; त्यानें वनविलेला रत्नखचित मोर कोणाच्याहि परड्यांत आपले सहस्र नेत्र उघडून पाहात राहातो; अरे ! हें तर झालें; पण पवित्र अशा स्वर्गलोकच्या ताऱ्यांकडे कोणालाहि टक लावून पाहातां येतें; त्याच्या विशाल मंडपांतील तो झगमगीत दिवा सर्वांपुढें सारखाच झळकतो; त्याच्या अंगणांतील तो बिलोरी चंद्रमा रात्रीच्या वेळीं सर्वांच्या घरांवर सारखीच शीतल प्रभा पसरवितो "—चोखा आणि त्याचे सोबती हर्षोत्फुल्ल होऊन ऐकत होते. ' पुंडलिक वरदा हरी विठ्ठल 'चा जयघोष सारखा चालूंच होता. तो वक्ता म्हणाला, " अरे विठ्ठलाच्या भक्तांनो ! आतां तुम्हांला किती सांगावें ? किती बोलावें ? अरे त्याच्या मेघांची गर्जना शत योजनें ऐकूं जाते; माझे बोल किती ऐकूं येणार ? " चोखा जोरानें ओरडला, " बोला, बोला, महाराज बोला ! कान पावन होत्यात; हुर्द भरून येतंया; बोला महाराज ! पिरतिमी पालती व्हतीया ! बोला तुमी; तुमच्या मुकांत साकर पडूं द्या; आंग फुरफुरतया; पैरण गच्च झालीया; तुमी बोला ! " पारमार्थिकांचा मुकुटमणि बनलेला तो वीस वर्षांचा कृशांग पण प्रफुल्लित मुखश्रीचा कुमार पुन्हां म्हणाला, " अरे, परमेश्वर माझ्याकडे कां पाहात नाहीं असें आपल्याला वाटतें; तो मोठ्या

कामांत गुंतला आहे हें खरें; पण गाय रानांत चरत असली तरी तिचें मन वांसरापाशीं असतें; पक्षीण गगनांत फिरत असली तरी तिचें मन पिलां-पाशीं असतें; तसेंच देवाचें आहे; तो दूर गेला असें मानूं नका. अमक्याच्या घरीं तो राहातो आणि तमक्याची प्रार्थना ऐकतो असें कांहीं नाहीं. अरे, त्यानें आपल्या मुखानें मुद्दाम सांगितलें आहे कीं, दुसरें कांहीं न करतां माझीच भक्ति माणसांनीं करावी; आईवर जसें मूल प्रीति करतें तशी तुम्ही मजवर करा; माझीच अखंड भक्ति करा; माझेंच पूजन करा; मलाच वंदन करा. अरे, हें त्यानें आपल्या मुखानें सांगितलें आहे, त्याच्यावर श्रद्धा ठेवा; त्याचें नांव घ्या; त्या नामाचा अधिकार सर्वांना आहे; मोक्ष मिळविण्याचा अधिकार सर्वांना आहे. तो ब्राह्मणाला, क्षत्रियाला, वैश्याला आहे आणि शूद्रातिशूद्राला नाहीं हें केवळ मिथ्या आहे. सर्व वस्तुजातांतहि आत्मतत्त्व भरलेलें आहे तर, तें शूद्रातिशूद्रांत नसेल असें कसें म्हणतां येईल ? त्यांना मन आहे, बुद्धि आहे, आत्म्याच्या हिताची चिंता त्यांनाहि आहे. आमच्या धर्मानें त्यांचीहि व्यवस्था केली आहे. श्रीकृष्णानें पुन्हां पुन्हां सांगितलें कीं, असा कोणीहि नाहीं कीं, ज्याला भक्ति करून माझ्या जवळ येतां येत नाहीं. अरे, जवळ जाणेंच कशाला ? तुम्हांला प्रत्यक्ष त्याच्या स्वरूपांतहि मिसळून जातां येईल अशी उदार आणि उदात्त घोषणा श्रीकृष्णानें केलेली आहे. आम्ही नवें कांहीं सांगत नाहीं. लुप्त झालेला, मागें पडलेला, श्रीकृष्णाचा संदेश आम्ही सांगत आहों. चित्तावर आलेली काजळी झाडून टाका; चित्ताची ज्योत प्रज्वलित करा. आणि आतां माझा नामा काय गातो तें ऐका. ”

ज्ञानेश्वराचें हें उत्तेजक भाषण झाल्याबरोबर नामदेवानें आपल्या कीर्तनाला सुरुवात केली; आणि भाषणानें थरारलेलीं मनें कीर्तनानें उत्फुल्ल होऊन गेलीं. नामदेवाचें भजन सुस्वर होतें. त्याच्या मुखांतून जिवंत अभंग, वाणीचा प्रवाह वाहात होता; अर्धवट डोळे मिटून नामदेव नृत्य करीत होता; तालाच्या ठेक्यानें अवघें तीर दुमदुमून जात होतें. शेजारीं कोण बसला आहे, ब्राह्मण आहे का महार आहे, हें कोणीहि विचारीत नव्हतें. त्यांना कोणीहि चालत होतें ! माझ्या पवित्र पाण्यानें जें साधलें नाहीं तें

त्या नामजलानें साधत आहे हें पाहून विस्मित झालेली चंद्रभागा संथपणानें चालली होती. नामा देहभान विसरला होता. कोणी कोणच्याहि जातींत जन्माला आलेला असू द्या, भक्तियुक्त मनानें केलेल्या नामस्मरणानें व नामगायनानें त्याला मुक्ति मिळतेच मिळते, हें तत्त्व तो रंगवून सांगत होता. परमेश्वर जातगोत ओळखत नाहीं हें त्याचें त्याला पटलेलें होतें व तें तो लोकांना पटवीत होता. तो म्हणाला,

"नामें तरूं अवघें जन, यमपुरीं धाडूं वाण।
करूं हरिनामकीर्तन, तोडूं देहाचें बंधन।
करूं हरिनामाचा घोष, कुंभपाक पाडूं ओस॥"

या ओळी नामा घोळून घोळून म्हणत आहे तों ज्ञानेश्वर म्हणाला,

"ऐसा नामा यशवत। विठोबाचा शरणागत।"

लोक टाळ्यांच्या ठेक्यावर त्या उभयतांनीं गायिलेले चरण मोठमोठ्यानें म्हणत होते. नामा म्हणाला,

"जें जें घडेल तें तें घडो। देह राहो अथवा पडो।
नाम न सोडी सर्वथा। दीनबंधु पंढरीनाथा।
जैसा जैसा असेल भोग। तैसा तैसा घडेल योग॥"

नाम्याचा हा निर्धार अवघ्या श्रोत्यांना पटलेला होता; नामा मधूनमधून प्रतिपादनहि करी. तो म्हणाला, "आपणां सर्वांना यमाची भीति वाटते; ते योगी, ते वेदपठण करणारे ब्राह्मण, ते यज्ञयाग करणारे ब्राह्मण, ब्राह्मणाकरवीं ब्रह्मज्ञान ऐकणारे ते क्षत्रिय, वैश्य या भीतींतून मुक्त होतील असें आपणांला वाटतें; ते मुक्त होत असतीलहि; पण माझ्या शूद्रांनो, अतिशूद्रांनो, तुम्ही विठ्ठलाचें नांव घ्या; भक्तियुक्त मनानें तें गा म्हणजे तुम्हीहि उद्धरून जाल. कसलीहि भीति धरूं नका; बोला, पुंडलिक वरदा हरी विठ्ठल!" नामा स्वतः मुक्त झाला होता आणि पतितांना मुक्त करूं पाहात होता. तो म्हणाला, "अरे भगवंत काय सांगतात हें तुम्हांला माझ्या गुरूचा गुरु हा ज्ञानेश्वर सांगेल; अरे माझा गुरु वृद्ध विसोबा खेचर; पण हा पोरगा त्याचाहि गुरु आहे! माझा देवाधिदेव काय म्हणाला तें याला विचारा! जने, ए जने, तूं त्याच्यावर काय अभंग केला आहेस? म्हण,

म्हण पाहूं ! " जनी म्हणजे एक वाळकीशी बाई होती; ती नामदेवाच्या पायापाशीं बसलेली असावयाची. ती उदासपणानें त्या समाजाकडे पाही आणि मधूनमधून देवळाकडे पाही. नामानें सांगतांच जनी म्हणाली, " मायेहूनी माय मानीं । करी जिवाची ओवाळणी ॥ परलोकीचें तारुं । म्हणे माझा ज्ञानेश्वरु ॥ ज्ञानेश्वर मंगलमुनी । सेवा करी दासी जनी ॥ " " भले शाबास, ज्ञानेश्वर परलोकचें तारुं आहे. ज्ञानेश्वर मंगल मुनि आहे. माझ्या पतित बांधवांनो, या तारवाचा, या मुनीचा आश्रय करा. बोला ' पुंडलिक वरदा हरी विठ्ठल ! ' बोला विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल...... " सारें वाळवंट कणाकणांतून, आणि सारी भीवरा थेंबाथेंबांतून विठ्ठलमय होऊन गेली.

इतक्यांत आपला तो मंगळवेढ्याचा तरणा महार पोरगा गर्दीतून पुढें आला. त्याचा आवेश पाहून माणसें जरा मागें झालीं. तो नामदेवापुढें येऊन उभा राहिला. तो थरथर कांपत होता. त्याचे डोळे आरक्त आणि डबडबलेले होते. दोन्ही हात जोडून तो थोडा दुरूनच नामाच्या पायां पडला.

नामानें त्याला उठविलें. अंग चोरून तो म्हणाला, " महाराज, मी महार आहें. " " तूं कोणीहि ऐस बाबा, तूं तर माझ्या वयाचा दिसतोस. माझ्या पायां कां पडतोस ? " " मी महार आहें माझाहि उद्धार होईल का ? " " अरे यांत काय संशय ? तूं श्रीकृष्णाच्या ठिकाणीं, श्रीविठ्ठलाच्या पायावर मन व्हा; त्याच्या नामाचा जप कर; त्याचें नांव अहोरात्र गा तुझा उद्धार होईल. महार असो, मांग असो, कोणीहि असो. देवाच्या भक्तीचा, नामाचा, उद्धाराचा अधिकार सर्वांना आहे. " चोखा सद्गदित आवाजानें म्हणाला, " महाराज माझ्या मस्तकावर हात ठेवा, आपण माझे गुरु व्हा. " नामानें त्याच्या मस्तकावर हात ठेवला; आणि त्यानें त्याला गुरुमंत्र दिला; त्यानें त्याला नाम दिलें. चोख्याचें मुख प्रफुल्लित झालें. ज्ञानेश्वरानें त्याला जवळ घेतलें; चोखा रडूं लागला. अवघें नभोवितान नामगजरानें दुमदुमून गेलें. एक महार पंढरीचा भक्त झाला. शेकडों लोकांनीं, ब्राह्मणांनीं, मराठ्यांनीं, त्या पवित्र परिसरांत चोखोबाला आलिंगन दिलें; त्यांनीं त्याच्या पायावर डोई ठेविली ! चोखा गुरूपदिष्ट झाला. चोखा संतमंडळींत प्रविष्ट झाला. एक तरणा पोरसवदा महार गळ्यांत माळ घालून, गोपी-

चंदनाचे टिळे लावून, गळ्यांत एकतारी बांधून, संतमंडळींच्या गोटांत उभा राहून, भीवरेच्या तीरावर, महाद्वारांत भजन करूं लागला. महाराष्ट्रांत एक प्रचंड क्रांति झाली.

---

## कठिण शब्दांचे अर्थ

लोकाविलँक्षण = अद्भुत. मोहरणें = बहरास येणें. धर्मग्लानि = धर्माला आलेली म्लानता. तिमिर = काळोख. शूद्रातिशूद्र = महार, मांग, धेड इत्यादि. वांकण = वांकदार तीर. स्तिमितपणानें = आश्चर्यचकित होऊन. श्वसन = श्वासोच्छ्वास. संपुट = ओंजळ. चौऱ्याऐशीं लक्ष योनी = कृमिकीटकांपासून तों मनुष्य प्राण्यापर्यंत असंख्य जीवजाती. अंगुष्ठ = अंगठा. शत योजनें = शंभर कोस. हुर्दे = हृदय. पिरतिमि = पृथ्वी. कृशांग = कृश शरीराचा. मुखश्री = चेहऱ्याची शोभा. आत्मतत्त्व = परमेश्वराचा अंश. लुप्त झालेला = लोपलेला. कुंभपाक = एका नरकाचें नांव. नभोवितान = आकाशमंडळ गुरूपदिष्ट = गुरूनें उपदेशिलेला. भीवरा = भीमा.

## अभ्यास

(१) देव सर्वांना समत्वबुद्धीनें वागवितो हें निसर्गातील कोणकोणत्या गोष्टींवरून सिद्ध होतें ?

(२) भागवत धर्मसंप्रदायाचे ठळक विशेष सांगून महाराष्ट्रांत या संप्रदायाचा एवढा प्रसार कां झाला तें सांगा.

(३) एका कर्मठ ब्राह्मणाला एका महाराचा विटाळ झाला आहे अशी कल्पना करून त्या उभयतांमधील संवाद लिहा.

(४) सुमारें पंचवीस ओळींत ज्ञानेश्वराचें चरित्र देऊन त्यानें केलेल्या सामाजिक जागृतीचें स्वरूप सांगा.

(५) आज आपल्या सभोंवतीं दिसून येणाऱ्या सामाजिक विषमतेचीं उदाहरणें देऊन ' नरेंच केला हीन किती नर ' या विषयावर एक विस्तृत निबंध लिहा.

# कोणास काय हवें तें सांगा ! : : ११

[ 'विज्ञानबोध' या ग्रंथाला प्रा० माटे यांनीं जी विस्तृत आणि विवेचक प्रस्तावना जोडली आहे तीमधून हा उतारा घेतला आहे. शास्त्रीय शोधांनीं माणसाचें जीवित स्वास्थ्यपूर्ण झालें आहे आणि त्याच्या सुखसोयींत खूपच भर पडली आहे ही गोष्ट खरी. तथापि, यामुळेंच मनुष्य दिवसेंदिवस अधिकाधिक आळशी होत चालला आहे. हस्तकौशल्याबद्दलची त्याची आवड मावळत जाऊन अगदीं मामुली कामासाठींसुद्धां यंत्रावर विसंबून राहण्याची संवय त्याला लागली आहे; आपल्यापेक्षां पाश्चात्यांत तर ही यंत्रावलंबी वृत्ति फारच बळावत आहे. अमेरिकेसारख्या देशांत रोजच्या जीवनांतही माणूस यंत्रावर किती विसंबून असतो हें पाहिलें म्हणजे त्यांच्या सुखसोयीं-बद्दल त्यांचा हेवा करावा कीं त्यांच्या यंत्रावलंबी परस्वाधीन जीवनाबद्दल त्याची कीव करावी हेंच कळत नाहीं. येवढीं यांत्रिक साधनें हाताशीं असूनहि पाश्चात्यांची तृप्ति अद्याप झालेली नाहींच. अजूनहि पुष्कळ कामें यंत्रानें केलीं तर तीं त्यांना हवीं आहेत. यंत्रांकडून त्यांच्या काय काय अपेक्षा आहेत याची जंत्री थोड्या विनोदी भाषेंत या लेखांत दिली आहे. ]

गेल्या शतकांत युरोपियन लोकांनीं आपलें जीवित शास्त्रशोधांच्या बळावर समृद्ध करून घेतलें आहे. पण सृष्टीचीं निरनिराळीं सामर्थ्यें हीं आपल्या कामाला आपण जुंपू शकतों, त्यांना वळणीवर आणून आपल्याला हवें तें तें त्यांजकडून करवितों हें माहीत झाल्यामुळें तेथील लोक कशी कोपरानें माती खणूं लागले आहेत तें पहा. नित्याच्या राहणींतील हरतऱ्हेच्या अडचणी शास्त्रशोधाच्या बळावर नाहींशा करून ती राहणी सुखसोयींनीं कशी गजबजून सोडावी आणि दुःख पर्वताएवढें नाहीं; तर 'जवापाड'च आहे हें सिद्ध करण्याची ते कशी अहोरात्र

वांछा करीत आहेत, हें पाहण्यासारखें आहे. देशांत स्वतंत्र कल्पनांचें स्फुरण सर्वत्र चालू आहे. त्या स्फुरणाचा उपयोग आपल्या नित्याच्या गरजा भागविण्याच्या कामीं कसा करून घ्यावा, हें पहाण्यासाठीं माणसांनीं मंडळें काढिलीं आहेत. कोणास कोणती गैरसोय जावयास हवी किंवा एकादी नवीनच सोय व्हावयास हवी अशी पृच्छा या मंडळ्या सर्व लोकांना करतात. मग देशांतील कल्पक लोकांच्या पुढें या अपेक्षित सोयी मांडून त्यांना आपलें कल्पनाचातुर्य चालवावयास सांगतात. घरमालकिणीला एकाद्या कांहीं उत्तम आरशाची योजना हवी आहे; कोणा गडबडींत असलेल्या लोकांना मोड मिळण्याचें यंत्र हवें आहे; व अल्पहि श्रम ज्यांना नकोत अशा कांहीं आळशी दाढी करणारांना सदाधारा वस्तरा हवा आहे; कोणा प्रवाशांना साखर, चहा, व दूध यांचे खडे बनावयास हवेत; हेतू हा कीं, थोड्याशा ऊन पाण्यांत ते टाकल्याबरोबर उत्तम चहा तयार व्हावा व कोणा विनोदी पतिराजांना कचेरींतून उशीरां घरीं आल्या-बद्दल आपल्या मालकिणीचा कितपत घुस्सा झाला आहे, हें दाखविणारें एखादें उष्णतामापक यंत्र हवें आहे; युरोपियन लोकांना नित्याच्या राहणींत काय व्हावयास हवें आहे याची यादी फारच मोठी आहे; पण त्यांच्या वांछा कशा सूक्ष्म बनत चालल्या आहेत याचें दिग्दर्शन व्हावें म्हणून ती दिली आहे. मोठमोठाल्या खाणी, गिरण्या, कारखाने, छापखाने इत्यादिकांत कोणत्या जरुरी आहेत त्याचीहि यादी प्रसिद्ध होत असते व कल्पक लोक आपली बुद्धि त्यांवर चालवीत असतातच. म्हणजे असें कीं, अत्यंत महत्त्वाच्या कामापासून तों अगदीं क्षुल्लक हालचालीपर्यंत शास्त्र आपल्या सेवेला कसें लावून घ्यावें यासंबंधींची खटपट तिकडील देशांत अहोरात्र चालू आहे. या मानानें कल्पना बसवितील त्यांना बक्षीस देऊन त्यांनीं सुचविलेली कल्पना अमलांत आणून ती बाजारांत मांडतात व अशा रीतीनें नव्या सोयी समाजांत फैलावून देतात. विचारांची ही पद्धति चालू असल्यामुळें तिकडील लोकांपैकीं कोणास काय हवें असतें याबद्दलचे त्यांचे जे उद्गार आहेत ते पाहाण्यासारखे आहेत. कोणी म्हणतो, धुक्यांतून पली-कडचें दिसेल असा दिवा आम्हांस हवा आहे, कारण त्यानें धुक्याच्या वेळीं इकडे तिकडे हिंडण्याचें काम सोपें होईल; जे धुळीनें त्रासले आहेत ते

शास्त्रज्ञांना म्हणतात कीं, एकादें कणशोषक यंत्र काढा; टक्कल पडल्यामुळें ज्यांना रंगेल समाजांत वावरणें कठिण पडत आहे त्यांनीं आपल्या मनांतील चुटपूट शास्त्रविदांना बोलून दाखविली आहे व केस पुन्हां वाढविण्याची कांहीं योजना करा असें आग्रहानें विनविलें आहे; पेट्रोल जर बर्फासारखें थिजवितां आलें, तर मोटारमध्यें त्याची अडगळ फार होणार नाहीं, म्हणून तें थिजविण्याची व त्या थिजलेल्या खड्यांतून लागेल तसतसें आपोआप पातळ होत जावें अशी कांहीं योजना तुम्ही करा, असें मोटारच्या हौशी लोकांचें म्हणणें आहे; रेडिओमधून ऐकूं येणाऱ्या आपल्याच देशांतील भाषणांवर जे संतुष्ट नाहींत ते म्हणत आहेत कीं, कोणत्याहि भाषेंत जरी भाषण झालें तरी त्याचें आमच्या भाषेंत भाषांतर होऊन मग रेडिओंतून तें आमच्या कानीं येईल अशी व्यवस्था व्हावयास हवी लिहितांना ज्यांना अनेक तऱ्हेच्या खुणा करावयाच्या असतात त्यांचें म्हणणें आहे कीं एकाच फाऊंटन पेनच्या पोटांत तीन रंगांच्या शाया असाव्यात; लोकांच्या मोटारींचा चिखल अंगावर उडाल्यामुळें कोणी सुचविलें आहे कीं, हा चिखल न उडण्याची कांहीं यांत्रिक हिकमत कोणीं शोधून काढावी; ज्यांना स्वच्छतेची कांहीं कल्पना आहे ते म्हणतात कीं, आंत तोंड घालून बोलावयाचें टेलिफोनचें जें नसराळें असतें त्याच्यावर दरवेळीं आपोआप वर सरकत येणारा एक कागद असावा व एकाचें बोलणें झालें म्हणजे तो गळून पडावा, दुसरा वर यावा व त्यांतून मग दुसऱ्यानें बोलावें; शिसपेन्सील ही शाईइतकीच काळी उठावी व चोळवटल्यानें पसरूं नये अशी कांहीं हिकमत कोणास हवी आहे; फळाणी ही कशी न आकसेल याची कांहीं व्यवस्था कोणास व्हावयास हवी आहे; दाढी झाल्यानंतर आंतलें पातें कोरडें करणें जरूर असतें, नाहींतर तें गंजतें. म्हणून तें सगळें प्रकरण उलगडावें तर लागूं नये आणि आंतलें पातें मात्र स्वच्छ व्हावें व कोरडेंहि व्हावें अशी योजना कोणास हवी आहे; कोणीं सुचविलें आहे कीं; शास्त्रकारांनीं असें एकादें रसायन काढावें कीं, ज्याचा लेप एकदां गालफडांना केला कीं सगळ्या जन्मांत पुन्हां केस म्हणून उगवूं नयेत; कोणीं मोलकरणीनें सुचविलें आहे कीं, जो एक-दोनदां फिरविल्याबरोबर भांडें लख्ख निघेल असा भांडीं घासण्याचा ब्रश तयार व्हावयास हवा; शिंपिणीनें सुचविलें आहे कीं,

शिवतांना शेवटला टांका जो अधांतरींच सोडावा लागतो तो भक्कम करण्याची कांहीं हिकमत निघावयास हवी; पाऊस येऊं लागतांच आपोआप मिटणाऱ्या खिडक्या कोणास हव्या आहेत; व कोणास आंत उभें राहून तावदानांवर बाहेरून पडणारी धूळ झाडून टाकतां येईल अशी सोय हवी आहे. खानावळवाल्यांना किंवा सासुरवासिनींना कडवे व पावटे यांचीं सालें काढण्याचें यंत्र हवें आहे; कोणाला एकदां सुरू करून दिलें म्हणजे सगळ्या भिंती झाडून टाकील आणि त्यांना सुंदर रंग देईल असें यंत्र हवें आहे; वाटेनें जातांना मध्यें कांहीं आडवें आलें तर सायकलवाल्याला एकदम थांबून खालीं पाय टेकावा लागतो, तेवढी गैरसोय कोणी दूर केल्यास ती त्याला हवी आहे; आपण स्वयंपाकघरांत गुंतलों असतां दारावर कोण आलें आहे हें गाजावाजा न होतां सहज कळेल अशी कांहीं आरशाची योजना घरधानिणींना हवी आहे; कोणा गडबडींत असलेल्या लोकांना मोड मिळण्याचें यंत्र हवें आहे; व अल्पहि श्रम ज्यांना नकोत अशा कांहीं आळशी दाढी करणारांना सदाधारा वस्तरा हवा आहे; कोणा प्रवाशांना साखर, चहा, व दूध यांचे खडे बनावयास हवेत; हेतु हा कीं, थोड्याशा ऊन पाण्यांत ते टाकल्याबरोबर उत्तम चहा तयार व्हावा व कोणा विनोदी पतिराजांना कचेरींतून उशीरां घरीं आल्याबद्दल आपल्या मालकिणीचा कितपत घुस्सा झाला आहे, हें दाखविणारें एखादें उष्णतामापक यंत्र हवें आहे; युरोपियन लोकांना नित्याच्या राहणींत काय व्हावयास हवें आहे याची यादी फारच मोठी आहे; पण त्यांच्या वांछा कशा सूक्ष्म बनत चालल्या आहेत, याचें दिग्दर्शन व्हावें म्हणून ती दिली आहे. मोठमोठाल्या खाणी, गिरण्या, कारखाने, छापखाने इत्यादिकांत कोणत्या जरूरी आहेत त्यांचीहि यादी प्रसिद्ध होत असते व कल्पक लोक आपली बुद्धि त्यावर चालवीत असतातच. म्हणजे असें कीं, अत्यंत महत्त्वाच्या कामापासून तों अगदीं क्षुल्लक हालचालीपर्यंत शास्त्र आपल्या सेवेला कसें लावून घ्यावें यासंबंधींची खटपट तिकडील देशांत अहोरात्र चालू आहे. या मानानें पाहिलें म्हणजे आपण फारच मागें राहिलों आहों हें मनावर फार ठसतें.

---

## कठिण शब्दांचे अर्थ

शास्त्रविद् = शास्त्रज्ञ. हिकमत = युक्ति. फळाणी = फ्लॅनेल, गरम कापडाचा एक प्रकार. सदाधारा = कायमची धार असलेला. घुस्सा = रोष.

## अभ्यास

( १ ) माणसानें आपल्या दैनंदिन जीवनांत यंत्रावर इतक्या प्रमाणांत अवलंबून राहणें कितपत योग्य आहे ?

( २ ) एके दिवशीं गांवांतला विजेचा पुरवठा बंद पडला आहे अशी कल्पना करा व त्यामुळें विजेवर चालणारीं सारीं यंत्रें बंद पडून कसा हाहाःकार उडाला त्याचें विनोदी भाषेंत वर्णन करा.

( ३ ) हस्तकौशल्य व यंत्रकौशल्य—दोहोंमध्यें अधिक महत्त्व तुम्ही कुणाला द्याल ?

( ४ ) यंत्रावलंबी जीवनाचीं सुखें व दुःखें वर्णन करा.

# न पाहिलेला ताजमहाल : : १२

[ ‘ कोवळे निबंध ’ या नांवाचा एक निबंधसंग्रह प्रा. माटे यांनीं खास शालेय विद्यार्थ्यांकरतां म्हणूनच लिहिला आहे. त्यांतून हा निबंध घेतला आहे. ललित निबंध हा वाङ्मयप्रकार ‘ पर्सनल एसे ’ या इंग्रजींतील वाङ्मयप्रकारावरून मराठींत आला. ‘ गुजगोष्ट ’ या नांवानें प्रा. ना. सी. फडके यांनीं हें रोपटें प्रथम मराठी साहित्यांत आणून सजविलें. श्री. अनंत काणेकर. श्री. वि. स. खांडेकर, प्रा. वि. पां. दांडेकर इत्यादि प्रसिद्ध लेखकांनीं उत्तमोत्तम ललितनिबंध लिहून या नव्या साहित्य-प्रकाराला भरघोस व रमणीय रूप प्राप्त करून दिलें आहे. वाचकांशीं मनमोकळें हितगुज करण्याची आवड, भोंवतालच्या वस्तूंकडे व जीविता-कडे बघण्याचा खेळकर प्रसन्न दृष्टिकोन आणि ‘ साध्या विषयांतहि मोठा आशय ’ शोधून काढणारी तत्त्वचिंतनात्मक मनोवृत्ति यांच्या योगानें कोणताहि निबंध आकर्षक होतो.

प्रा. माटे यांच्या अनेक लेखांना सहजगत्या ललितनिबंधाचें स्वरूप आलेलें आहे. हा लहानसा निबंधहि एक नमुनेदार ललितनिबंध आहे. पाहिलेल्या गोष्टीवर कुणीहि लिहूं शकेल. पण न पाहिलेल्या ताजमहाला-वरहि प्रा. माटे यांनीं किती सुंदर निबंध लिहिला आहे पहा ! ]

मी अजून ताजमहाल पाहिलेला नाहीं. जगांतील बहुतेक इमारती मी न पाहिलेल्याच आहेत. इतक्या इमारती मी पाहणार तरी कसा ? बांधणारे इतके निरनिराळे लोक आणि पाहायला मात्र मी एकटा, तर हें प्रमाण बसावें कसें ? शेवटीं जगप्रसिद्ध इमारतींचीं जीं चित्रें प्रसिद्ध झालेलीं आहेत, तीं पाहूनच मी समाधान मानतों. ताजमहाल ही इमारत त्यांपैकींच एक आहे. हिचें एक ठराविक ठश्याचें चित्र आहे. तेंच अनेक पुस्तकांतून

किंवा चित्रसंग्रहांतून पाहावयास सांपडतें. एका इंग्रज लेखकानें म्हटलें कीं, या इमारतीकडे पाहिलें म्हणजे एक कुलीन सुकुमार स्त्री सलज्ज उभी आहे असें वाटतें. इतर माणसांच्या मनांत ताजमहालाच्या दर्शनानें हीच भावना उत्पन्न होते कीं काय हें मला माहीत नाहीं. पण ही भावना मात्र फार सुंदर आहे. ताजमहालाचीं अनेक वर्णनें मीं वाचलीं आहेत. त्यांचा परिणाम माझ्या मनावर इतका अनुकूल आणि इतका दृढ झाला आहे कीं, ही इमारत प्रत्यक्ष पाहावयास जाणें मला नकोसें वाटतें, न जाणो, मनावर झालेला तो रम्य संस्कार प्रत्यक्ष दर्शनानें उडून जावयाचा ! त्याचा काय नियम आहे ? वाचलेलीं सर्व वर्णनें एकमेकांत मिसळतात आणि त्यांचें एक मोठें नाजूक, देखणें, प्रमाणबद्ध स्वप्न मनापुढें नेहमीं उभें राहतें. मी जर ताजमहाल खरोखरच पाहिला तर तें स्वप्न विरूनहि जाईल. ताजमहाल तितका चांगला नसेलहि. लेखकांनीं असा कांहीं संमिश्र मेळ बनविला आहे कीं, त्याचें डोळ्यापुढें उभें राहणारें चित्र प्रसिद्ध झालेल्या चित्रांपेक्षां, शतपट सुंदर आणि दिमाखदार वाटतें. असें वाटतें कीं तें जपून धरावें आणि एखाद्या वेळीं ताजमहाल प्रत्यक्ष पाहिला व तें चित्र जर भंगलें तर मनःकोषांतील एक रमणीय मूर्ति मी आपण होऊन फोडून टाकली असें होईल, म्हणून तो पहावयास जाण्याच्या कल्पनेचें मला भय वाटतें.

शिवाय एकदां ताजमहाल पाहिला म्हणजे अधिक सुंदर असें कांहीं पाहावयाचें शिल्लकच राहणार नाहीं असें लोक सांगतात. ही बाब तर फारच भयंकर वाटतें. सर्व सुंदर वस्तूंचें दर्शन होऊन चुकलें. म्हणजे पुढें प्रत्येक वस्तू सामान्य आणि कुरूपहि वाटू लागेल. आणि जीवितांत कसलाहि राम उरणार नाहीं. त्याऐवजीं सर्वोत्तम वस्तू बघावयाची अजून राहिली आहे ही जाणीव, एक मनोज्ञ अपेक्षा, जिवंत ठेवली व कांहीं तरी साध्य अजून आहे, कोठें तरी अजून पोंहोचावयाचें आहे, आजवर झालें तें कांहींच नव्हे या अपूर्णतेचें ज्ञान होत राहिलें तर पूर्णतेविषयींची आपली कल्पना अधिकच उदात्त होत राहील. म्हणून मला पुष्कळदां वाटतें कीं ताजमहाल पाहूंच नये. या माझ्या विचारांत कांहींतरी मर्म आहे हें वर्डस्वर्थ कवीची ‘ यारो अनूसीन् ’ व ‘ यारो सीन् ’ हीं दोन काव्यें वाचलीं तर पुरेपूर पटेल.

यारो नदी अत्यंत सुंदर असली पाहिजे या कल्पनेनें वर्डस्वर्थनें किती मनोरम तपशील त्या सौंदर्यांत भरला होता! तो तपशील म्हणजे सौंदर्यनिर्मिति व सौंदर्यलालसा यांचें सर्वोत्तम प्रदर्शन आहे. पण जेव्हां त्यानें यारो नदी प्रत्यक्ष पाहिली तेव्हां तो अगदीं खट्टू होऊन गेला आपण काढलेलें रमणीय चित्र पुसलें आहे, आपण घडवलेली सुस्वरूप मूर्ति भंगली आहे व भेगळ-लेली आहे, आपलें स्वप्न वाऱ्यावर उडून गेलें आहे असें त्याला वाटूं लागलें आणि मनानें कष्टी होऊन तो नदीच्या परिसरांतून परत आला. हाच अनुभव मलाहि कदाचित् येईल, या धास्तीनें ताजमहाल पाहाण्याची वासना मी दडपून टाकतों.

कांहीं सौंदर्यें अशीं असतात कीं, कसल्याहि चिकित्सकाचें, वावदूकाचें व पाखंडी माणसाचें त्यानें समाधानच व्हावें. प्रत्येक सौंदर्य माणसाच्या रूचीला हमखास प्रमुदित करील असें वाटत नाहीं. त्यांत कोठें तरी एखादी तरी खोटचेपी जागा असतेच. तीच जर कां दृष्टींत भरली तर बाकीचा सौंदर्य-विस्तार वायां गेला म्हणून समजावें. सगळी मुखश्री मोहक असली पण जर कां नाक शेवटीं थोडेसें मागें उचललें असलें तर ती मुखश्री काय आनंद देणार? दरवेळीं ही वाया गेली आहे, वाया गेली आहे याच विचाराची खोंच मनाला सारखी लागत राहील. हास्य कितीहि लोभनीय असलें, आणि त्याच्या संस्कारानें मुखमंडळ कितीहि प्रफुल्लित झालेलें असलें, पण जर कां हिरड्या काळ्या व बटबटींत असल्या आणि त्या बाहेर दिसल्या तर तें मुखमंडळ कुरूपच झालें म्हणून समजावें. रसिक सर्व कांहीं पाहणार. बारीक सारीकहि देखणार आणि मनाचा घडा शुद्ध सौंदर्यानें भरून घ्यावा या आशेनें त्या हास्याकडे पाहणार. पण जर कां त्यांत या काळ्या, लांबोड्या हिरड्या, दृग्गोचर झाल्या तर भरत आलेला घडा तो ओतून टाकील व चूळ थुंकून या झऱ्याच्या कांठांवरून निघून जाईल. असली कांहींतरी अमूर्त भीति माझ्या मनांत सारखी डोकावत असतेच. म्हणून ताजमहाल पहावयास जावें असें मला वाटत नाहीं. त्याऐवजीं मी तें चित्र मनांत तसेंच ठेवून दिलें आहे.

मृग नक्षत्रांतील डोक्यावरची ती मेघडंबरी, या क्षितिजापासून त्या क्षितिजापर्यंत वांकलेलें तें बहुरंगी इंद्रधनुष्य, रानच्या वाऱ्यानें, वासानें

आणि लांडोरीच्या आवाहनानें खुललेला व सहस्र नेत्रांनीं तिच्याकडे पाहत असलेला तो मयूर, आकाशाला भेटावयास चाललेली, उचंबळत असलेली ती गंगानदी अशांसारख्या सौंदर्यांचा जो एक विशाल जामदारखाना माझ्या मनांत मी कायमचा भरून ठेवला आहे त्यांतच मी ताजमहालाची ही सांठवण केलेली आहे. वरील सौंदर्यांना कधीं भंग आहे कां? तसाच तो ताजमहालालाहि नसला पाहिजे असा माझा आग्रह आहे, हट्ट आहे. कोणी त्याविषयीं खारटतुरट बोलूं लागलें तर मी तेथून उठून जातों कारण माझें स्वप्न मोडेल, माझी मूर्ति भंगेल, माझा देव्हारा फुटेल, माझें अमृत नासेल, मी गरीब होईन, दुनिया पोरकी होईल असा एक चमत्कारिक धाक मला वाटतो. आपल्या आईविषयीं कोणी कांहीं कुजबुजूं लागलें तर तुम्ही जसें तटकन् उठून जाल, कीं कांहीं अप्रिय कानीं पडण्यास नको आणि तें प्रेममांगल्याचें निधान भग्न व्हावयास नको, तसेंच माझें या टीकाकारांच्या सानिध्यांत होतें. वाटल्यास हें एक वेड म्हणा, पण तें आहे खरें.

ताजमहाल कोणी बांधला, कां बांधला, त्याला खर्च किती आला, कितीजणांचा घाम गळाला, या गोष्टी मला प्रस्तुत सौंदर्यदर्शनाच्या वेळीं तरी अप्रस्तुत वाटतात. ताजमहालाचें पुढें काय होईल हें सांगवत नाहीं. पण माझ्या मनाच्या यमुनाजळांत त्याचें पडलेलें प्रतिबिंब मी नेहमींच घट्ट धरून ठेवणार आहे.

---

## कठिण शब्दांचे अर्थ

दिमाखदार = डौलदार. मनःकोश = मनाचें भांडार. मनोज्ञ = मधुर. वर्डस्वर्थ = वुइल्यम वर्डस्वर्थ, निसर्गविषयक गीतें रचणारा सुप्रसिद्ध इंग्रज कवि. भेगळलेली = भेगा पडलेली. परिसर = सभोंवतीचा प्रदेश. चिकित्सक = चिकित्सा करणारा. वावदूक = वाद घालणारा. पाखंडी = अश्रद्ध, शंकेखोर. प्रमुदित = आनंदित. बोटचेपी जागा = नरम, दोषयुक्त जागा. मुखश्री = चेहऱ्याची शोभा, चेहऱ्याचें सौंदर्य. लोभनीय = लोभसवाणें. अमूर्त = अदृश्य. मेघडंबरी = आकाशाचा घुमट. खारटतुरट = वेडेंवांकडें. प्रेममांगल्याचें निधान = प्रीति व मंगलता या भावनांचा ठेवा.

## अभ्यास

(१) एका इंग्रज लेखकानें ताजमहालाला कुलीन, सुकुमार सलज्ज स्त्रीची उपमा दिली आहे. तुम्ही ताजमहालाचें चित्र पाहून त्याला अशाच तीन सुंदर उपमा द्या.

(२) एखाद्या मोठ्या पुढाऱ्याविषयीं अगर कलावन्ताविषयीं पूर्वी तुम्हांला असलेला आदर त्याला प्रत्यक्ष पाहून व त्याच्या सहवासांत दोन दिवस राहून कसा पार मावळून गेला याचें विनोदी भाषेंत वर्णन करून तुमच्या मित्राला एक पत्र लिहा.

(३) 'शनिवारवाडा पाहण्यापूर्वीं' व 'शनिवारवाडा पाहिल्यानंतर' असे दोन मोठे परिच्छेद लिहा. शनिवार-वाडा बघण्यापूर्वींची उत्सुकता व तो प्रत्यक्ष पाहिल्या-नंतर पदरीं पडणारी निराशा यांचें त्यांत प्रामुख्यानें वर्णन असावें.

(४) या लेखांत लेखकानें आपणांला आवडणाऱ्या कांहीं विशिष्ट सौंदर्यपूर्ण दृश्यांचा उल्लेख केला आहे. तुमचीं अशीं कांहीं आवडतीं सौंदर्यदृश्यें सांगा.

(५) गोलघुमट, सांचीचा स्तूप, वेरूळचीं लेणीं यांची माहिती मिळवून त्यांवर टिपणें करा.

• • •

# भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टि : : १३

[ ‘ साहित्यधारा ’ या प्रा. माटे यांच्या स्फुट लेखनसंग्रहांतून प्रस्तुतचा लेख घेतला आहे. भाषेची वाढ कसकशी होत जाते, तीमध्यें नवनव्या शब्दांची भर कशी पडते व दिवसेंदिवस तिला अधिकाधिक भरघोंस, पुष्ट व रमणीय स्वरूप कसें प्राप्त होतें याचें सामाजिक दृष्टिकोनांतून केलेलें हें विवरण जेवढें उद्‌बोधक तेवढेंच मनोरंजक आहे. निरनिराळे शब्द प्रथम काव्यमय रूपकें म्हणून योजिले जातात, परंतु कालान्तरानें भरपूर वापरामुळें त्यांचा रूपकपणा नष्ट होतो आणि सर्वसामान्य शब्द म्हणूनच ते भाषेंत रूढ होऊन बसतात ही गोष्ट अनेक गंमतीचीं उदाहरणें घेऊन लेखकानें स्पष्ट केली आहे. निरनिराळ्या धंद्यांतले लोक लेखन-व्यवसायांत पडले तर आपापल्या धंद्यांतलीं रूपकें आपल्याबरोबर ते कशी घेऊन येतील आणि या रूपकांच्या योगानें निरनिराळ्या शब्दांची भर पडून भाषा कशी संपन्न व समृद्ध होईल याचेंहि कल्पनारम्य चित्र लेखकानें रेखाटलें आहे. भाषेच्या अभिवृद्धीसारखा शास्त्रीय विषयहि कुशल लेखक किती रंजक करूं शकतो याचें हा लेख म्हणजे एक उत्तम उदाहरण आहे. ]

‘ निरनिराळ्या दृष्टींनीं एकाद्या विषयाकडे पाहणें ’ असा कांहीं-एक प्रकार असतो. आर्थिक दृष्टीनें पाहणें, ऐतिहासिक दृष्टीनें पाहणें, हें जसें, तसेंच सामाजिक दृष्टीनें पाहणें हेंहि एकाद्या विषयाचा खराखुरा बोध होण्यास फार उपयोगी पडतें.

भाषा वाढतें म्हणजे तिच्यांतील शब्द वाढतात. शब्द हीं मनांत उद्‌भवलेल्या कल्पनांची व गोचर पदार्थांचीं नांवें असतात हें उघडच आहे. हे शब्द जों जों जास्त होत जातात तों तों भाषेची समृद्धि होत जाते.

शब्दांची वाढ अधिक होण्याचीं जीं अनेक साधनें आहेत. त्यांत रूपकांची योजना हें एक फार मोठें साधन आहे. प्रथम प्रथम हौशी बोलणारा किंवा लिहिणारा आपल्या लिहिण्यांत किंवा बोलण्यांत सरसपणा आणण्यासाठीं सुंदर रूपकांची योजना करतों; हीं रूपकें परिचित असलीं किंवा थोड्या कल्पनेनें ओळखतां येण्यासारखीं असलीं तर वाचकांना किंवा श्रोत्यांना अतिशय आनंद होतो; व त्यांच्या या गुणामुळें तीं लोकांमध्यें चांगलींच चलन पावतात. लोक त्यांचा सरसकट उपयोग करूं लागतात; इतका कीं शेवटीं त्यांतील काव्यगुण लोपून साध्या व्यावहारिक शब्दांचें रूप त्यांना प्राप्त होतें व अशा रीतीनें शब्दसंख्या वाढते.

एकाद्यानें पंधरा मिनिटांच्या बोलीनें जर एकादा हेलकरी केला, पण मुक्कामाचें घर लवकर सांपडलें नाहीं म्हणून त्यानें त्याला पाऊण तास तेवढ्याच मजुरीवर रखडविलें तर आपल्या या पराक्रमाचें फुशारकीनें वर्णन करतांना तो म्हणतो, "मी त्या हेलकऱ्याला तसेंच पुढें ताणीत नेलें." आतां अगदीं प्रथम ज्यानें 'ताणीत नेणें' हा शब्दप्रयोग केला असेल त्यानें काव्यमय रचना केली होती, हें स्पष्ट आहे. रबराचा तुकडा एक बोट-भर लांब असतो, व एरव्हीं मोजून पाहिलें तर त्याची लांबी तितकीच भरते. पण कांहीं कारणासाठीं हेंच रबर ताणलें तर हातभर लांब होतें. अर्थात ही लांबी अंगिकारतांना रबराला क्लेश होतात हें सहज दिसतें. हा 'ताणणें' याचा अर्थ आहे. हेलकऱ्याची जी पंधरा मिनिटें होतीं त्याचीं 'ताणून' पंचेचाळीस केलीं व त्याच्या शरीरक्लेशाकडे लक्ष दिलें नाहीं. हा सगळा अर्थ पहिल्या माणसानें रूपकानें सांगितला; पण पुढें तो शब्द अनेकवार उपयोगांत आल्यामुळें लोक त्याचा काव्यगुण विसरले व तो शब्द साध्या व्यावहारिक अर्थाचा होऊन बसला. म्हणजे रूपकाचा साधा शब्द झाला. ज्यानें प्रथम 'कवळणें' म्हणजे 'दोन बाहूंच्या पाशांत कव-टाळिणें' असा शब्दप्रयोग केला त्यानें रूपक केलेलें होतें. 'कवळ' म्हणजे घास; वरचा जबडा व खालचा जबडा यांच्यामध्यें सांपडणारा तो 'कवळ' म्हणजे घास; त्याप्रमाणेंच दोन भुजांत जी वस्तु सांपडली तिचाहि घास झाला म्हणजे ती आपण कवाळिली. कालांतरानें हें काव्य नाहींसें होऊन तो शब्द कवटाळणें या अर्थाचा केवळ गद्यरूप होऊन बसला. शब्दकोश

उघडून पाहिला तर, अशा तऱ्हेनें आपलें काव्यरूप गमावून बसलेले शब्द अगदीं मुळापर्यंत व्युत्पत्तिदृष्ट्या नेऊन पोहोंचविलेले तेथें सांपडतीलच असें नाहीं. कारण असें केल्यानें कोशकर्त्यांचें काम फारच वाढेल. म्हणून रूपकपणा टाकल्यावर शब्दाला जो व्यावहारिक अर्थ उत्पन्न झालेला असतो तेवढा देऊनच कोशकर्त्याला भागवावें लागतें. पण एवढें मात्र खरें असतें कीं, हा शब्द आरंभीं रूपकरूपानें आला व पुढें साधा शब्द होऊन बसला.

आपण पुष्कळदां ‘ हाडकणें ’ हा शब्द ‘ वाळणें ’ या अर्थानें वापरतों. पण मूळचें तें रूपक आहे. वाळून वाळून फक्त हाडें उरणें म्हणजे ‘हाडकणें’ पण आतां हें त्यांतलें काव्य नाहींसें होऊन त्याला अगदीं साध्या शब्दाच्या अर्थाचें रूप आलें आहे, यानेंच भाषा वाढत जाते. अमुक कारणासाठीं ‘ हरताळ ’ पडला असें आपण हजारदां वाचतों व त्याचा लौकिक अर्थ आतां कायम झाला असल्यामुळें या शब्दांत पूर्वी रूपकाचा काव्यगुण होता ही माणसाची ओळखहि बुजत चालली आहे. माणसें पूर्वी पोथ्या लिहीत असत. लिहितांना लिहून झालेलें एखादें अक्षर नको असलें तर त्याच्यावर हरताळीचें चूर्ण फांसण्याची चाल असे. तें फांसलें म्हणजे जरी तें अक्षर थोडेंबहुत दिसत असलें तरी, तें खोडलेलें आहे असें समजावयाचें असा रूढ संकेत होता. त्याप्रमाणेंच अमुक एका आपत्तीमुळें जर व्यवहार बंद ठेवावयाचा असला तर दुकानें बंद ठेवून किंवा थोडीं किलकिलीं ठेवून आपण तीं बंद ठेवीत आहों अशा रीतीनें आपला उद्वेग व्यक्त करीत आहों; या अर्थी, प्रथम कोणी हौशी रसिकानें तो शब्द योजिला. पण पुढें पुढें त्यांतील काव्यगुण लोप पावून ‘ हरताळ पाडणें ’ म्हणजे ‘ व्यवहार बंद पाडणें ’ असा रूढार्थ झाला व तो एक नवा शब्दच बनून राहिला. हा शब्द ‘ हाट ’ व ‘ टाळा ’ म्हणजे बाजाराला कुलूप लावणें असाहि व्युत्पादितां येतो; व ती व्युत्पत्ति जास्त चांगली आहे असें वाटतें.

नगराकडे धाब्याचीं घरें असतात. वीज पडणें किंवा दुसरा कसला तरी उत्पात होणें यानें जर वस्ती हादरली तर हें घरावरचें धाबें अर्थातच दणकणार. हा प्रकार लक्षांत ठेवणाऱ्या कोणी रसिकानें आपत्तीमुळें किंवा भयामुळें नखशिखान्त घाबरून गेलेल्या माणसाचें वर्णन करितांना काव्य-

गुणानें म्हटलें कीं, 'त्याचें धात्रें दणाणून गेलें.' त्याची ती कविता पाहून तेव्हांचे श्रोते खरोखरच संतुष्ट झाले असतील. त्या काव्यगुणामुळेंच तो शब्द लोकप्रिय बनला व लोकप्रियतेमुळें त्याचा वारंवार उपयोग झाला. तो तसा झाल्यामुळें शब्दांतील काव्यगुण मावळला आणि त्याला 'फार भिणें, घाबरगुंडी उडणें' असलें प्राकृत रूप प्राप्त झालें. पण भाषेमध्यें एक शब्द मात्र नवीन आला. अशा प्रकारें रूपकत्व गमावून बसून साध्या अर्थानेंच भाषेंत कायम होऊन बसलेल्या शब्दांची संख्या भाषेंत अफाट आहे; म्हणूनच भाषेला Fossil poetry असें म्हटलेलें आहे.

आतां अशा प्रकारें स्वभाषेंत रूपकें प्रविष्ट करणें व शेवटीं त्यांना साधे शब्द होऊन बसण्याची संधि देणें हें काम, ती भाषा बनवीत जाणारे जे कोणी, त्यांच्या हातीं असतें. त्यांच्या स्वतःच्या जीवनांत जीं सुंदर रूपकें त्यांना अर्थव्यक्तीसाठीं योजाविशीं वाटतात तीं ते योजितात. त्यांना तरी याहून जास्त काय करतां येणार? जीविताचीं जीं अंगें त्यांना परिचित, त्यांतील रूपकेंच ते उचलणार व योजणार. मराठी भाषेंतील बहुतेक नागर व प्रौढ रचना ब्राह्मणांनींच केलेली आहे. अर्थात् त्यांना परिचित अशीं जीं रूपकें तींच त्यांनीं योजिलीं व त्यांना पुढें साध्या शब्दांचीं रूपें आलीं व भाषा समृद्ध झाली. एकादी गोष्ट शिकविणें व मागून थोड्या उर-स्फोडीनें ती विद्यार्थ्याला पटविणें या अर्थानें 'संथा देणें' या शब्दप्रयोग पूर्वींची शास्त्रीवैदिक मंडळी करीत. आधुनिक सुशिक्षितांनीं हाच शब्द उचलला व 'मॅकडोनल्ड' यांनीं अमुक गृहस्थापाशीं सामाजिक ज्ञानाची संथा घेतली पण त्यांना खरें मर्म उमगलें नाहीं असा शब्दप्रयोग केला. सध्यां जे मध्यमवयीन ब्राह्मण आहेत त्यांना हा शब्द अडणार नाहीं, पण आणखी पिढी दीड पिढीनंतर या शब्दाचा अर्थ कोशांतच पाहावा लागेल अशी स्थिति खुद्द ब्राह्मण मुलांचीच होईल; इतरांची तर ती आतांच आहे.

टिळकांनीं प्रतिपक्षावर हल्ला करतांना लहानशी कबुली देऊन दोषमुक्त व्हानात या अर्थानें म्हटलें कीं, 'स्नान करून मोकळें व्हानात!' ज्या काळीं व ज्या समाजांत सुतकाची कल्पना लुप्त असेल किंवा होईल त्याला या ब्राह्मणी रूपकाचें मर्म समजणार नाहीं. निबंधमाला संपविण्याचें वेळेस विष्णुशास्त्र्यांनीं म्हटलें आहे, "आम्ही आतां अवभृथस्नानास मोकळें

अनुक्रम
विभाग
क्रमांक

होत आहों." शास्त्रीबोवांच्या वेळच्या वाचकांस—कारण कीं, ते बहुतेक सगळे ब्राह्मणच होते—या रूपकाचा अर्थ समजत असेल; पण 'यज्ञ संपवून यजमान हा कृतकृत्य होत्साता नदीवर स्नानाकरितां जाई; त्या जाण्याला अवभृथस्नानास मोकळें होणें असें नांव होतें.' असा अर्थ नवीनांस स्पष्ट करून सांगावयास हवा. "विनाकारण हें सव्यापसव्य कोण करीत बसतो ?" यांतील रूपक श्राद्धपक्षाची चाल जों जों कमी होत जाईल तों तों दुर्बोध होत जाईल हें स्पष्ट आहे. पण वरील सर्व शब्दप्रयोगांचे व्यावहारिक अर्थ मात्र भाषेंत कायम राहिलेले आहेत. हे नवे शब्द मुळांत रूपकरूप होते व लेखक हे ज्या पेशांत वागणारे होते त्या पेशांतून त्यांनीं तीं रूपकें उचलिलीं होतीं.

आतां जर मराठी भाषेंत शब्दांचा भरणा व्हावयास हवा असेल तर निरनिराळ्या पेशांतील, धंद्यांतील रूपकें भाषेंत प्रविष्ट व्हावयास हवीं; व तीं प्रविष्ट करून देण्यास त्या त्या पेशांतील, धंद्यांतील माणसें वाङ्मयलेखनाच्या प्रांगणांत उतरावयास हवीं. असें झालें म्हणजे शब्दांची भर भराभर होत जाईल. याचा अर्थ असा कीं, ज्यांना विद्येचा संस्कार झालेला नाहीं अशा ज्या शेंकडों धंदेवाल्या जाती आहेत त्यांच्यांतील माणसें शिक्षित होऊन आपलें मनोगत व्यक्त करण्यासाठीं, स्वतःला परिचित असलेल्या रूपकांचा उपयोग करण्याची बुद्धि त्यांना उत्पन्न व्हावयास हवी. तेली लेखक आपलीं रूपकें घेऊन भाषेंत यावा; तसाच न्हावी, तसाच कोळी, तसाच साळी. हे सगळे लोक आपल्या रूपकांच्या भांडवलानिशीं एकदां लेखनव्यवसायांत उतरले म्हणजे मराठी भाषेचें वैभव गडगडां भरत जाईल.

सध्यांसुद्धां प्रत्यक्ष त्या त्या समाजांतील नसूनहि थोड्या ओळखदेखीमुळें व व्यवहारामुळें आपण कांहीं कांहीं रूपकें योजून त्यांना सामान्य शब्दांचा गौरवहि प्राप्त करून दिला आहे. आपण 'इंगा फिरणें' असा शब्दप्रयोग करतों; पण हा प्रयोग चांभारवाड्यांतील आहे. आपल्या लेखणींतून उतरत असल्यामुळें तो पावन झाला आहे असें वाटतें इतकेंच काय तें. कातडें मूळचें खडबडींत व अगदीं आडमुठें असें असतें. तें एका बाजूनें पायांत धरून व दुसऱ्या बाजूनें हातांत धरून आपल्या हातांतील लोखंडाचा इंगा चांभार त्याच्यावरून जोरानें फिरवितो. असें त्यानें एकदोनदां केलें म्हणजे तें आडमुठें कातडें अंगावरून वारें गेल्याप्रमाणें, अगदीं ढिलें पडतें. हा अर्थ

ध्यानांत आला म्हणजे " मोठे खाडखाड बोलत आहेत पण एकदां साहेबा-पुढल्या नोकरीचा इंगा फिरला म्हणजे नरम येतील " या टीकावाक्यांतील रूपकाची खरी खुमारी ध्यानांत येईल. " पण काकासाहेब ठिय्या देऊन बसले होते ते हलेचनात. " या वाक्यांतील ' ठिय्या ' शब्द आपण सुतार-खान्यांतून उचललेला आहे. पायाखालीं धरून जर एकादी फळी रंधा-वयाची असली तर ती पुढें निसटूं नये म्हणून पुष्ठिपत्ररूपी जें मोठें लाकूड खालीं असतें त्याला एक आडवी पट्टी सुतार लोक ठोकतात, व तिच्या अटणीला ही रंधावयाची फळी लावतात. ही जी लहानशी आडवी ठोकलेली पट्टी असते तिला ' ठिय्या ' असें म्हणतात. ती जशी हालत नाहीं, तसें काकासाहेबहि हालत नाहींत, असें हें मूळचें रूपक होतें. अशा प्रकारचे अनेक शब्द आपण धंदेवाइकांकडून उचलले आहेत हें खरें; पण खुद्द धंदे-वालेच जेव्हां वाङ्मयांत उतरतील तेव्हां ही रूपकांची भरती झपाट्यानें होईल.

याच विचाराची खुलावट आजहि कल्पनेनें करतां येण्यासारखी आहे. एकादा गवंडी जर लेखन-व्यवसायांत पडला व त्याला ' विचाराची level पुरेशी वर गेलेली नाहीं ' असें म्हणावयाचें असेल तर कदाचित् तो म्हणेल कीं, ' विचाराची कमान जितकी उंच व्हावयास हवी तितकी झालेली नाहीं. ' त्यानें एकावर एक तर्कसिद्ध अनुमानें करून जर मोठेंच पक्षपात-राहित्य दाखविलें असलें तर कदाचित् तो म्हणेल कीं, ' ही एवढी परंपरा मी उभी केली आहे, सज्जनांनीं खुशाल ओळंबा लावून पाहावा व कोठें पक्षपात दिसतो का सांगावें. ' गांवांत कांहीं शिष्ट माणसें पुढारी म्हणून मिरवितात. पण चळवळीची सगळी दगदग मागें राहून काम करणाऱ्या कांहीं व्यक्तींवरच पडते व वास्तविक तेच पुढारी असतात. हा विचार आपल्या पेशाला अनुसरून व रूपकानें बोलतांना तो गवंडी असा वर्णील कीं, अमुक अमुक गृहस्थ हे ' दर्शनी ' पुढारी आहेत. पण तमुक गृहस्थ हे बापडे 'डुबाव' पुढारी म्हणजे भिंतींत लपवलेल्या खांबासारखे आहेत.' परीट वाङ्मयांत आला व कितीहि बोललें तरी आपल्या तोंडाला हा सुरकुतीहि पडूं देत नाहीं, असें वर्णन त्याला करावयाचें असलें तर तो लिहील कीं, ' लोक इतके अद्वातद्वा बोलले पण त्यानें तोंडावरची इस्त्री बिलकुल बिघडूं

८३८०६

दिली नाहीं. तेली सार्वजनिक कामांत पडला व प्रयत्न परंपरेपैकीं एकादा प्रयत्न जर नीट साधला नाहीं तर तो म्हणेल कीं, ' हा घाणा नीट निघाला नाहीं. ' वक्त्याचें वक्तृत्व श्रोत्यांच्या भावनेसह वाढत वाढत जाऊन त्याचा कळस झाला व श्रोत्यांनीं ' वाहवा ' म्हणून टाळी दिली व या प्रसंगाचें वर्णन करण्याचें काम एकाद्या गवयाकडे असलें तर तो लिहील कीं, ' वक्ता व श्रोते हे समेवर आले. '

एकादा न्हावी जर कौन्सिलचा मेंबर झाला व आपण आपलें मांडावयाचें बिल तपशिलासह उत्तम तयार करून ठेविलें आहे व आपण आपली पाळी येण्याची वाट पाहात आहों असें त्यास म्हणावयाचें असेल तर तो म्हणेल कीं, ' मी अगदीं पाणी लावून बसलों आहें, वेळ आली कीं चटपटणें चालू करतों ! ' एकाद्या वक्त्याच्या बोलण्यांतील तत्त्व जर सुमारच असलें पण त्यानें कडक भाषा, वाह्यातपणा यांचा अंगीकार करून भाषण मोठें कडक झालें असल्याचा देखावा केला असला तर त्याचा कोष्टी टीकाकार म्हणेल कीं, ' वक्त्यानें भाषणाला खळ फार लावलेली आहे, वास्तविक पाहतां त्यांतलें सूत अगदींच नरम आहे. ' हाच कोष्टी आपलें बिलावरचें भाषण संपवितांना म्हणेल कीं, ' सभ्य गृहस्थहो, माझें हें सणंग आपल्याला पसंत पडतें का पाहा. ' परदेशांतून नाना प्रकारचीं तत्त्वें इकडे आणावींत पण आपल्याला कोणतें मानवतें तें पत्करावें व बाकीचें टाकावें, हा विचार व्यक्त करितांना प्रस्तुत कोष्टी लेखक म्हणेल कीं, ' जांगड माल वाटेल तितका आणावा; पसंत पडेल तो ठेवून घेऊं, बाकीचा परत पाठवूं.' ज्याच्यावर हल्ला करावयाचा त्याच्यावर नेम धरून झेंप घेतली पाहिजे हा विचार प्रकट करितांना एकादा शिकारी वावदूक म्हणेल, ' किरण साधून उडी टाकली पाहिजे. '

आपण आपले साधे गडी आहों असें शेतकरी वक्त्यास सांगावयाचें असलें तर तो म्हणेल, ' माझें बोलणें अगदीं रायवळ आहे, यांत गांवरानपणा म्हणजे तिखटपणा कसलाहि नाहीं. ' तसेंच, चळवळ अगदीं यशस्वी होण्याची वेळ आली पण सरकार कोपल्यामुळें तिची पीछेहाट झाली हा विचार सांगतांना शेतकरी वक्ता असा सांगेल कीं, 'चळवळ अगदीं पोटऱ्याला आली होती; पण सरकारी अवकृपेचा कडाका पडला व ती करपून गेली. '

आपल्या विद्यार्थ्यांना एकाद्या विषयाची एकदां समजूत देऊन पाहिली, ती अपुरी म्हणून पुन्हां एकदां देऊन पाहिली, पण तीहि अपुरी पडते असें दिसतांच, शिक्षक स्वतः मूळचा जर रंगारी असला तर आपल्याशीं उद्‌गार काढील कीं, ' तिसरा हात द्यावयास पाहिजे ! '

वरील उदाहरणेंसुद्धां मीं केवळ अनुमानानें बसविलीं आहेत. मला त्या त्या धंद्यांची तपशीलवार माहिती नाहीं. अर्थात् त्या त्या धंद्यांतील लोक जेव्हां लेखनाचें व वक्तृत्वाचें कसब हस्तगत करतील तेव्हां त्यांनीं खंत न मानतां आपआपलीं परिचित रूपकें लेखनांत प्रविष्ट करावीं. त्यांचा पुष्कळदां उपयोग झाला म्हणजे तीं सर्वांच्या परिचयाचीं होतील व भाषेंत साधे शब्द म्हणून नव्या अर्थानें वावरूं लागतील. अशा तऱ्हेनें मराठींतील शब्दांचा भरणा झपाट्यानें वाढेल. याचा अर्थ असा कीं, आपल्या समाजांत शिक्षण फैलावलें पाहिजे व लिहिणें, बोलणें हे व्यवसाय जे एकाच वर्गाकडे आहेत ते सर्व वर्गांत फैलावले पाहिजेत. तसें झालें म्हणजे सर्व समाजांच्या निरनिराळ्या वासना, त्यांचे रागलोभ, त्यांच्या आकांक्षा, चित्रविचित्र रूपकांचीं रूपें धारण करून पुढें येतील. एकीकडे सर्व समाजांचें मनोगत व्यक्त होण्याचें कार्य होईल व दुसरीकडे शब्दकोश पुष्ट होत जाईल. वर दिलेल्या विवेचनावरून ' भाषासमृद्धीकडे सामाजिक दृष्टीनें पाहणें ' म्हणजे काय याचा पुरेसा बोध होईल अशी नम्र आशा आहे.

---

## कठिण शब्दांचे अर्थ

चलन = वापर. Fossil poetry = अस्थिरूप काव्य. उरस्फोड = त्रास, कष्ट. संथा देणें = पाठ देणें. पक्षपातराहित्य = निःपक्षपातीपणा. सणंग = लुगडें. जांगडमाल = पसंतीकरितां पाठवलेला माल.

## अभ्यास

( १ ) रूपकांच्या योगानें भाषेची शब्दसंपत्ति कसकशी वाढत जाते हें निरनिराळीं उदाहरणें देऊन सविस्तरपणें सांगा.

( २ ) हरताळ पाडणें, इंगा फिरणें, धावें दणाणणें, ठिय्या देऊन बसणें, संथा देणें या शब्दप्रयोगांच्या मुळाशीं असलेलीं रूपकें स्पष्ट करा.

( ३ ) तारांबळ, उलटी अंबारी, बेचिराख, तराळकी या शब्दांची व्युत्पत्ति सांगा.

( ४ ) जाळ्यांत सांपडणें, माग काढणें, चांदी आटवणें, कान टोंचणें, तुळशीपत्र ठेवणें, या वाक्प्रचारांचे अर्थ स्पष्ट करा. त्यांच्या पाठीमागें असणारीं रूपकें उलगडून तीं कोणकोणत्या धंद्यांतून उचललीं गेलीं आहेत तें सांगा.

( ५ ) परभाषेंतील कोणकोणते शब्द आज आपल्या भाषेंत रूढ झाले आहेत? भाषेची वाढ होण्याच्या दृष्टीनें परकी शब्दांना आपल्या भाषेंत कितपत वाव द्यावा? जिवंत भाषेचीं लक्षणें कोणतीं?

• • •

# लहान लहान वशीकरणें : : १४

[ प्रा. माटे यांच्या ‘ साहित्यधारा ’ या स्फुट लेखांच्या संग्रहांतून हा लेख घेतला आहे. ‘ हा थोडासा विनोदी लेख मनांत सांठत आलेल्या बारीक-सारीक अनुभवांच्या मनोरंजक स्मृतींना निबंधाचें रूप देऊन लिहिला आहे ’ असें पुस्तकाच्या प्रस्तावनेंत लेखकानें म्हटलें आहे. या लेखांतील विनोद मानवी स्वभावांतील एका सूक्ष्म दुर्बलतेवर आधारलेला असल्यामुळें तो आपल्याला मनोरंजक वाटतो. प्रत्येक माणूस हा स्तुतीचा भुकेला असतो आणि स्तुतीनें तो दुसऱ्याला वश होतो. तथापि कोणाच्या बाबतींत कोणत्या गोष्टीची स्तुति करावयाची हें मात्र बरोबर कळलें पाहिजे. कितीहि निःस्पृह माणूस असला तरी त्याच्या स्वभावांत एक विशिष्ट जागा अशी असते कीं तिला स्पर्श झाल्याबरोबर तो विरघळून जातो. पुत्रवत्सल पित्याला आपल्या मुलाची स्तुति ऐकून आनंद होतो. लेखक त्यांच्या लेखनाच्या स्तुतीनें हर्ष पावतात. इतर कलावन्तांच्या कलेबद्दल चांगले उद्‌गार काढले कीं त्यांना बरें वाटतें. मानवी स्वभावाचें हें वर्म जाणून लोक त्याचा कसा फायदा घेतात व परस्परांकडून कार्यभाग कसा साधतात याचें विनोदी वर्णन या लेखांत केलें आहे. ]

आपल्या सगळ्या वैगुण्यांत मनुष्यस्वभावाचें अज्ञान हें वैगुण्य फार हानिकारक ठरतें असें मला वाटतें. ज्या लोकांना प्रपंचांत व लौकिक व्यवहारांत यश मिळतें त्यांना इतर सामर्थ्यांच्या जोडीला मनुष्यस्वभावाचें ज्ञान असण्याचा उपयोग फार होतो असें दिसून येईल. जेथें इतरांशीं प्रसंग येतो तेथें तर इतरांच्या स्वभावाचें ज्ञान असणें किती अवश्य आहे हें व्यवहारांत सहजासहजीं प्रत्ययास येतें. आपलें म्हणणें जर एकाद्याला पटवावयाचें असलें

तर, तुम्ही त्याच्याशीं बुद्धिवाद करावा हें योग्यच आहे; पण त्याच्या जोडीला दुसरीं कांहीं वशीकरणें अवश्य असतात. त्याच्या समजशक्तीला सारखें आवाहन करीत नसलांत तर तो बुद्धिवश असल्यास तुमच्या मताकडे झुकूं लागेल हें खरें; पण दरवेळीं आपल्याला बुद्धिवादाचाच प्रसंग असतो असें नाहीं. आपल्याला कांहीं ना कांहीं सांगावयाचें असतें, गळ्यांत बांधावयाचें असतें, साधून घ्यावयाचें असतें, गोड करून घेतात का पाहावयाचें असतें. तेथें बुद्धिवाद कुठला ? तेथें निराळीच विद्या हवी. ही विद्या माणसाच्या स्वभावाचें ज्ञान असण्यानें प्राप्त होते. लाघवीपणाला वश न होईल असा माणूस क्वचितच एकादा असतो. ऐकणाऱ्याच्या मनाला भाव व भावना यांचें अत्यंत नाजुक असे कोवळे कोवळे अंकुर आलेले असतात; त्यांना स्पर्श झाला म्हणजे त्याला सुख उत्पन्न होतें. यांपैकीं कोणत्या अंकुराला स्पर्श करावयाचा हें कळण्याचें तारतम्य बोलणाऱ्याच्या अंगीं असलें म्हणजे त्याचें काम झालें म्हणून समजावें. शुद्ध बुद्धिनिष्ठ अशीं कांहीं माणसें असतातच. त्यांच्या मनाला आतांच सांगितलेले अंकुर असतात असें नाहीं; पण यांना स्पर्श करून आपलें बुद्धिवादाचें शस्त्र बोथट करण्याची हिकमत कोणी करीत नाहीं ना, या विचारानें ते नेहमीं जागरूक असतात. अशा लोकांची संख्या फार अल्प असते. एरवीं अगदीं करडे वाटणारे, सावध असलेले, प्रत्येक बाब बुद्धिदृष्ट्या पाहणारे लोकसुद्धां—शेलक्या प्रसंगीं अगदीं साध्या पण सूक्ष्म आवाहनानें वश होतात. फक्त काळ—वेळ पाहून त्यांच्या मनाच्या कोणत्या अंकुराला मृदु स्पर्श करावयास हवा हें ओळखण्याचें काम बोलणाऱ्याला साधलें पाहिजे.

माझा एक स्नेही आहे. त्याला हें बोलण्यांतलें लाघव फार साधलेलें आहे, आपण याला कां वश झालों हें न कळतांच दुसरा त्याच्याशीं सहमत होतो. दुरून चिकित्सेनें त्याचें संभाषण ऐकणाराला मात्र हा अगदीं साध्या साध्या अशा हिकमती योजीत आहे हें कळून येतें. बोलतां बोलतां तो मधेंच गोड संबोधनें आणतो ! त्याच्या बोलण्यांतली सफाई पाहण्यासारखी असते. “ कुणाला न विचारतांच मीं या उद्योगाला सुरुवात केली; घरांतल्या माणसांना मोठं चमत्कारिक वाटलं; त्यांनीं वडिलांना करमाळ्याला लिहून धाडलं; त्याचंहि पत्र रागारागाचं आलं; बरं भाऊकाका ! या सगळ्यांनीं

मला अगदीं गांगरवून टाकलं; भाऊकाका, तुम्हीच पाहा! यांत माझं काय चुकलं बरं! मीं त्यांना स्वच्छ सांगितलं कीं, भाऊकाका जें सांगतील तें मी ऐकेन; त्यांनीं माझ्या दोन तोंडांत मारल्या तरी चालेल! भाऊकाका, यांत माझं काय हो चुकलं!'' 'भाऊकाका, भाऊकाका' या संबोधनाची खैरात तो इतक्या शिताफीनें करीत आहेसें दिसेल कीं, भाऊकाकांना त्याच्याविरुद्ध बोलण्याची बुद्धिच होऊं नये. शिवाय विनयाची त्यांत भर आहेच! माझा दुसरा एक स्नेही आहे; तो विरोधाचे अग्र बोथट करण्याच्या कामीं मोठा कुशल आहे. आपल्या म्हणण्याचा तडकाफडकीं निकाल लावून डाव विसकटण्याचा संभव आहे असें दिसूं लागलें म्हणजे तो एका निराळ्याच उपायाचा अवलंब करतो. तो म्हणतो, ''मी तुम्हांला हें सांगतों आहे; पण तुम्हांला तें एकदमच आवडेल असं मी तरी कसं समजावं? मी तरी काय एवढा बोलणारा कुशल आहें? तुम्ही माझं बोलणं संथपणानं ध्यानांत घ्या; मला आपलं मत आतांच सांगूं नका, होयहि म्हणूं नका, अन् नाहींहि म्हणूं नका; मला दम आहे.'' हें त्याचें बोलणें ऐकलें म्हणजे ऐकणारा सहजच गप्प बसतो व नकार मिळण्याचा संभव कांहीं वेळ तरी टळतो!

आपल्याकडे येणाऱ्या लोकांत कांहीं कांहीं मोठे धूर्त व कामसाधू असतात. त्यांचें सगळें धोरण त्यांच्या बोलण्याच्या घावडावांत असतें. ते इतरांसारखे अधीर, रोखठोक किंवा कंटाळलेले नसतात. त्यामुळें आपल्यालाहि त्यांचा कंटाळा येत नाहीं. 'एकदां काय तें सांगानात! एक घाव दोन तुकडे करानात!' असें ते कधीं म्हणावयाचें नाहींत. 'आतां मीं तुमच्याकडे कित्तीदां यावें!' असेंहि ते म्हणावयाचे नाहींत. त्यांच्या अंगांत धीमेपणा फार, 'ते म्हणतात कांहीं हरकत नाहीं; आतां उन्हाची वेळ आहे; मीच भलत्या वेळीं आलों; तुम्ही घ्या थोडी विश्रांति; उद्यां परवां असा संध्याकाळच्या वेळीं येईन......हो हो, तें बरोबर आहे; पण सहज इकडे तळ्याकडे जायचंच असतं; चौकशी करून जाईन.' त्यांनीं असें म्हटलें म्हणजे आपण ओशाळतों व त्यांनीं नक्की कोणत्या वेळीं यावें हें आपण होऊन सांगतों. आपल्याकडून हा होकार कसा घ्यावा हें त्यांना छान कळलेलें असतें! वास्तविक पाहातां ते गृहस्थ आपल्याला पुन्हां

यावयास नको असतात. पण आपण कोणच्या गुणानें वश होऊं हें त्यांना माहीत झालेलें असतें.

माझ्या ओळखीचे एक पोस्टमास्तर होते. सुमारें पंचेचाळीस वर्षांचे असतील; गोरेपान, घाऱ्या डोळ्यांचे, उंच आणि अंगानें सडपातळ, डोक्याला नेहमीं पांढरा स्वच्छ इस्त्रीचा रुमाल; अंगांत तसलाच अंगरखा; धोतर स्वतः धुऊन धुऊन गुलाबी झांकीचें बनविलेलें; आणि खांद्यावरून उपरणें. चालूं लागलें म्हणजे कपडे सळसळत असत. चेहरा नेहमीं रागीट. त्यामुळें कोणी बोलावयास धजावयाचें नाहीं. ते अंगावरून दूर गेले म्हणजे मग शेजारून गेलेल्या दोन सोबत्यांपैकीं एक दुसऱ्याला म्हणे, 'हे आमच्या गांवचे पोस्टमास्तर.' परंतु पोस्टमास्तरसाहेबांची वागणूक जरी अशी करडी असे तरी माझ्या वर्गांतल्या तारळेकर नांवाच्या मुलाच्या बापाला त्यांची माहिती झालेली होती. मास्तरांचा मुलगा आमच्याच वर्गांत असून मोठा तरतरीत आणि हुषार होता; आणि डेप्युटीहि त्याला नेहमीं शाबासकी देत. मास्तरसाहेब घरांतसुद्धां जरीं अगदीं करकर करीत असले तरी आपला मुलगा मोठा हुषार आहे या गोष्टीचें त्यांना मनांतून फारच समाधान वाटत असे. तारळेकराचा बाप वाटेंत त्यांना केव्हांहि भेटो. इतर माणसें जरी त्यांच्या शेजारून समोर बघत निघून गेलीं तरी हा गृहस्थ मात्र हटकून थांबे व त्यांना म्हणे, "काय, चिरंजीव गणितांत पहिले आले, म्हणे!" मास्तरांच्या तोंडावरचा करडेपणा जलदीनें ओसरूं लागून ते थोडेसे हंसत व विचारीत "आपल्याला काय माहीत?" आमचा नानू त्याच वर्गांत आहे ना. तो आम्हांला सांगतो; डेप्युटींनीं फार शाबासकी दिली म्हणूत म्हणत होता." हें पहिल्यानें झालें. तेव्हां मास्तर अगदीं प्रांजळपणानें मनापासून हंसले व म्हणाले, "नशीब आहे त्याचं." तारळेकर म्हणतात, "तें तर खरंच आहे. पण शुद्ध बीजापोटीं फळें रसाळ गोमटीं!" मास्तरांनीं नमस्कार केला आणि हंसतमुखानें म्हटलें, "आमच्याकडे आपण कांहीं येत नाहीं कधीं. उद्यां या ना सकाळीं, चहा घेऊन दोन गोष्टी करा, अन् जा." अशीच कोणाची कांहीं, कोणाची कांहीं तऱ्हा असते.

आमचा एक परगांवचा स्नेही आहे. तो येथें आलेला होता. तो मोठा वक्ता होता. त्याचा एकदां सूर लागला म्हणजे प्रतिपक्षाविषयीं तो अगदीं

अर्वाच्यपणानें बोलत असे. तो नवीन पंथांतील होता. वक्ता चांगला; अनेक मतांचे लोक सभेला आलेले होते. बोलतां बोलतां त्यानें श्रोत्यांत पाहिलें तों कॉंग्रेसवाले दिगंबरपंत देशपांडे यांचा मुलगा आपल्या मित्रांच्या टोळींत ऐकावयास बसलेला. दिगंबरपंत याचे मित्र खरे, पण प्रतिपक्षांतले आणि म्हणून व्याख्यान सुरू झाल्यावर हा त्यांच्यावर जोरानें तुटून पडला. त्याचें तें बोलणें ऐकून मोरू देशपांडे अगदीं कावराबावरा होऊन गेला. सभा संपली तेव्हां हा गृहस्थ गर्दीच्या पलीकडून गर्जून त्याला म्हणतो, "काय रे मोरू ! काकांना सांग कीं, मी रात्रीं आतां तिकडेच जेवायला येणार आहें." आपल्या काकांच्यावर हल्ला करणाऱ्या या गृहस्थाचे ते शब्द ऐकतांच मोरू एकदम पालटला ! मित्र त्याच्याकडे पाहूं लागले तेव्हां तो म्हणाला, "लेका ! तो मोठा चांगला माणूस आहे. त्याच्या मनांत कपट नाहीं. काकांना तो इतका बोलला ना, पण घरोबा विसरायचा नाहीं कधीं." याप्रमाणें वक्ता खूष, मोरू खूष !

कांहीं वर्षांपूर्वीं आम्ही येथें एक मोठी परिषद भरविली होती. शेंकडों निमंत्रणें पोहोंचवावयाचीं होतीं व स्वयंसेवकहि पुष्कळ होते. त्यांत एक मोठा झकपक असे. चिटणिसांच्या ध्यानांत आलें होतें कीं, हा गृहस्थ स्वयंसेवक आहे खरा, पण आपण अमुक लोकांना निमंत्रणें पोहोंचवूं असें तो मुळींच म्हणत नाहीं. त्याच्या चर्येवरून व झांकीवरून चिटणिसांनीं अंदाज बांधला आणि स्त्रियांचीं निमंत्रणें तेवढीं त्यांनीं बाजूला ठेवून दिलीं ! इतर स्वयंसेवकांची निरवानिरव केल्याबरोबर त्यांनीं त्याला हातानें खुणावून जवळ बोलाविलें व स्त्रियांच्या निमंत्रणाचा तो एवढा मोठा गठ्ठा त्याच्यापुढें ठेवून ते म्हणाले, "हं, हीं निमंत्रणें तुम्ही पोहोंचवायचीं !" पत्त्यावरचीं नांवें पाहात पाहात तो एकदम 'होय' म्हणाला; आणि चमत्कार असा कीं, इतरांच्या मानानें तिप्पट असलेलें काम त्यानें मोठ्या खुषीनें पत्करिलें व करून टाकलें. चिटणीससाहेबांनीं त्याचें मर्म बरोबर ओळखिलें होतें. हा धोरणाचा भाग आहे. कुणाची नस कोणती हें नेमकें हेरतां आलें पाहिजे.

दुकानावर कोणतीं माणसें नेमावीं हें गुजराथी, पारशी व साहेब ह्यांनीं फार चांगलें ओळखिलेलें असतें. होतां होईतों देखणीं माणसें नेमण्याची

त्यांची वहिवाट आहे. त्यांनीं सरसकट गिन्हाइकाचें रुचिमर्म ओळखिलेलें असतें. दुकानावर एकादा वामट, कुरूप किंवा वेंधळा माणूस बसलेला असला तर त्याच्याकडे कोण जातो ! अलीकडे युरोपियन लोक दुकानांवर मुलींना नेमतात यांतलें मर्म हेंच आहे. 'पुरुषांबरोबरीचे हक्क' समान संधि वगैरे शब्दसंहति सोयिस्कर असतात, इतकेंच काय तें. कांहीं कांहीं हजामतखान्यांत साहेब लोक स्त्रियांना नेमतात ! माणसाच्या मनाची ही ओळख बरोबर असली तरी तिचा आविष्कार असा करावा हें विपरीत आहे. अलीकडे 'स्मार्ट' शब्द पुष्कळच उपयोगांत येतो. पण त्याचा अगदीं प्राकृत अर्थ देखणा व चुणचणीत असा आहे; दुसरा कोणताहि नाहीं. अशा प्रकारचा 'स्मार्ट' माणूस हा चारचौघांशीं बोलाचालावयास व देवघेवीचें बोलणें करावयास फार उपयोगी पडतो. त्याचा तसा उपयोग करून घेण्यांत त्याचा धनी मानवी मनाची ओळख दाखवितो असें म्हटलें पाहिजे.

कोणाचें मर्म कोणतें हें ओळखून आपलें काम कसें साधावें हें सामान्य लोकांच्याहि ध्यानांत येतें. ज्याच्याशीं आपण बोलत आहों त्याचें मन आपल्याला अनुकूल करून घेण्याचे नानाप्रकारचे इलाज शहाणे लोक करितात. बोलतां बोलतां मधेंच त्याच्या कोटावर एकादें फुलपांखरूं नाहीं तर एकादा ढेकूण दिसला तर किंवा निदान तो दिसल्याचा बहाणा करून हे लोक तो झटकन् झाडून टाकतात. आणि जसें कांहीं आपण कांहींच केलें नाहीं अशा शिताफीनें चालू बोलणें जलदीनें चालू ठेवितात. तो दुसरा माणूस एवढ्या बारक्या उपायानेंसुद्धां थोडा तरी आपलासा झाला आहे हें ते ओळखतात. मला आठवतें कीं, एकदां एका सामान्य ओळखीच्या माणसानें बोलण्याच्या सफाईत, माझ्या कोटाची गळपट्टी दुमडली होती ती सरळ केली ! तेवढ्यापुरतें कां होईना, पण या लहान लहान चलनवलनांचा उपयोग होतो हें कांहीं खोटें नाहीं. एकदां जर्मनींतल्या एका मोठ्या युद्धानंतर मोठमोठे अमीरउमराव तहनाम्याचीं बोलणीं करावयास बसले होते. त्यांत एक मोठा आढ्यतेखोर सरदार होता. त्याचा इतमामहि भला मोठा होता. एवढे लोक जमले होते पण हा कोणाकडे पाहीना; आपल्याच गुर्मींत होता. इतक्यांत सहज असें झालें कीं, त्याचें लघुवस्त्र म्हणजे हातरुमाल खालीं पडला. ड्यूक ऑफ मार्लबरो बसला होता. झट्दिशीं वांकून मार्ल-

बरोनें तो रुमाल उचलला व त्या उमरावाच्या हवालीं केला. तात्बडतोब हा कुढा व आढयतेखोर माणूस इतका निवळला कीं, मार्लब्ररोशीं अगदीं खेळीमेळीनें वागूं लागला !

आमच्या लहानपणीं शेजारीं एक पेन्शनर मामलेदार राहात असत. आसामी चांगली गबर होती. जन्मभर अंमल चालविण्याची व ज्याच्या त्याच्या कडून आर्जवाचें व स्तुतीचें बोलणें ऐकावयाची संवय झालेली. पेन्शन घेतल्या-वर हा रुबाब कसा राहाणार ! पण अंमल नसला तरी पैसा होता; व आतां शिपाईप्यादे आणि पाटील-कुलकर्णी नसले तरी भिक्षुक, उपाध्ये, आश्रित ही मंडळी होती. दुपारचीं जेवणें होऊन रावसाहेबांची वामकुक्षी झाली म्हणजे पत्त्यांचा डाव निघावयाचा. रावसाहेब श्रीमंत, थोर, आश्रयदाते ! अर्थात् बरोबर खेळणारी मंडळी धोरणानेंच वागत. या आश्रित मंडळींत एक भिक्षुक मोठा मिस्किल होता. तुमच्याशीं खेळावयास बसला असता तर प्रत्येक डावांत त्याचा चाणाक्षपणा तुमच्या ध्यानांत आला असता. पण रावसाहेबांशीं खेळतांना अगदीं शेलक्या वेळीं त्याचें पान चुकीचें पडावयाचें ! किंवा रावसाहेबांच्या पानावर हुकूम मारावयाचें राहून जावयाचें ! डाव संपतांच तस्तांत थुंकता थुंकतां रावसाहेब म्हणावयाचे, “ शिदभट ! तुम्ही अगदीं बावळ्यासारखं करतां; अहो, तुम्ही हुकूम मारला असतां तर आमचा डाव उलटत होता ! ” शिदभट उत्तर करी, “ खरंच रावसाहेब ! पण आपली हिकमत माझ्या ध्यानांतच आली नाहीं ! ” रावसाहेब खूष होऊन जात. त्यांची कोणची नस दाबावयाची हें शिदभटाला एकदां कळून चुकलें होतें !

नट, गवई, शिक्षक, नकलाकार इत्यादि मंडळी तर अगदीं भोळी असतात. त्यांना खूष करावयास फारसें कांहीं लागत नाहीं. “ मीं तुम्हांला ओळखलं नाहीं ! काम अगदीं बेमालूम झालं ! ” एवढें म्हटलें म्हणजे कोणताहि नट अगदीं खूष होतो. वास्तविक पाहतां ‘ मी तुम्हांला ओळखलें नाहीं ’ हा कांहीं फार मोठा गौरव नाहीं; पण तेवढयानें स्तुतीचा दोष न लागतां बोलणाराचें वशीकरणाचें काम साधतें. “ काय बोवा ! ही भैरवी कोणाकडून घेतली ? ” एवढया शब्दांनीं गवईबोवा संतुष्ट होतात. भैरवी वाईट झाली मीं चांगली झाली हें बोलावयाची जरूरी नाहीं. बोवांना

वाटतें, ही आपली स्तुतिच आहे व आपला तर अभिप्राय न दिल्याचा हातचा शिल्लकच राहातो. शिक्षकांचें तर विचारूंच नका. प्रत्येक शिक्षकाला अशी एक जाणीव असते कीं, आपण मोठे-दर्दी शिकविणारे असून मुलांत आपली लोकप्रियता फार आहे. बापडा या जाणिवेवरच जगत असतो! 'सर! आमच्या वर्गावर तुम्ही कां येत नाहीं?' असल्या एकाद्या अर्ध-बावळ्या पोरानें विचारिलेल्या प्रश्नानेंहि मास्तरसाहेब खूष होतात. पोरांनाहि हें माहीत असतें. तास संपवून बाहेर पडल्यावर व्हरांड्यांत एकादा विद्यार्थी नुसता हंसला तरी ती आपल्या कामाची शिफारस आहे असें मानण्याकडे शिक्षकाचा कल असतो. पोरें हें इंगित समजूनच चालतात

पण सगळ्यांत धूर्त म्हणजे व्यापारी लोक समजावे गिऱ्हाइकाच्या मनांत वस्तु घेण्याची बुद्धि कशी उत्पन्न करावी हें ते उत्तम ओळखतात. आमच्या आळीला एक बोरें विकणारा येत असतो. कांहीं झालें तरी बोरें आंबट असावयाचींच; व तीं खाल्लीं तर पडसें-खोकला येणार हें ठरलेलेंच असतें. लोकांच्या मनांत कायम झालेला हा ग्रह कसा घालवावयाचा! म्हणून तो बोरेंवाला ओरडतो, 'बोरं घ्या बोरं! ग्वाड बोरं! पडसं-खोकला घालवायचीं बोरं!'' यांतील विनोद लक्षांत येऊन एकादा माणूस तरी मनांत हंसतो आणि तीं घ्यावयास तयार होतो. विकणाऱ्यानें त्याच्या विनोदबुद्धिलाच आवाहन केलेलें असतें. मंडईत गेलों म्हणजे मागें मागें एक म्हातारी माळीण कोपऱ्यावर बसलेली दिसावयाची. ती मोठी लाघवी होती. तिचा ठराविक प्रश्न असावयाचा, 'हं! आज काय देऊं काका!'' यांतील 'आज' शब्दांतील लाघव व नातें उत्पन्न झालें आहे असें दाखविण्याचें कसब गिऱ्हाइकाला प्रिय वाटे. तुम्ही नेहमीं माझ्याकडून भाजी घेणारे असें नातें जोडणारें हें कसब या माळिणीच्या फार उपयोगी पडे. पण तिच्या अंगांत आणखीहि एक हिकमत होती. आपली वाईट वस्तु अथवा महाग वस्तु चांगली करून दाखवावयाची; पण दाखवितांना गिऱ्हाईकहि भाळावें अशी तिची खुबी असे. मेथी, चाकवत नवें आलें म्हणजे फारच थोडें देतात. अगदीं चार काड्यांची पेंढी बांधलेली असते. दोन पैसे मागावयाचे व ही असली पेंढी पुढें करावयाची म्हणजे त्या माळिणीलासुद्धां कसेसेंच वाटे; पण यांतील दोष घालवून ती गिऱ्हाइकास कसें वश करी पाहा! ती

म्हणे, "कवळी मेथी ! कवळी मेथी ! दोन पैशाला व्यावी, नवरा–बायकूनं खावी ! दोन पैशाला व्यावी, नवरा–बायकूनं खावी !" गिऱ्हाइकांच्या प्रापंचिक सुखस्मृतीला जागृति कशी आणावी व आपल्याला प्रिय असलेल्या स्त्रीचें व आपलें नांव अशा रीतीनें निबद्ध झाल्याचें सुख त्यांलां कसें उत्पन्न करावें हें या म्हातारीला फारच चांगलें समजत होतें ! एवढ्या वशीकरणावर ती आपली मेथी भराभर खपवून टाकी हें काय सांगावयास पाहिजे !

---

## कठिण शब्दांचे अर्थ

वशीकरण = एकाद्याला वश करण्यासाठीं योजलेलें साधन. अर्वाच्य = वेडेवांकडें, अश्लील. झांक = ऐट, रुचिमर्म = आवडीचें रहस्य. शब्दसंहति = शब्दसमुदाय. हजामतखाना = केंस कापण्याचें दुकान. दर्दी = चतुर. इंगित = रहस्य.

## अभ्यास

(१) 'स्तुतीचा महिमा' या विषयावर एक निबंध लिहा.

(२) एका भोळ्या श्रीमंताकडे एक धूर्त माणूस गेला आहे व श्रीमंतांच्या बावळ्या आणि अर्धवट मुलाची स्तुति करून श्रीमंतांकडून तो पैसे उकळीत आहे अशी कल्पना करून एक विनोदी संवाद लिहा.

(३) तुम्ही स्वतः वरच्या लेखांत सांगितल्याप्रमाणें लहान लहान वशीकरणें योजून कधीं कुणाकडून कांहीं काम साधून घेतलें आहे काय ? असल्यास तुमचा तो अनुभव पंधरा ते वीस ओळींत द्या.

• • •

# शोध बिचारे उदासीनच आहेत : : १५

[ ‘ विज्ञानबोध ’ या शास्त्रीय स्वरूपाच्या ग्रंथाला प्रा. माटे यांनीं सुमारें दोनशें पानांची जी विस्तृत व चिकित्सक प्रस्तावना लिहिली आहे. तिच्यामधून पुढील उतारा घेतलेला आहे. ‘ समाजांत शास्त्रांची आवड आणि ज्ञानाची भूक ही सर्वसामान्य माणसांपर्यंत जाऊन पोहोंचली पाहिजे, हा या प्रस्तावनेंतील प्रतिपादनाचा मुख्य रोख आहे. जगापुढें उभ्या असलेल्या अनेक प्रश्नांबावत या प्रस्तावनेंत अत्यंत सडेतोड, नावीन्यपूर्ण आणि मूलस्पर्शी असे विचार प्रकट केले आहेत. एक अत्यंत विद्वान् व नव्या दृष्टिकोनाचा चिकित्सक विचारवन्त अशी प्रा. माटे यांची ओळख या प्रस्तावनेनेंच महाराष्ट्राला प्रथम करून दिली.

आज सर्व मानवजातीपुढें एक भयंकर समस्या उभी राहिली आहे. शास्त्रीय शोधांनीं मानवाच्या सुखासमाधानांत भर घातली खरी, पण याच शोधांनीं अनेक प्राणघातक स्वरूपाच्या अस्त्रांना जन्म दिल्यामुळें मानवजातीचें दुःखहि त्याच प्रमाणांत वाढलें आहे. आपलें काम कमी वेळांत व कमी श्रमांत व्हावें आणि आपल्या सुखसोयींत भर पडावी म्हणून माणसानें शास्त्रीय शोध लावले. तथापि, शंकरानें निर्माण केलेला भस्मासुर जसा अखेर त्याच्याच मस्तकावर हात ठेवून त्याला भस्म करून टाकावयास सिद्ध झाला त्याप्रमाणें मानवनिर्मित शास्त्रीय शोधांचा हा भस्मासुर आज ॲटम बॉम्ब, हैड्रोजन बॉम्बसारखीं भयानक रूपें धारण करून प्रत्यक्ष मानवाचाच जीव घ्यावयास सजला आहे. पृथ्वीच्या पाठीवरची सर्व मानवजातच अजिबात पुसून जाईल किंवा काय असें भय आज निर्माण झालें आहे. शास्त्रीय शोधांच्या अमृतवल्लीला प्राणघातक अस्त्रांचीं विषारी फळें

आलेलीं पाहून भयभीत झालेला मानव त्वेषानें म्हणूं लागला. ' या शास्त्रानेंच सर्व नाश केला! '

तथापि, ही विचारसरणी बरोबर आहे का? शास्त्रांना स्वतःचें मत नाहीं. त्यांना चांगल्या उपयोगाला लावलें तर ते हितकर होतात. त्यांना वाईट कामाला जुंपलें तर, ते अहितकर होतात. पण हा दोष त्यांचा नसून त्यांना वाईट कामासाठीं योजिणाऱ्या माणसाचा आहे. कोणतीच गोष्ट ही मूलतः चांगली किंवा वाईट नसते. तिचा जो उपयोग करून घ्यावा त्यावर तिचें चांगलेंपण किंवा वाईटपण अवलंबून आहे. विषापासून सुद्धां जेथें अमृतासारखीं हितकर औषधें निर्माण करतां येतात तेथें शास्त्रीय शोध वाईट कसे ठरतील? शास्त्रीय शोध ही कामधेनु आहे. तथापि, सत्ता व स्वार्थ यांनीं पिसाट झालेला मानव या शास्त्रीय शोधांचा आज भलताच उपयोग करून घेत आहे. हा दोष मानवाचा आहे. शास्त्रीय शोधांचा नव्हे. माणसाच्या दोषाबद्दल शास्त्रीय शोधांना जबाबदार धरणें ही शुद्ध कृतघ्नता आहे.

खालील उताऱ्यांत हे सर्व विचार प्रा. माटे यांनीं मांडले आहेत. विषय कठिण असूनहि तो त्यांनीं किती सुबोध व रंजक केला आहे पाहा. ]

यंत्रांनीं सगळा घात केला आहे असें म्हणण्याची परिपाठी थोरामोठ्यांनीं घातली आहे; व ती त्यांनीं सुरू केलेली पाहातांच जे मुळांतच नवीन ज्ञानाला विन्मुख होते त्यांना चांगलेंच फावलें, व ते म्हणूं लागलें कीं, ' आम्ही तरी हेंच म्हणत होतों. हे एवढे थोर गृहस्थ आहेत, यांचेंहि असेंच मत आहे कीं यंत्रांनीं नाश केला. ' या दोघांचा मनोमिलाफ फारच उद्वेगजनक आहे. तो मोडून टाकला पाहिजे. ' यंत्रानें नाश केला. ' या वाक्याचें जनकवाक्य असें आहे कीं, ' शास्त्रानें नाश केला. ' या दोहोंत फरक केला पाहिजे. प्रथम जनकवाक्याचें परीक्षण करावयास हवें. युद्धकाळांत माणसांनीं एकमेकांना मारण्यासाठीं ज्या अनेक क्लृप्त्या काढल्या त्या पाहून अंगावर शहारे येणें हें स्वाभाविक होतें, पण या अनेक क्लृप्त्या निघाल्या याला शास्त्राचा कांहीं इलाज नाहीं. जे शास्त्राचे नवे शोध

अनुक्रम
विभाग

लागतात ते बिचारे आपण होऊन कांहींच करीत नाहींत. ते तेथें असतात इतकेंच काय तें. त्यांचा उपयोग कोणी कसा करून घ्यावा हें त्यांच्या हातीं नाहीं. त्यांना काय मत आहे? या शोधांचा उपयोग दुष्ट कामाला करून घेणारे लोक स्वतः दुष्ट आहेत, त्यांत शोधांनीं काय करावें? सद्बुद्धीच्या माणसांनीं त्याचा उपयोग करावयाचें म्हटलें तर त्यांचा चांगल्या कार्यांत उपयोग होईल. शोधांना स्वतःला यांतलें बरें वाईट कांहींच कळत नाहीं. म्हणून हक्स्ले म्हणाला, ‘ शास्त्रशोध हे मूलतः उदासीन आहेत. ’ वाईट माणसें त्यांचा वाईटाकडे उपयोग करून घेतात. म्हणून त्यांच्यावर हत्यार धरणें चुकीचें आहे. आपण असें करूं लागलों तर आपणांला पृथ्वीवर कांहींहि शिल्लक ठेवतां येणार नाहीं. कारण वाईट लोक आपला हेतु साधण्यासाठीं कोणत्याहि साधनांचा उपयोग करून घेतात. शास्त्राचे शोध नव्हते तेव्हां विद्यमान असलेल्या साधनांचा उपयोग वाईट माणसांनीं वाईटा-कडे केला कीं नाहीं? मग त्या साधनांवर आपण तेव्हां कां रागावलों नाहीं? अश्राप माणसांच्या तोंडून आपल्याला हवा आहे तो कबुलीजबाब काढण्या-साठीं प्रत्यक्ष मिष्टान्नाचा उपयोगसुद्धां, पोलिस करतात असें आपण ऐकलें आहे ना? मग वरील तर्कपद्धतीनें आपल्याला अन्नच वाईट ठरविलें पाहिजे. पण असें कधीं कोणी केलें आहे काय? आपला उपयोग भुकेले-ल्याची भूक शमविण्यासाठीं होत आहे, का एकाद्या मानीव गुन्हेगाराचें डोकें फिरविण्यासाठीं केला जात आहे हें त्या अन्नाला काय बरें माहीत? हें जसें आहे तसेंच असणार. वस्तु वाईट किंवा चांगली अशी मूलतः कांहींच नाहीं. आपण तिचा काय उपयोग करतों यावर सर्व अवलंबून आहे. शास्त्रीय शोध वाईट असें म्हणतांना मनुष्ययोनि आपल्यावरच दुष्ट-पणाचा शेरा मारून घेते एवढाच या गोष्टीचा अर्थ आहे. दुसरें असें कीं, शास्त्रें वाईट म्हणतांना शास्त्रांचा चांगला उपयोग किती झाला आहे यांकडे आपण कानाडोळा करतों. वैरभावाचें पिसें अंगांत भरलें म्हणजे माणसांनीं शास्त्रांचा वाईट उपयोग केला आहे हें खरें, पण सुदैवानें माणसांच्या अंगांत हें पिसें एकादे वेळीं येतें व थोडा वेळ टिकतें. त्या वेळीं जें काय हातांत असेल तेंच आपण एकमेकांना फेंकून मारतों. लूथर लिहीत बसला असतांना त्याला एक नरकदूत समोर दिसूं लागला! लूथर हा

मोठाच धर्ममार्तंड होता; त्या सैतानाकडे पाहातांच तो इतका रागावला कीं, त्यानें टेबलावरची दौत उचलून त्या सैतानाला भिरकावून मारली. येथें दौतीचा नेहमींचा उपयोग इतका चांगला आहे तरी त्या वेळीं लूथरनें अंगांत आल्यासारखें करून तिचेंच हत्यार बनविलें. हीच गोष्ट सर्व साधनांची आहे. म्हणून ध्यानांत ठेवावयास हवें कीं, मनुष्ययोनीच्या हें जें अंगांत येतें तें जर सोडून दिलें तर एरव्हीं हे शास्त्रशोध आपल्याला उपकारकच ठरले आहेत. आपल्या तोंडावरच्या देवी शास्त्रानें गेल्या ना? मलेरियाचा जंतु शास्त्रानें कायमचा मारिला आहे ना? पनामा कॅनॉल बांधण्याचें काम ज्या पीतज्वरानें फ्रेंच शिल्पज्ञांना टाकावयास लाविलें तोच पीतज्वर शास्त्राच्या बळावर मारून टाकून अमेरिकन लोकांनीं पनामा कॅनॉल बांधिला; इतकेंच नव्हे तर तें आरोग्य हवेचें ठिकाण बनविलें हें खरें आहे ना? विकलांग कापून काढावयाच्या वेळीं माणसाला नुसतें दाबून धरूनच डॉक्टर आपल्या हत्यारानें, रोग्याच्या किंचाळण्याकडे लक्ष न देतां, लांकडाचा ओंडा कापावा त्याप्रमाणें कापीत असे; पण शास्त्रानें भुलीच्या वाफा काढून रोग्याला सुखी केलें आहे ना? अधांत्रीं उभें राहून दलदलीच्या जमिनींत धान्य पेरावयाची सोय करून शास्त्रांनीं गरीब शेतकऱ्यांना हालांतून सोडविलें आहे ना? भौतिक शास्त्रांनीं आपलें नेहमींचें जीवित एवढें सुखी केलें असतां आपणच एकादे वेळीं अंगांत आल्यासारखें वागूं लागलों, म्हणून त्यांना दोष देणें हें प्रशस्त आहे काय? सर्व युयुत्सु राष्ट्रांनीं मिळून जर असें ठरविलें कीं शास्त्रशोधांचा अमुक एक उपयोग करून घ्यावयाचा नाहीं, तर तसें घडून येईल. शास्त्र विचारें उदासीनच आहे.

दुसराहि एक विचार लक्षांत घ्यावयास हवा. पुढल्या पुढल्या मारक यंत्राला मागले मागले लोक नांवें ठेवितात, असें दिसतें. बंदुकीच्या गोळीची एक जात अशी आहे कीं, ती अंगांत घुसतांना अर्थातच त्वचेला मोठेंच रंध्र करते; पण आंत गेल्यावर स्थिर होण्याच्या बेताला जोरानें फुटते व मग तिचे झालेले शेंकडों बारीक बारीक तुकडे मांसांत घुसतात. ही गोळी जेव्हां निघाली तेव्हां तिचें मारक रूप पाहून लढवय्यांना आनंद झाला. पण ती ज्यापाशीं नव्हती ते उद्वेगानें म्हणाले, ‘हें फार वाईट आहे!’ जणूं

कांहीं यांच्यापाशीं जी साधी गोळी होती ती कमी प्राणघातक होती! ही वरची ठिकरी गोळी वापरणारांना जेव्हां विषारी वाफेची धुरी रणांगणावर मिळाली, तेव्हां ते म्हणाले, 'हें फार वाईट आहे!' जणूं कांहीं लोकांच्या अंगांत घुसून, फुटून, त्यांच्या देहाच्या चिंध्या करणारी यांची गोळी कमी घातक होती! बंदुकीची गोळी जेव्हां प्रथम उडाली असेल तेव्हां तलवारीनें एकमेकांच्या माना कापण्यांत सराईत झालेले शूर म्हणाले असतील, 'धर्म-युद्ध नव्हे हें!' जणूं कांहीं तलवारीनें मानवी देहाची जी कापाकाप चालत असे ती क्लेशदायक नसे! एकदां मारावयाचें असें म्हटल्यावर कसें मारावयाचें व मरण हें सुद्धां योद्ध्याला कमी भीतिप्रद करावयाचें कीं काय हा प्रश्न असतो. जर का शिपायांना हें कळलें कीं, मरणांतहि क्लेश बिलकुल नाहींत तर सध्यां थोडीं वचकांत असलेलीं माणसें फारच चेकाळतील. त्यांना सुद्धां अशी दहशत हवीच कीं, युद्ध म्हणजे नुसतें मरण नाहीं तर क्लेश आणि मरण असें आहे. असें झालें तर युद्धतत्परता थोडी तरी कमी होईल. हाहि एक विचार ध्यानांत घेण्यासारखा आहे. पण हा सोडून दिला तरी दुसऱ्याचा निःपात करावयाचीं साधनें कोणतींहि असोत; आपण एकमेकांस मारावयाचें कीं नाहीं हा काय तो प्रश्न असतो. मागल्या माणसांनीं ठिकरी गोळी उडविली नाहीं किंवा विषारी वाफांची धुरी शत्रूंना दिली नाहीं, याचें कारण तीं माणसें मोठीं भूतदयान्वित होतीं हें नव्हे तर, त्यांना हीं साधनें माहीत नव्हतीं हें आहे. त्यांना जीं मारक यंत्रें बनवितां आलीं होतीं त्यांचा उपयोग चालूंच होता. रामानें जेव्हां अत्यंत प्रखर असें धनुर्युद्ध चालूं केलें तेव्हां ते नखांनीं ओरबाडावयास शिकलेले राक्षस 'धर्मयुद्ध नव्हे हें!' असेच ओरडले असतील. उत्तरोत्तर फरक इतकाच पडत गेला कीं, माणसांना अक्कल जास्त जास्त येत चालली व त्या अकलेचा उपयोग त्यांनीं इतर कामांत जसा केला तसा या मारक साधनें तयार करण्याच्याहि कामीं केला. हा माहीत झालेल्या शास्त्राचा दोष नव्हे. त्यांच्या भावनेचा व वासनेचा आहे. त्यांना वाटल्यास दोष द्यावा.

---

## कठिण शब्दांचे अर्थ

क्लृप्त्या = युक्त्या. विद्यमान = अस्तित्वांत असलेलें. मनुष्ययोनि = मनुष्यजात. पिसें = वेड. भूतदयान्वित = भूतदयावादी.

## अभ्यास

(१) 'वस्तु वाईट किंवा चांगली मूलतः कांहींच नसते. आपण तिचा काय उपयोग करतों यावर सर्व अवलंबून आहे.' या विधानाचें विस्तृत स्पष्टीकरण द्या.

(२) शास्त्रांच्या प्रगतीनें मानवजातीचें सुख वाढलें कीं कमी झालें ?

(३) जगाच्या सुखांत भर घालणाऱ्या तीन शास्त्रीय संशोधकांची सविस्तर माहिती मिळवून ती द्या.

(४) 'ॲटम बॉम्ब' या विषयावर एक विस्तृत निबंध लिहा.

(५) 'वैरभावाचें पिसें अंगांत भरलें म्हणजे माणसांनीं शास्त्रांचा वाईट उपयोग केला आहे' असें लेखक म्हणतो. शास्त्रांच्या अशा 'वाईट' उपयोगाचीं कांहीं उदाहरणें द्या.

REFBK-0007376

अनुक्रम १८७९२८
विभाग
क्रमांक
नों. दि.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ७३७६

# आमचीं प्रकाशनें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | चित्रा | ( कथासंग्रह ) | र. गो. सरदेसाई | २ |
| २ | सुरसुरी | ,, | ,, | १॥। |
| ३ | जीवनसंग्राम | ,, | अमरेंद्र | २ |
| ४ | मंदज्योति | ,, | व. ह. कटककर | १॥ |
| ५ | श्रावणांतल्या विजा | ,, | बालशंकर देशपांडे | १॥ |
| ६ | तुटलेले तारे | ( लघुनिबंध ) | अनंत काणेकर | १॥ |
| ७ | राखेंतले निखारे | ,, | ,, | १॥ |
| ८ | अनिर्बंध जीवन | ( कादंबरी ) | मु. गो. देशपांडे | ३ |
| ९ | आसरा | ( कथासंग्रह ) | र. वा. दिघे | ३ |
| १० | ताजमहाल | ,, | ,, | २॥। |
| ११ | लाडकी लक्ष्मी व इतर गोष्टी | | ना. सी. फडके | २ |
| १२ | चंद्रा व इतर गोष्टी | | ,, | २ |
| १३ | माझ्या साहित्यसेवेंतील स्मृती | | ,, | २॥ |
| १४ | अल्ला हो अकबर | ( कादंबरी ) | ,, | ६ |
| १५ | काल व आज | ,, | रा. न. किर्तने | १ |
| १६ | पिवळा बंगला | ,, | वि. वि. बोकील | ३ |
| १७ | ऐकावें तें नवलच | ,, | ,, | ३ |
| १८ | चल पुढें | ,, | ,, | ३ |
| १९ | दोन तरुण व दोनच तरुणी | ,, | ,, | ३ |
| २० | आणि त्यांनीं संसार केला | ,, | ,, | ३॥ |
| २१ | वाळूचें घड्याळ | ( कथा ) | ,, | ३ |
| २२ | नैनीच्या तुरुंगांत | ( रोजनिशी ) | विजयालक्ष्मी पंडित | २ |
| २३ | रेघोट्यांचें दैवत | ( कथा ) | य. गो. जोशी | २ |
| २४ | प्रेटती मशाल | ( कादंबरी ) | प्रो. रतनलाल डी. शहा | ४ |
| २५ | साहित्य-सुवर्ण | ( वेंचे ) | प्रो. रा. कृ. लागू | ३ |
| २६ | स्वप्न | ( कथासंग्रह ) | पु. भा. भावे | ३ |
| २७ | नामसुधा वेणुसुधा व वनसुधा | | वामन पंडित | २ |

# आमचीं प्रकाशनें

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | धाडशी झुंझार | माणिक परदेशी | १ - |
| २९ | विषारी बाण | ,, | १ |
| ३० | आमचें स्त्री-जीवन ( प्रबंध ) | वसुंधरा पटवर्धन | ३ |
| ३१ | तरुणींचे प्रश्न ,, | सौ. मालती दांडेकर | ४ |
| ३२ | दूरदेशच्या प्रीतिकथा | ,, | २॥ |
| ३३ | ओढ ( कादंबरी ) | शांता ज. शेळके | ४ |
| ३४ | ध्यास ( कथासंग्रह ) | पु. भा. भावे | ४ |
| ३५ | अकुलिना ( कादंबरी ) | ,, | ३ |
| ३६ | सुगंधी फुलें | प्रो. श्री. म. माटे | १॥ |
| ३७ | पुनर्जन्म ( नाटिका ) | य. य. माळी | ·॥· |
| ३८ | नवें क्षितिज ,, | ,, | ·॥· |
| ३९ | चाफेकर नी रानडे फटका | बॅ. वि. दा. सावरकर | ·।≈ |
| ४० | छोटी नली ( कादंबरी ) | सुशील परभृत | २॥ |
| ४१ | धूम्रतरंग ( गुजगोष्टी ) | प्रो. देशपांडे | २ |
| ४२ | असं पाहा ( कथासंग्रह ) | ना. वि. कुलकर्णी | २ |
| ४३ | प्रेमिकांशीं हितगुज ( प्रबंध ) | स. रा. महाजनी | २ |
| ४४ | वसईची मोहीम ,, | य. न. केळकर | ३॥ |
| ४५ | ऐतिहासिक पोवाडे | ,, | २ |
| ४६ | उपहासिनी ( काव्य ) | | २ |
| ४७ | संगीत सौभद्र | कै. अण्णा किर्लोस्कर | १॥ |
| ४८ | Solid Geometry | Prof L. V. Gurjar | 3/2 |
| ४९ | Reference Tables | ,, ,, | 0/8 |
| ५० | Practical Physics | Prof D. S. Jog | 3/8 |

कॉन्टिनेंट्ल बुक सर्व्हिस

६२६ शनवार पुणें २.

कॉंटिनेंटल बुक सर्व्हिस
६२६ शनिवार, पुणें २

मूल्य १। रुपया.

नवी प्रकाशनें

● सौभद्र
—कै. अण्णा किर्लोस्कर

● शारदा
—गो. ब. देवल